# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. १२/०८/२०१६

आज शुक्रवार दि. १२/०८/२०१६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. ०२/०८/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ४) | मुन्ना सिंग | सभागृह नेता |
| ५) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| ११) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १५) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १६) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १७) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १८) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २०) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २१) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २२) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २५) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २६) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३०) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३४) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३५) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३६) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३७) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४१) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४२) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४४) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४५) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४६) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४७) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४९) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ५०) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५१) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५२) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५३) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५४) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५७) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५८) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५९) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ६०) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६१) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| ६२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६३) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६४) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६५) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६६) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६७) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६८) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६९) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७२) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७३) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७४) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७५) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७६) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७७) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ७८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७९) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८०) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८१) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८२) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८३) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८४) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ८५) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

गैरहजर सदस्य –

| | | |
|---|---|---|
| १) | लियाकत ग. शेख | विरोधी पक्षनेता |
| २) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ३) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ४) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ६) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ७) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ८) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ९) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| १०) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ११) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| १२) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

रजेचा अर्ज –

१)	भगवती शर्मा	नामनिर्देशित सदस्य

नगरसचिव :-

महापौरांच्या परवानगीने सर्वांनी राष्ट्रगीतासाठी जागेवर उभे रहायचे आहे. राष्ट्रगीत वंदे मातरम् एक साथ शुरु कर। सभासुचना टाईप करणे.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम विषय सुरु झालेला आहे. मिटींग सुरु झालेली आहे. विषय असा आहे की, आपल्या काशिमिरा शाळेमध्ये एका सन्मा. नगरसेवकांनी.............

मा. महापौर :-

मी अजून बोलायची परवानगी दिली नाही.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम खूप इर्म्पोटन्ट विषय आहे. एका नगरसेवकांनी सैराट पिक्चरचे गाणे वाजवले आणि त्याच्यावर तुम्ही अजिबात कारवाई करत नाही. सगळे कार्यकर्ते झिंग झिंग झिंगाट गाण्यावर नाचले.

(सभागृहात गोंधळ)

ध्रुवकिशोर पाटील :-

अशोभनीय कृत्य या नगरसेवकाने केले आहे. आपण ॲक्शन का घेत नाही हा इर्म्पोटन्ट विषय आहे. मॅडम २ मिनिट लगेगा ना।

मा. महापौर :-

पहले आप मेरी बात सुनेंगे।

ध्रुवकिशोर पाटील :-

सैराट के गाने पे नाचना और यह काम करना अच्छी बात है क्या? मुझे बताइए आप २ मिनिट लगेगा।

नगरसचिव :-

श्री. अमन करीवाला हे सी.ए. मध्ये भारतातून सहावे आले आणि महाराष्ट्रातून दुसरे आले त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यांना मी महापौरांच्या परवानगीने सभागृहात आमंत्रित करतो.

ध्रुवकिशोर पाटील :-

आप विषय नही ले रहे है क्या बात है मॅडम उसका सत्कार कर रहे है आप लेकिन वो जिस स्कूल में पढ रहे है नगरसेवक वहाँ क्या कर रहे है उसके बारे में आपका कुछ खुलासा नही है। कुछ आपका ॲक्शन नही है और आप सत्कार कर रहे है। जहाँ बच्चों को पढाते है उस स्कूल में आपके नगरसेवक अपने कार्यकर्ते नाच रहे है।

राजेंद्र जैन :-

आप निचे बैठो।

वंदना चक्रे :-

आप कौन होते हो ऐसे बोलने वाले।

(सभागृहात गोंधळ)

मुन्ना सिंग :-

सत्कार होने के बाद इसपे चर्चा करेंगे।

ध्रुवकिशोर पाटील :-

मुन्नाभाई सत्कार करने को हम लोग ही बोल रहे है ना लेकिन तुम जो सत्कार कर रहे हो...........

(सभागृहात गोंधळ)

ध्रुवकिशोर पाटील :-

सब पेपर में है। तुम्हारे पोलिस स्टेशन के रेकॉर्ड पे है। सभी टी.व्ही. चॅनल सभी न्युज चॅनल में बडी-बडी हेडलाईन आई है। म्युनिसीपल कॉर्पोरेशन का नाम खराब हो रहा है।

जुबेर इनामदार :-

सभागृहाच्या प्रतिष्ठेचा विषय आहे.

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

महापौर मॅडम अगर कोई न्यूज में कल आएगा की ध्रुवकिशोर पाटील ने ऐसा किया तो आप सत्य मानोगे क्या?

(सभागृहात गोंधळ)

ध्रुवकिशोर पाटील :-

हरीभाऊ आपण एका ठिकाणी स्वागत करता आणि एका ठिकाणी एक जगह विद्यार्थी का सत्कार कर है और एक जगह अपमान कर रहे है। यह बहोत बडा अपमान हुआ है। मिरा भाईंदर की प्रतिष्ठा पानी में गई है। इसका खुलासा होना चाहिए क्या ॲक्शन प्रशासन ने लिया है और उसपे कितनी कमिया है क्या आपकी आगे की कारवाई है उसका खुलासा होना चाहिए।

राजेंद्र जैन :-

महापौर मॅडम सन्मा. नगरसेवक पाटील साहब को बताइए की सभागृह का काम कैसे होता है। कैसे काम किया जाता है?

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम, न्युज पेपरवर सभागृहामध्ये चर्चा होत नाही. तरी हा विषय घेऊ नये आपण त्यांना सांगुन दुसरा विषय पुढे चालू करावा.

मा. महापौर :-

आपको खुलासा चाहिए तो आप लोग बैठ जाइए शांती से खुलासा दे रहे है। और किसी को बोलना है इस विषय पे पुछना है।

वंदना चक्रे :-

इस विषय में यही पूछना है की महानगरपालिका की स्कूल में जो प्रभाग समिती के सभापती ने जो स्कूल में कार्यक्रम किया वहाँ पे बच्चे लोग पढते है उस स्कूल में एक शिक्षक के उपर जबरदस्ती करके उसके अंदर घुस के यह कार्यक्रम लिया है। यह कितना सही है और कितना झुठ है।

शरद पाटील :-

मॅडम खुलासा प्रशासनाला द्यायला लावा.

मा. उपायुक्त :-

सन्मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो दि. ३१/७/२०१६ रोजी रविवारी महानगरपालिकेची शाळा क्र. १९ या ठिकाणी रविवारच्या दिवशी शाळेमध्ये काही पार्टी करण्यात आलेली आहे अशा प्रकारची तक्रार आलेली होती. सोमवारी ही गोष्ट निदर्शनास आल्यानंतर आमची सगळी विभाग प्रमुखाच्या बैठकीमध्ये मा. आयुक्त साहेबांनी शिक्षण अधिकारी यांना आदेश दिलेले होते की या संबधाची चौकशी करावी आणि त्याचा तात्काळ रिपोर्ट सादर करावा. त्यानुसार प्रशासन अधिकारी यांनी जागेवरती जाऊन वस्तुस्थितीची पाहणी केली त्याचप्रमाणे संबंधित..........

शरद पाटील :-

महापौर मॅडम तिथे कॅमेरे लावलेले आहे त्याची परवानगी आहे का?

मा. महापौर :-

पत्रकार कक्षामध्ये ज्यांचा कॅमेरा चालु आहे त्यांनी प्लिज बसुन जावे.

आसिफ शेख :-

मॅडम पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे.

मा. महापौर :-

परमिशन घेऊन करायचे असते आसिफभाई आप बैठ जाइए।

आसिफ शेख :-

पत्रकार लोक जर समजा महासभेच्या आतमध्ये येऊन चित्रिकरण करत असतील तर आपण बंद करु शकता. पत्रकार पत्रकारकक्षामध्ये आहेत. त्यांनी तेथून काय करायचे तो त्यांचा अधिकार आहे.

मा. महापौर :-

त्यांनी परमिशन घ्यावी की.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम लेकिन लाइव्ह टेलिकास्ट तो है ना जैसे पार्लमेंट में लाइव्ह टेलिकास्ट होता है, विधानसभा में लाइव्ह टेलिकास्ट होता है। तो अपनी भी महासभा चल रही है ना तो उसका उनको रेकॉर्डींग करने दो ना। उनको अलाऊड है, वो बाहर है और बाहर से कर रहे है वो।

दिनेश जैन :-

महापौर मॅडम इनको आज लगा की लाइव्ह टेलिकास्ट होना चाहिए तो इतने दिन क्या यह लोग सो रहे थे।

(सभागृहात गोंधळ)

मा. उपायुक्त :-

शिक्षण अधिकारी यांनी शाळा क्र. १९ चे शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष ज्यांच्याकडे या शाळेची चावी अनेक वर्षापासून असते तर त्यांचा जबाब घेतलेला आहे. त्यानंतर शाळेच्या ज्या प्रमुख मुख्याध्यापिका आहेत त्यांचा या ठिकाणी जबाब नोंदविला आहे. या दोन्ही जबाबावरुन प्रशासन अधिकाऱ्यांनी जो रिपोर्ट सादर केला की सगळ त्या ठिकाणी शाळेचा गैरवापर आढळलेला आहे. आणि त्यामध्ये प्रिमायसेस प्लस शाळेमधून विद्युत जोडणी घेतली होती आणि त्या ठिकाणी त्याचा गैरवापर आढळून आल्यामुळे............

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब गैरवापर म्हणजे काय सांगा ना.

मा. उपायुक्त :-

प्रशासनाने जो निष्कर्ष केला आहे तो मी वाचून दाखवतो. दि. ३१/०७/२०१६ रोजी रविवारी मा. सभापती श्री. अनिल भोसले यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी प्रभाग कार्यालय किंवा शिक्षण विभाग यांची पूर्व

परवानगी न घेता महानगरपालिका शाळा १९ माशाचा पाडा या शाळेच्या मुख्य दरवाजाच्या कुलपाची चावी घेऊन शाळेचा वापर केल्याचे निदर्शनास येते. अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती श्री. हरी परशुराम पागेरा आणि प्र. मुख्याध्यापिका मनिषा पाठक सुरक्षारक्षक श्री. धनाजी पाठकर यांच्या जबाबावरुन सभापती अनिल भोसले यांनी त्यांच्यासमवेत अंदाजे १०० लोकांना घेऊन दि. ३१ जुलै रविवारी रोजी शाळेच्या उजव्या भिंतीच्या परिसरात पार्टी केल्याचे निष्पन्न होत आहे. त्याच्यानंतर प्रशासनाने त्यांना २ तारखेला नोटिस दिलेली होती की शाळेत पालिका सदस्य म्हणून कर्तव्य बजावत असताना आपण ३१ जुलै रोजी केलेली वर्तणुकीबाबत की मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील माशाचा पाडा येथील महानगरपालिकेची शाळा क्र. १९ तळ प्लस ४ मजल्याची इमारत आहे. सदर शाळा ३१ जुलै रोजी रविवार असल्यामुळे बंद होती. सदर शाळेच्या मुख्य दरवाजाची चावी शालेय व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष हरी परशुराम पागेरा यांच्याकडे असते आणि ३१ जुलै रोजी ३ वाजण्याच्या सुमारास मंडप डेकोरेटर राकेश पाटील यांनी आपले नाव सांगून शाळेच्या मुख्य दरवाजाच्या कुलपाची चावी घेतली आणि मनपा शाळेच्या भिंतीलगत उजव्या बाजूला शाळेच्या आवारात मंडप घालूप लाईट लावून अंदाजे १५० खुर्च्यांची मांडणी करण्यात आली त्यावेळी आपल्या समवेत १०० लोक शाळेच्या परिसरात आयोजित केलेल्या पार्टीमध्ये ते मद्यपान आणि चित्रपटातील गाण्यावर नृत्य करुन धुडगूस घातल्याचे झाल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त कार्यक्रमासाठी आपण महानगरपालिकेची परवानगी न घेता महानगरपालिका शाळेतील परिसरात खाजगी पार्टी आयोजित करुन महानगपालिका शाळेच्या परिसराचा गैरवापर केला आहे. त्याप्रमाणे आपण सदर पार्टीसाठी शाळेतील विद्युत पुरवठा विना परवानगी वापर देखील केला आहे. सदर बाब अशोभनीय असून आपण पालिका सदस्य आणि प्रभाग समितीचे अध्यक्ष म्हणून कर्तव्य बजावत असताना गैरवर्तणुक केल्याचे निदर्शनास आले तरी आपण सदस्य म्हणून कर्तव्य बजावत असताना गैरवर्तणुक केल्याबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३ नुसार आपणा विरुध्द कायदेशीर कारवाई का प्रस्तावित करण्यात येऊ नये. याचा खुलासा नोटिस मिळाल्यापासून ७ दिवसात इकडील कार्यालयात देण्यात यावा. सदर खुलासा येण्यास आपण कसुर केल्यास आपले काही म्हणणे नाही असे गृहित धरुन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याच्यात त्यांनी दि. ५/०८/२०१६ रोजी एक पत्र प्लस त्याच्यासोबत काही त्यांनी दस्ताऐवज दिलेले आहे की शाळेची इमारत जी आहे ती त्याची मालकी एका खाजगी व्यक्तीच्या नावाने म्हणजे सातबारा वगैरे अशा टाईपची आहे तर त्याची तपासणी सुरु आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

पोलीस स्टेशनला पत्र दिले का?

मा. उपायुक्त :-

पोलीस स्टेशनला याच्यामध्ये प्रभाग अधिकाऱ्यांना आपण अधिकार पत्र देऊन संबंधित गैरप्रकार बाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यासाठी अपिल दाखल केले आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब त्याच प्रभाग अधिकाऱ्यांनी यांना वाचण्याकरिता फक्त ट्रेस पासिंगचा गुन्हा दाखल केला. चोरीचा गुन्हा दाखल केला नाही. जी विद्युत चोरलेली आहे जे पाणी घेतलेले आहे त्याच्यावरती अजिबात ॲक्शन घेतलेली नाही. त्याच्यावर चोरीचा केस होऊ शकते. पण चोरीचा कलम लावला नाही फक्त ट्रेस पासिंगचा कलम लावलेला आहे. अस आपल्या प्रभाग अधिकाऱ्यांनी केले आहे. आपणांस विनंती आहे आयुक्त साहेब की आपण याच्यावरती चौकशी करुन ती वीज चोरी पाणी चोरी असेल तर त्याच्यावरती गुन्हा दाखल करावा.

मुन्ना सिंग :-

महापौर मॅडम चोरी का आरोप जो लगा रहे है चावी लीया किसने क्या किया उसका पुरा खुलासा करिए ना जरा।

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, सविस्तर खुलासा या ठिकाणी उपायुक्त विजयकुमार म्हसाळ साहेबांनी केलेला आहे. पोलीस स्टेशनला पत्र दिल्यानंतर ही पोलीस स्टेशनची जबाबदारी आहे. त्याच्यामध्ये चोरी झाली नाही कुठे लोक होते काय होते ती त्यांची जबाबदारी त्याच्यामुळे या महासभेमध्ये त्यांनी चोरी केली की नाही हा विषय महासभेचा किंवा प्रशासनाचा नाही आम्ही पोलीस स्टेशनला पत्र दिले आहे. कोणत्या कलमानुसार गुन्हा दाखल करायचा कोणत्या नुसार नाही करायचा हा त्याचा अधिकार आहे. त्याच्यामुळे त्यांचा अधिकार आपण ओढवून घेऊ शकत नाही. आम्ही पत्र दिले आहे. प्रशासनाने वेळीच कारवाई केलेली आहे त्याची दखल घेतलेली आहे. आणि जे काही असेल ते पुढे नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. पुढचा विषय घ्यावा.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब एक मिनिट आपल म्हणणे बरोबर आहे हे पोलिसांच काम आहे. आपण हस्तक्षेप करु शकत नाही. परंतु साहेब पोलिस हे काम बरोबर करत आहे की नाही चुकीच आहे हे साहेब आपलं कर्तव्य आहे ना. साहेब आज आपल्या पालिकेची वास्तु आहे ती. साहेब ते लाईट बील आहे ते लाईट बील आपण भरतोय.

मा. आयुक्त :-

त्यांच्या कामामध्ये आपण ढवळाढवळ करु शकत नाही. आपल्या कामात ते ढवळाढवळ करतात का. त्याच्यामुळे त्यांनी काय चौकशी करावी हा त्यांचा प्रश्न आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

बरोबर आहे पण तुम्ही त्यांच्या निदर्शनास आणुन द्या ना.

शरद पाटील :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब जेव्हा तुम्ही त्यांना नोटिस काढली नोटीस काढल्यानंतर ७ दिवसाची वेळ दिली आणि ७ दिवसाच्या आत तुम्ही गुन्हा कसा दाखल करु शकता. त्यांचा खुलासा तुम्ही मागितला त्यांची हिअरींग न घेता तुम्ही गुन्हा कसा दाखल केला.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, या २ गोष्टी वेगवेगळ्या आहेत. महानगरपालिकेच्या एखाद्या प्रॉपर्टीचे गैरवापर विदाऊट परमिशन करणं आणि त्याच्यामध्ये आपल्याला निष्कर्ष वाचुन दाखवलेला आहे आता की नेमके काय घडले होते. त्याच्यामुळे आपण असं घडलं होतं म्हणून त्याच्यासाठी आपण वेगळे हे केलेले आहे. पण त्या ठिकाणी लिकरची पार्टी झाली वगैरे असल्या तक्रारी टी.व्ही. वर बातमी आली. महापालिकेची बदनामी झाली तर त्यामुळे आपण त्यांच्याकडून जो खुलासा मागवलेला आहे तो महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये जी तरतूद आहे त्यानुसार पुढील कारवाई करण्यासाठी तो खुलासा मागवलेला आहे. त्याचा आणि हा गुन्हा दाखल करण्याचा संबंध नाही. असं जर समजा घडलं तर उद्याच्याला कुणीही शाळेचा ताबा घेणार कुणीही चावी मागवणार, कुणीही कुलुप तोडणार त्याच्यावर काही गुन्हा दाखल करायचा नाही अस म्हणणे आहे का आपलं.

शरद पाटील :-

आयुक्त साहेब तुम्ही सांगतात गुन्हा दाखल केला आणि सोयीस्कररित्या तुम्ही आता पेपरच्या बातम्या आणि मिडियाच्या बातम्या हे सोयीस्कररित्या जर त्याचा बदल करुन दाखवत असाल तर हे बरोबर नाही कारण तुमचं वक्तव्य आहे की पेपरच्या बातम्या किंवा मिडीयावर आलेलं सगळ काही खरं नसत हे आपण बोललात. आणि गुन्हा आपण ज्याच्यावर दाखल केला त्याने ताला तोडला हे तुम्हाला माहित होतं का? तुम्ही ज्याच्यावर गुन्हा दाखल केला ते चावी घ्यायला गेले होते का?

मा. आयुक्त :-

पेपरच्या बातमीवरुन आपल्याला माहिती मिळाल्यानंतर आपण चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. आपण बातमी वरुन त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला नाही. हे परत एकदा सांगतो. चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आपण त्यांच्यावर काय कारवाई करायची ती विविध मार्गाने केलेली आहे.

मा. महापौर :-

चौकशी अधिकाऱ्यांना जेव्हा तुम्ही विचारलं तेव्हा त्या माणसाने असं सांगितल की अनिल भोसले साहेब चावी घेऊन गेले होते. फक्त एक खुलासा मला पण पाहिजे साहेब की त्या वेळेस त्यांच नाव आल का चावी घेऊन जायला कारण त्या व्यक्तीला मी भेटले आहे आणि ते मला सांगत होते की अनिल कधीच आले नाही चावी घ्यायला.

(सभागृहात गोंधळ)

नयना वसाणी :-

महापौर मॅडम आदरणीय शरद पाटील आमचे गटनेते आहेत त्यांना अधिकार आहे आम्हाला सांगायचा.

प्रशांत केळुसकर :-

सन्मा. सदस्य आसिफ शेख ध चा मा करायच सोडा. नेहमीची सवय झाली आहे तुमची.

आसिफ शेख :-

तुम्ही ध चा मा करतायेत. बिचारे ते बोलतात त्यांना खुलासा पण करु देत नाही. त्यांचाही आवाज दाबतात पत्रकारांचा आवाज दाबतात. काय चाललंय काय?

ध्रुवकिशोर पाटील:-

सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली पडू नका आयुक्त साहेब.

मा. महापौर :-

ठिक आहे मला वाटते प्रशासनाने खुलासा दिलेला आहे आणि पुढील कारवाई पोलीस करणार आहेत आणि आता तो विषय आपण संपवू या इथे. पुढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम अति महत्वाचा मुद्दा आहे. या सभागृहाला महानरपालिकेला निगडीत आहे आणि गरजेचे आहे. वेळ निघून गेल्यावर विषयाला काही महत्व राहणार नाही. शहरामध्ये चर्चा वर्तमानपत्राच्या माध्यमातूनच चर्चा आहे की आयुक्तांची बदली होणार. खरतर आयुक्तांना या शहराचा पदभार सांभाळून वर्ष मला वाटते होत आलेले आहे. दिड वर्ष भौगोलिक रचना समजेपर्यंत एका आयुक्ताला ६ महिने, ८ महिने असेच उलटतात. नंतर काम करण्याची पध्दत. आता आयुक्तांनी अस दिड-दिड वर्षामध्ये बदल्या झाल्या तर

शहराचा विकास कसा होणार. वर्षभरानंतर तर आपल्याकडे निवडणूक लागणार आहे. म्हणजे आमची तुम्हाला विनंती आहे शासन तुमचं, सरकार तुमची केंद्रामधून राज्य............

मा. महापौर :-

आपण अनुभवी नगरसेवक असताना हा आपल्या महासभेचा विषय आहे का?

जुबेर इनामदार :-

नाही ना. विषय महासभेचा नसला तरी या शहराशी निगडीत आहे ना.

मा. महापौर :-

हे बघा बदली हे आपल्याकडून होत नाही.

जुबेर इनामदार :-

मान्य आहे ना आम्ही तुम्हाला विनंती करतो की तुम्ही जा शासनाकडे दाद मागा की हे असं आमच्याकडे तुम्ही करु नये. आता वर्ष दिड वर्षच फक्त उलटलेले आहे, आयुक्तांना येऊन त्यांना काम करु द्या. त्यांनी एक मोठी भूमिका होतात घेतली आहे रस्ते रुंदीकरणाची. सत्ताधारी आहेत ते. केंद्रामधून राज्यापर्यंत त्यांची सत्ता आहे.

मा. महापौर :-

मैं आप सभीसे विनंती करना चाहूँगी की महासभेमें वो ही विषय लिए जाए जो यहाँ हम उसपे निर्णय या हमारे अधिकार में है। जो चीज हमारे अधिकार में नही है वो विषय लेके महासभा का समय बर्बाद ना करे।

(सभागृहात गोंधळ)

नगरसचिव :-

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. जुबेर इनामदार यांचा प्रश्न आहे.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम, इतना शहर के लिए गंभीर विषय है और आप इसके उपर बिलकुल ध्यान नही दे रहे हो।

(सभागृहात गोंधळ)

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम आमची विनंती आहे महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री महोदयांना तुम्ही विनंती करा मुख्यमंत्री महोदयांनी इलेक्शन होईपर्यंत अच्युत हांगे साहेबांना इथे ठेवण्याची आमची कळकळीची विनंती आहे. आपण करु शकता आपली सत्ता वरखाली आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम पूर्ण सभागृहाची विनंती आहे की तुम्ही प्रयत्न करावा. आज आमदार जागेवर नाही. खर तर ते आता समजत नाही या विषयावर नरेंद्र मेहता का उलटा चष्मा का.

मा. महापौर :-

जुबेरजी आपल्याला प्रश्नोत्तराला वेळ दिलेला आहे. बोलायचं असेल तर बोला नाहीतर मी पुढचा प्रश्न घेते.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम नोकरी म्हटल्यानंतर बदली आली आणि शासनाचे ज्या-ज्या वेळी आदेश प्राप्त होतील त्यावेळी आम्हाला या ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी जावं लागतं त्याच्यामध्ये आपल्याला वाईट वाटून घ्यायची गरज नाही. शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर रिन्युवल ज्या दिवशी येतील त्या दिवशी सकाळी मी चार्ज देणार आहे. या महापालिकेचा आणि त्याचा विषय सभागृहामध्ये आपण त्याच भांडवल बिलकुल करु नये अशी आपल्याला नम्र विनंती आहे.

जुबेर इनामदार :-

आमच प्रेम आहे तुमच्यावर.

वंदना चक्रे :-

साहेब बरोबर आहे पण विकास होत नाही ना.

मा. महापौर :-

आपला क्वेशन तास चालु आहे आणि तेवढाच वेळ त्यांना देणार आहे. प्रश्न वाचलेला आहे.

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम ठराव करा ना. आयुक्त महोदयांना इथे ठेवण्यासाठी ठराव करु शकतो ना. महापौर मॅडम कायद्यात तरतूद आहे. सूचना करते मी ठराव करा म्हणून.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम मला वाटते माझ्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी उपायुक्त (मु.) येथे उपस्थित आहे. प्रश्नाचं उत्तर तुम्ही मला लेखी दिलेले आहे. पण त्याच्यामध्ये माझा छोटासा फक्त परत एक प्रश्न राहिलं. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय पारित केले आहे. हा तुमचाच विषय आहे साहेब आस्थापनेचा विषय प्रश्न ३८. प्रश्नोत्तराचा तासाचा तास निश्चित नाही. नाही तर परत पुढच्या वेळी आपली काही हरकत

नाही. साहेब मी फक्त त्याच्यामध्ये विचारलं आहे गुन्हा दाखल करण्याचा निर्णय पारित केलेला आहे. तो गुन्हा काय दाखल केला ते विचारायचं. मधील कलम ३९७ क २ अन्वये गुन्हा दाखल करण्याचा निर्णय पारित केलेला आहे तो गन्हा दाखल केलेला आहे का?

मा. उपायुक्त :-

मा. महपौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आपण जो ठराव पारित केला होता २०१४ मध्ये श्री. श्रीकृष्ण मोहिते यांच्यावरती कलम ५६ (२)अन्वये निलंबनाची कारवाई करणे आणि ३९७ क अन्वये, गुन्हा दाखल करण्याबाबत निर्णय केलेला आहे. तर याबाबत गुन्हा दाखल नाही झालेला आणि विखंडीत सदर जे ठराव आहेत ७१ हा विखंडीत करण्यासाठी प्रधान सचिव यांच्याकडे सादर केलेले आहे शासनाकडे.

जुबेर इनामदार :-

काय झाल त्याच?

मा. उपायुक्त :-

नाही विखंडनाबाबत अजून शासनाकडून काही आलेले नाही.

जुबेर इनामदार :-

म्हणजे त्यांनी उत्तर नाही दिले म्हणजे तो त्याचा अर्थ ३० दिवसाच्या आतमध्ये शासनाने त्याचं उत्तर नाही दिलं. अपल्याला अपिल पिरेड असतो. तो अपिल पिरेडसुध्दा उलटला म्हणजे तो ठराव पारित झाला मान्य झाला. त्याच्यावर तुम्हाला कारवाई करावी लागेल.

मा. उपायुक्त :-

शासनाने किती दिवसात करावं असे काही नाही.

जुबेर इनामदार :-

नाही पण तुम्हाला शासनाने तुम्ही विखंडीतसाठी पाठविला शासनाने तो विखंडीत केला की नाही हे तुम्हाला माहित आहे का? ४५१ नंतर तुम्ही विखंडनला पाठवला असेल तो विखंडीत झाला की नाही झाला. तो नाही झाला असेल तर तुम्हाला एका महिन्यानंतर परत त्याला अपिल पिरेड असतो. तोही तुमचा उलटला म्हणजे याचा अर्थ काय झाला. झाला की नाही डिम.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम एखादा ठराव महासभेने किंवा स्थायी समितीने जर पारित केला आणि तो विखंडनला पाठवला म्हणजे गोषवाऱ्याच्या विरुध्द ठराव केला म्हणून विखंडनला पाठवला त्याच्यावरती शासनाने किती दिवसात निर्णय घ्यावा हा तो शासनाचा अधिकार आहे. त्याला काही बंधन नाही. आणि जर समजा ४० दिवस उलटले तर डिम टू बी सॅग्शन असं कुठे प्रोव्हिजन नाही त्याच्यामुळे शासनाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय याचा अर्थ हा ही लागत नाही की त्यांनी आयुष्यात म्हणजे कधीच त्यांनी पाठविला नाही उत्तर कधी त्याचा पाठपुरावा ही करणार नाही. त्याच्यानंतर परत आम्ही त्यांना पाठपुरावा केला का या विषयावर की आम्ही विखंडनला पाठवला तुम्ही त्याच्यावरती काय निर्णय घेतला. शासनाने निर्णय घेऊन निकाली लावावा लागेल ना. साहेब हा मिनिट्सवर येतो विषय.

मा. आयुक्त :-

बरोबर आहे. त्याच्यामध्ये शासनाकडे पाठपुरावा करण्याची स्मरणपत्र देऊन पुढील कारवाई करण्यांत येईल.

जुबेर इनामदार :-

आणि गुन्हा दाखल करण्यासंदर्भात निर्णय केलेला आहे. तर हा गुन्हा कोण दाखल करणार.

मा. आयुक्त :-

हे बघा तो ठराव विखंडीत करायला पाठवला म्हणजे गुन्हा दाखल करण आणि तो ठराव त्याच्याबद्दलच सगळ तो ठरावच पाठवला विखंडनला म्हणून गुन्हा दाखल करण्याचा प्रश्न येत नाही.

जुबेर इनामदार :-

मग साहेब मला उत्तर अस कस दिल. श्रीकृष्ण मोहिते यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५६(२)४ अन्वये निलंबनाची कारवाई करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधी कलम ३९७ क(२) अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत निर्णय पारित केलेला आहे. टाईपींग मिस्टेक आहे का?

मा. आयुक्त :-

जुबेरजी आता मी तुम्हाला सांगण म्हणजे मला योग्य वाटत नाही. कारण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील सर्व कलम तुम्हाला पाठ आहेत आणि तो अधिकार कुणाला आहे हे सुध्दा तुम्हाला माहित आहे. त्याच्यामुळे कुणी कुणाला निलंबित करावं यासाठी ठराव पारित झाल्यानंतर निलंबित करता येतं असं कायद्यामध्ये प्रोव्हिजन नसताना असा ठराव पारित झालेला असल्यामुळेच शासनाकडे विखंडीत करण्यास पाठविलेला आहे. २०१४ मध्ये हा ठराव पारित झालेला आहे. त्यामुळे आपल्याला जे उत्तर दिले आहे ते एकदम बरोबर उत्तर दिलेले आहे. तुम्हाला उत्तर दिलेले ते चुकीचे दिलेले नाही. बघा ठराव काय पारित करावा हा तुमचा अधिकार आहे पण तो कायद्यानुसार पारित केला तर त्याची अंमलबजावणी करण हे

माझ्यावर बंधनकारक आहे. जर तो बेकायदेशीर असेल तर त्याला विखंडनला पाठविणे ही माझी नैतिक आणि वैयक्तीक जबाबदारी आहे. ते पाठवले आहे आता त्याचं उत्तर कधी शासनाकडून येईल त्यासाठी आम्ही स्मरणपत्र देऊ. शासनाकडे पाठपुरावा करु आणि त्याच्यामध्ये काय निर्णय जो येईल तो त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल. कृपाकरुन आता हा विषय संपवावा असे मला वाटते.

जुबेर इनामदार :-

म्हणजे तुम्ही त्याचा पाठपुरावा करणार. स्मरणपत्र पाठवणार हे आम्ही तुमच्याकडे अपेक्षा करु शकतो. धन्यवाद.

नगरसचिव :-

आजच्या सभेला २ लक्षवेधी आलेल्या आहेत. एक श्री. ध्रुवकिशोर पाटील. दुसरी श्री. दिनेश जैन.

निलम ढवण :-

महापौर मॅडम मला एक विचारायचं आहे. अनुपालनमध्ये जे उत्तर दिली आहेत. तर ते तुम्ही याच्यानंतर घेणार आहात का अगोदर विचारु.

मा. आयुक्त :-

ते माहितीसाठी दिलेत मॅडम आपल्याला.

निलम ढवण :-

त्यात एक चुक आहे सर म्हणून मला विचारायचं आहे.

मा. आयुक्त :-

एक मिनिट मागच्या सभेमध्ये असं सांगण्यात आलं होत की जे सभेमध्ये निर्णय होतात त्याची अंमलबजावणी काय होते याची माहिती सभागृहाला दिली जात नाही म्हणून आम्ही आपल्या माहितीस्तव सगळी कॉपी दिलेली आहे. आपण सांगितल्याप्रमाणे आपण म्हणतायेत की काही चुक झाली त्याची दुरुस्ती करण्यात येईल.

निलम ढवण :-

मग तेच मी निदर्शनास आणुन देऊ इच्छिते का? २८/६/२०१६ सन्मा. सदस्य श्री. राकेश शहा यांचे दि. ३०/४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. भारतरत्न माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत. उत्तर आहे. कार्यवाही सुरु करण्यात आली. त्याचवेळी मी एक सूचना मांडली होती की आपले महाराष्ट्रातील थोर पुरुष ४ जणांची नावे दिली होती आणि ती सूचना महापौर मॅडम आपण ती घेतलेली होती तर त्या चारही संतपुरुषांच्या नावाचा उल्लेख याच्यात नाही.

मा. आयुक्त :-

महासभेचा जो ठराव पारित झाला असेल त्याप्रमाणे विषय घेतला असेल ते परत एकदा तपासून घेण्यात येईल. ठरावामध्ये जर ते नाव नमुद असतील तर यात नमुद करण्यात येईल.

निलम ढवण :-

ठिक आहे. म्हणुनच निदर्शनास आणल नाहीतर दोन्ही फक्त पुतळ्यांचा प्रस्ताव पुढे जाईल आणि बाकीचे राहून जाईल आपण ते घेण्यात यावे.

नगरसचिव :-

दिनेश जैन यांच्या लक्षवेधीचे वाचन. अशा दोन लक्षवेधी आलेले आहेत. पहिली लक्षवेधी श्री. ध्रुवकिशोर पाटील, दुसरी लक्षवेधी दिनेश जैन यांची. मी दोन्ही लक्षवेधी महापौरांकडे सूपूर्त करतो.

मा. महापौर :-

श्री. दिनेश जैन यांची लक्षवेधी स्विकारण्यात येत आहे. दिनेश जैनने बोलावे त्यांच्या विषयावर.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम आमची लक्षवेधी तुम्ही का स्विकारली नाही त्याच कारण सांगा ना.

मा. महापौर :-

मी त्यांना बोलायला संधी दिली आहे आपण त्यांना बोलू द्या.

ध्रुवकिशोर पाटील :-

त्यांना बोलु द्या पण लक्षवेधी मी काय मांडलेली आहे ती शहराशी निगडीत आहे की नाही. ती अत्यावश्यक आहे की नाही.

मा. महापौर :-

नगरसेवकांनी मांडलेली हरएक लक्षवेधी शहराशी निगडीतच असते. आपण बसून जा. मी त्यांना वेळ दिलेला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम मी अगोदर लक्षवेधी दिलेली आहे. त्यांनी नंतर दिलेली आहे. ॲटलिस्ट लक्षवेधी वाचून दाखवा ना मॅडम.

मा. महापौर :-

त्यांना बोलू द्या.

सुरेश खंडेलवाल :-

लक्षवेधी वाचून दाखवा ना काय प्रॉब्लेम आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

विषय किती इर्म्पोटन्ट आहे हे सभागृहाला कळेल ना.

सुरेश खंडेलवाल :-

कोणाची लक्षवेधी स्विकारायची याचा अधिकार तुम्हाला आहे. पण लक्षवेधी वाचून दाखवायला काही हरकत नाही.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम आमची पण लक्षवेधी किती इर्म्पोटन्ट आहे.

मा. महापौर :-

मी आपल्याला विनंती करते आपण बसून जा. त्यांना त्यांची लक्षवेधी मांडू द्या. आप लोग बैठ जाइए। उनको मैंने समय दिया है। उनको बोलने दिजीए। जब आपका आएगा तब आप बोलिए। उनको बोलने दिया जाए।

दिनेश जैन :-

महापौर मॅडम बहुत बहुत धन्यवाद आपका आपने इस विषय पे मेरी लक्षवेधी स्विकार की इसके लिए। मिरा भाईंदर शहरात डासांचा प्रार्दुभाव वाढून या साथीच्या भयानक आजाराचा फैलाव होत असल्याबाबत। महापौर मॅडम आज मिरा भाईंदर में अभी फिलाल बारीश का मौसम भी चल रहा है और डेंग्यू, मलेरीया। यह विषय पुरे महाराष्ट्र के लिए पुरे हिंदुस्थान के लिए गंभीर विषय है क्योंकी डेंग्यू एक साधारण परिवार या गरीब परिवार को भी डेंग्यू होता है तो उसकी हालत क्या होती है उसको पता रहता है। उसकी सारी पूंजी एक खाली मच्छर काटनेसे चली जाती है। इसलिए महापौर मॅडम इस विषय को आपने बारीश को ध्यान में रखते हुए मिरा भाईंदर की समस्या को ध्यान में रखते हुए आपने स्विकार किया इसके लिए एकबार फिर धन्यवाद। इस विषय में मेरा इस डिपार्टमेंट के अधिकारी से कुछ सवाल है। मैं उनसे पुछना चाहता हूँ तो संबंधित अधिकारी मेरे इन कुछ सवालो का जवाब दे सभागृह को।

ध्रुवकिशोर पाटील :-

वो लक्षवेधी है सवाल जवाब नही।

दिनेश जैन :-

लक्षवेधी है मालुम है। लेकिन

(सभागृहात गोंधळ)

ध्रुवकिशोर पाटील :-

एक लाईन क्या बोल दिया सिधा सवाल जवाब कर दिया। यह सवाल जवाब का समय नही है। उन्होंने बोलना चाहिए ना की लक्षवेधी में क्या तकलीफ है। अरे बोलो ना उसके बाद उनसे सवाल पुछो। क्या-क्या हो रहा है। उसकी क्या प्रॉब्लेम है बोलना चाहिए ना।

दिनेश जैन :-

ध्रुवकिशोरजी मुझे मालुम है आप बहुत ज्ञानी हो, अंर्तयामी हो और सबकुछ हो लेकिन अगर कोई सदस्य की भावना है की अगर मिरा भाईंदर का अच्छा हो सकता है तो आप उसको क्यों कुछलते हो।

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

अगर डेंग्यू का प्रॉब्लेम मिरा भाईंदर में है उसके उपर अगर लक्षवेधी रहे तो प्रॉब्लेम है क्या?

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम लक्षवेधी विरोधी पार्टी के लोगो को देनी चाहिए।

मा. महापौर :-

आप बैठ जाइए। मैंने आपको बोलने की परवानगी नही दी है।

ध्रुवकिशोर पाटील :-

आप तो महापौर है आपकी सत्ता है आपको ऑलरेडी रेमिडियस बिल गये दिए थे अरे लक्षवेधी तो हमारी होनी चाहिए।

शरद पाटील :-

महापौर मॅडम लक्षवेधी विरोधकों को देनी चाहिए इससे में सहमत हूँ। पर २० साल से आपने लक्षवेधी विरोधकों को दि है क्या कभी बोलने को? उनकी लक्षवेधी कभी ली है क्या? नही ली है।

ध्रुवकिशोर पाटील :-

हमने विरोधकोंको लक्षवेधी लेने को दिया है।

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

महापौर मॅडम मिरा भाईंदर शहराच्या आरोग्या संदर्भात महत्वाचा विषय सर्व सदस्यांसाठी आणि मिरा भाईंदर शहरासाठी महत्वाचा आहे. आपआपसात चर्चा करण्यापेक्षा डेंग्यू मलेरीयाने ग्रासलेले मिरा भाईंदर शहर आहे त्या संदर्भातच चर्चा व्हावी. आपआपसातील ही चर्चा बंद करुन वेळेचे महत्व लक्षात घेऊन त्या विषयावर चर्चा व्हावी.

मिरादेवी यादव :-

महापौर मॅडम, आज जो बोल रहे है ध्रुवकिशोर पाटील भाई मुझे याद आया की मेरी ही लक्षवेधी थी। काशिमिरा पुलीस चौकी के पिछे बिल्डींग की दिवार गिरी थी ११ लोग मरे थे। तुळशीदास म्हात्रे नगरसेवक थे। मेरा लक्षवेधी नही लिया। मैंने बहुत कुछ किया मगर लक्षवेधी लिए नही। यहाँ तक की हमे सस्पेन्ड कर दिए मगर लक्षवेधी लिए नही।

ध्रुवकिशोर पाटील :-

यह बात गलत है मॅडम क्योंकी उस सभागृह में हम भी उपस्थित थे और ऑलरेडी इस विषय पे चर्चा हो रही थी। और उनको महाराष्ट्र सरकार ने सभी को १-१ लाख रुपये मरने के बाद उनको दिया भी था।

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

ध्रुवकिशोरजी आपको लगता है क्या इस विषय पे चर्चा नही होनी चाहिए।

मा. महापौर :-

दिनेशजी एक मिनिट मुझे लगता है की महासभा में सभी नगरसेवक शहर के विषय लेके आते है। यह हम आपस में लढके लोगो को क्या संदेश दे रहे है। आप लढिए लेकिन कमसे कम शहर के विषय को लेके लढिए। आपकी पार्टीने क्या किया, हमारे पार्टीने क्या किया था यह विषय महासभा का नही है। आप बिना अनुमती खडे नही होंगे।

दिनेश जैन :-

ध्रुवकिशोरजी यह भी मिरा भाईंदर शहर का ही विषय है। बोलने दो लोगो का भला ही होगा किसी का बुरा नही होनेवाला है। महानगरपालिका मिरा भाईंदर के अंदर आज डेंग्यू मलेरिया बहुत बडी मात्रा में बहुत लोगो को हो रहा है। उसके उपर अपने प्रशासन की तरफ से क्या-क्या उपाययोजना की जा रही है फिलाल। उसकी माहिती भी थोडी सभागृह को मिलेगी तो मेरे हिसाब से अच्छा रहेगा तो सभागृह के हर एक सदस्य को मालुम पडना चाहिए की क्या मिरा भाईंदर में डेंग्यू के विषय में हो रहा है। मेरा पुछने का मतलब यही था की में अकेला बोलू इससे अच्छा पुरे सभागृह को मालुम पडे।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो जैन साहेबांनी जी लक्षवेधी उपस्थित केली त्या संदर्भात सविस्तर अहवाल मी तुम्हाला सांगतो. महानगरपलिकेत १२० कर्मचारी आहेत. जवळपास ३२ आपले मल्टीपर्पज वर्कर आहेत. आपल्याकडे टोटल ८ टेम्पो आहेत कार्यरत. ३ नविन टेम्पो सुध्दा घेतलेले आहेत. आपण आता नॅशनल रेक्टर बॉन डिसीस जे औषधे त्यांनी प्रिस्क्राईब केलीत त्या पध्दतीने आपण औषध घेतोय. आपल्याकडे एम.एल.ओ आहे केरोसीन आहे नीम ऑईल आहे. आपल्याकडे जवळपास १००० डेंग्यूचे किटस् आहेत. १००० डेंग्यूचे किटस् प्रत्येक आरोग्य केंद्रात ठेवलेले आहेत. टेंबा रुग्णालयात आहे, इंदिर गांधी रुग्णालयात आहेत लेफ्टोचे चे १०० किटस् सुध्दा आहेत आपल्याकडे. आता जानेवारी पासून ते आतापर्यंत किती लागण झाली आणि किती आपल्याकडे पेशंटस् आहेत याची थोडी तुम्हाला माहिती सांगतो. आपल्याकडे मलेरियाचे जवळपास ९६ रुग्ण आढळून आले. डेंग्यूचे १५ पैकी ७ पॉझिटिव्ह आले. जोपर्यंत आपल्याकडे पॉझिटिव्ह टेस्ट येत नाही तोपर्यंत आपण त्याला कन्फमेशन म्हणत नाही. महरनगरपालिकेत एप्रिल पासून आतापर्यंत काय काय केले ते एप्रिलपासून ते जुलैपर्यंत कन्टेनर सुरु केलेले आहेत. जवळपास १७७६० ठिकाणी आपण गट सॅम्पल आपण लोकांचे घेतलेले आहेत. त्यापैकी आरोग्य केंद्रात ७७८४ आरोग्य केंद्रामध्ये त्याचे ब्लड सॅम्पल कलेक्ट करुन त्याच्यात मलेरियाचे पॉझिटिव्ह आहेत का? डेंग्यूचे पॉझिटिव्ह आहेत का ते बधितलेले आहे. तसेच घरोघरी जाऊन एम.पी.डब्ल्यू आपल्या ज्या नर्स आहेत त्या घरोघरी जाऊन सुध्दा जवळपास ९९०५ लोकांचे ब्लड सॅम्पल घेतलेत. त्याच्यापैकी ९७ आपल्याला पॉझिटिव्ह मलेरीयासाठी आले आहेत. खाजगी हॉस्पीटलमध्ये सुध्दा प्रत्येक ठिकाणी नर्स जाते. आपल्या आया जातात आणि त्या ठिकाणी मलेरियाचे पेशंट असेल, डेंग्यूचे पेशंट असेल त्याची माहिती घेऊन आजूबाजूला सर्व्हेक्षण करुन त्या ठिकाणी सुध्दा आपण स्प्रेईग करतो. जवळपास आपल्याकडे १५८ ठिकाणी कन्स्ट्रक्शन साईट चालू आहेत. जवळपास २२१५ ठिकाणी १५ कर्मचाऱ्याला तपासणी करुन त्यात ट्रीटमेंट सुध्दा केलेली आहे.

मुन्ना सिंग :-

पानपट्टे साहेब कितना टेम्पो है।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

८ टेम्पो है टोटल।

मुन्ना सिंग :-

८ की ६.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

८

मुन्ना सिंग :-

किधर है ८ टेम्पो चालु है क्या?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

बताता हूँ। प्रभाग समिती १ मे १ है। सब यादी है मेरे पास।

मुन्ना सिंग :-

यादी है वो यादी सभी नगरसेवक को दो। और महापौर मॅडम खुद आप जानकारी लिजीए। टेम्पो अभी तक ५ था कल तक। अभी ३ बढ गए। नया अभी आज रातको ले लिया होगा तो हमें कुछ जानकारी नही उसका। लेकिन कल ५ था आज ८ हो गया। शाम तक १०-१२ हो जाएगा। लेकिन टेम्पो कही चल नही रहा किसी प्रभाग में।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

नही-नही कैसा है साहब जरुरत पडती है। अभी ८ है अपने पास अभी ................

मुन्ना सिंग :-

महापौर मॅडम टेम्पो का नंबर लेके जरा.

दिनेश जैन :-

मेरा लक्षवेधी है मेरे को बोलने तो दिजीए। बाद में आप सब सवाल पुछिए। पानपट्टे साहेब आता आपल्याकडे जे डेंग्युची जी दवा आपण सद्यपरिस्थितीत म्हणजे कुठली कुठली दवा वापर करतो त्याची मला यादी देण्यात यावी.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

डेंग्युला स्पेशल दवा नसते त्याला सिम्थॅपटीक ट्रिटमेन्ट असते.

दिनेश जैन :-

याच्यामध्ये आपण एम टी व्हायल पायरोसिन अशी किटकनाशक डेंग्यूची जी काही दवा आहे आणि त्याच्यामध्ये पावडर पण आपण शिंपडणी करतो.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

डेंग्यूची दवा नाही साहेब ती. मलेरीया डासांची औषधे आहेत ती. तुम्ही वाचता ना ती डासांची औषध आहेत.

दिनेश जैन :-

हा डासांची आहेत. डेंग्यूचे ते डास असतात त्या ठिकाणी आपण करतो तर आपण हे जे सर्व प्रभागामध्ये मतलब हर एक प्रभाग में आप यह दवा किस हिसाब से डिस्ट्रीब्युशन करते हो।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आवश्यकतेनुसार साहेब.

दिनेश जैन :-

आता आपल्याला मिरा भाईंदरमध्ये मागच्या ३ महिन्यापासून डेंग्यू का दवा नही था। वो क्यों नही था?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

माझ्याकडे आहे त्या स्टॉकची माहिती सांगतो ना. एम.एल.ओ. ५००० लिअर आहे., पायरोसिन १५०० लिटर आहे. माझ्याकडे यादी आहे ना किती शिल्लक आहे ते.

दिनेश जैन :-

आपल्याला आता महासभेमध्ये सांगितल होत की धुरफवारणी करायची. आता पानपट्टे साहेब महासभाने यह ठराव भी मंजूर किया था धुर फवारणी करने का धुर फवारणी करने से क्या है कम से कम मच्छर कम होंगे। लेकिन आपने उस विषय को गंभीरता से नही लिया और अभी कैसा है की हम सभी प्रतिनिधी को वॉर्ड में जाना पडता है। वहाँ पे आज कोई भी पेशंट रहता है तो वो लोग नगरसेवक पे आक्षेप करते है आप पे नही आता है। तो उसके लिए आप क्या सोच रहे हो। किस बारे में सोच रहे हो धूर फवारणी के लिए।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

धुर फवारणी खर्च जास्त आहे. आपण मध्यंतरी थांबवले होते साहेब. आता सगळ्यांनीच मागणी असेल तर आता दिड कोटीच शिल्लक आहेत.

दिनेश जैन :-

आता आपल्याला ज्याच्यामध्ये तरतूद केलेली होती.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

पुर्नःविनियोजन करुन घेऊ ना सगळ्यांची मांग असेल तर.

दिनेश जैन :-

तस नाही. आपने क्या बोला था उस टाईम पे महासभा में हम लोग अभीसे धूर फवारणी करेंगे। मुन्ना सिंहजी सभागृह नेता ने भी बोला था की, अपने को कुछ भी हो धूर फवारणी करने का सभी

नगरसेवकने बोला उसके बाद में भी आपने कोई ठोस कारवाई नही की। उसके वजह से हम को लोगो के बीच जाना कठीन हो गया है। बॉम्बे में चालु है आप कभी करेंगे यह।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

सप्टेंबर के बाद सर।

सुहास रकवी :-

महापौर मॅडम, जैसे इन्होंने बोला बजेट का तो बजेट का रिअप्रोप्रिएशन कर सकते है। यह सब तुम रिजन मत दो। आणि पहिली गोष्ट तुम्ही ती चुकीची माहिती दिली शहराची लोकसंख्या किती १२ ते १५ लाख. ९००० मध्ये गेले.

मा. महापौर :-

मुझे लगता है आपको परमिशन देते है तो उसका पालन करिए। उनको पहले बोलने दिजीए।

दिनेश जैन :-

पानपट्टे साहब, प्रकाश जाधव एम.डी. फिजिशियन इनको आपने एम.पी.डब्ल्यू का डिपार्टमेंट दिया हुआ है। तो उनके निचे कितना स्टाफ है अभी। डेंग्यु हा जो सर्व्हेक्षण करते है।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

३२.

दिनेश जैन :-

३२ तो उनको बुलाइए कुछ सवाल मुझे उनसे भी पुछने है की उन्होंने क्या-क्या किया है इन ३२ स्टाफ का? जो डेंग्यू का है तो इतना सिरियस विषय है उसके उपर उन्होंने जैसे ३२ है तो उसमे से।

राजेंद्र जैन :-

जब तक डॉ. जाधव आते है मैं डेंग्यू के उपर हर साल मौसम आता है सिजन आता है मानसून का........

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम यह अन्याय हो जाएगा। हमको भी बोलने दिजीए।

दिनेश जैन :-

महापौर मॅडम अभी कितने डॉक्टर है जो एक चिज के लिए कितने डॉक्टर नेमे हुए है। और कितने नेमने चाहिए। अपने यहाँ जो डॉक्टर की संख्या है अभी कितनी है?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

कौनसे, किधर? इंदिरा गांधी हॉस्पीटल टेंभा हॉस्पीटल

दिनेश जैन :-

डेंग्यू के लिए अपन जो ये डेंग्यू, मलेरिया के लिए कोई अलग से डॉक्टर है क्या?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

नही स्पेशल डॉक्टर नही है।

दिनेश जैन :-

तो उसके लिए कोई अपना प्रावधान है क्या? अलग से कर सकते है डेंग्यू के लिए।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

अभी डॉक्टर भरती होने के बाद १ स्पेशल डॉक्टर रखेंगे।

दिनेश जैन :-

तो इसको एक अलग डिपार्टमेंट क्यों नही करते है। मिरा भाईंदर में आज डेंग्यू का इतना बडा प्रकोप मतलब मलेरिया हो या कोई भी हर जगह होता है। जिसके घर में मौत होती है उसको मालुम पडता है की उसका कितना बडा दुःख होता है।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आपका सुझाव अच्छा है। अभी टेंबा में भरती होने के बाद इसके लिए स्पेशल डॉक्टर रखेंगे।

दिनेश जैन :-

इनडोअर जो करते है उसके अंदर अभी आपने कितनी जगह पे इनडोअर कार्यक्रम चलाया है मिरा भाईंदर शहर में।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

इनडोअर में कन्टेनर सर्व्हे किया है हमने।

दिनेश जैन :-

इनडोअर है ना साहब बहुत जगह पे हो नही रहा है। मिरा भाईंदर के अंदर क्योंकी वो मिरा भाईंदर में बहुत जगह पे आपके लोग जाते होंगे या नही जाते होंगे पता नही लेकिन कोई करने देता है कोई नही करने देता। लेकिन कम से कम सोसायटी के बाहर में जो कचरा निकलता है जो मलबा जमता है उसके उपर तो आपको स्प्रेईग करनी चाहिए ना ताकी कम से कम वो डेंग्यू अंदर तो नही जाए सोसायटी में। ना इनडोअर हो रहा है ना आऊटडोअर हो रहा है तो उससे तकलीफ हो रही है। अभी मेरा यही कहना है की आप इनडोअर और आऊटडोअर जो बोल रहे हो इनडोअर का अपने पास कोई बजेट है क्या नही तरतूद का उसी में से करते है।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

उसमें से ही खर्चा करते है। जहाँ पॉजिटिव्ह पेशंट है उसको इनडोअर स्प्रेईग करते है।

दिनेश जैन :-

जाधव सर आपके पास में कितना स्टाफ है? एम.पी.डब्ल्यू के लिए.............

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

वंदनाजी आप बैठ जाइए।

राजेंद्र जैन :-

महापौर मॅडम थोडासा इस विषय के उपर ढंग से बात करना चाहूँगा जो २ मिनिट सभागृह में शांती रहेगी तो अच्छा होगा। हर बार यह डेंग्यू का विषय आता है। और चिल्लम चिल्ली करके खतम कर दिया जाता है। हकिकत की बात क्या है की, डेंग्यू के बाद बिमारीया बहुत होती है। बहुत लोगो को तकलीफ होती है। कई कारण होते है। डेंग्यू जो है एक मच्छर के वजह से होता है और मच्छरो को मारना सोसायटी का फर्ज है। मैं आपको एक बात बोलता हूँ एम.टी.एम.एल ने काम किया अभी इस बारीश के मौसम में सोसायटी में उन्होंने खोदा निकाला और इट पत्थर अभी तक पडा है। वहाँ पे पानी भी इकठ्ठा होता है। वहाँ मच्छर पडे हुए रहते है। इनके पास मे सुविधा है की यह डिपार्टमेंट उसको हटा दे वहाँ से। बिल्डींग मटेरियल प्रायव्हेट बिल्डींग, रॅबीट यह सारा काम जो होता है क्या हमारे पास एक सिंगल लोड एजन्सी है जो सबपे कन्ट्रोल कर सके। यह क्वेशन के लिए की डेंग्यू क्यों फैसला है इसके लिए अकेला आरोग्य डिपार्टमेंट जिम्मेदार है ही नही। इसमें पी.डब्ल्यू.डी. वॉटर डिपार्टमेंट इक्वली इसमें जिम्मेदार है। आप एक ऐसी एजन्सी बनाओ आज जगह जगहपे मैं सुबह सुबह गया ३ सोसायटी के अंदर सब जगह मे एम.टी.एम.एल. ने खोदा है। पत्थर, टायर, रेती, मिट्टी यु की यु पडी है। गिली पडी हुई है। पानी रुकके डेंग्यु नही होगा तो क्या होगा मुझे बताइए। उसके लिए आरोग्य डिपार्टमेंट क्या करेगा क्या सारा पत्थर निकालेगा। दुसरी बात रॅबीट के साथ साथ में यह जो दुसरा भी काम होता है जितना भी रॅबीट पडता है सारा सारा मॅन पावर की बात करते है। यह सारा काम है लेकिन अगर वहाँ पडा हुआ है साईट पर तो उसके लिए क्या है? प्रावधान क्या है? अगर सोसायटी में किसीने काम कराया है रॅबीट बाहर पडा है। आपकी उपविधी तयार है दंड करने की मुझे बताइए। उपविधी दंड करने के लिए तयार है क्या? अभी तक नही है दंडीत करने की, तो कैसे रोकोगे इसपे भाषण या चर्चा करने से काम हो जाएगा। अपने आप को तयार किजीए। एजन्सी बनाइए सिंगल एजन्सी। हू कॅन मॉनिटर द पी.डब्ल्यू.डी. वर्क, हू कॅन मॉनीटर द वॉटर वर्क हू कॅन मॉनीटर एम.टी.एम.एल. सबको कन्ट्रोल कर सके। तो ही काम होगा। यहाँ सिर्फ चर्चा करके महासभा में कोई मतलब होने वाला नही है।

दिनेश जैन :-

डॉक्टर साहब, अभी जाधव साहब अपने पास में टोटल ३२ स्टाफ है तो वो सर्व्हेक्षण के लिए है। मिरा भाईंदर में आज कितनी बिल्डींग है यह भी शायद आपको मालुम नही है की कितनी बिल्डींग टोटल है जो आप सर्व्हेक्षण करते हो। क्योंकी उसके अंदर कैसा है की आज मिरा भाईंदर के अंदर कोई भी वॉर्ड के काम करता है। इसको कोई भी बिल्डींग में कोई भी वॉर्ड के कोई भी नगरसेवक को पुछोगे तो कही भी वो सर्व्हेक्षण के लिए जाता नही है इसके लिए आपको माहिती मिलती नही है। जितने हॉस्पीटल में पेशंट आते है उतनी आप लिस्ट बना देते हो। बाहर कोई प्रायव्हेट हॉस्पीटल में जाते है वो जाते है आपको यह मालुम नही है। अच्छा आपके यह ३२ लोग करते क्या है?

प्रशांत जाधव :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो माझ्याकडे माझ्या अंडर ३० एम.पी.डब्ल्यू आहेत १३० लिंक वकर्स आहेत आणि २०१६ मध्ये एप्रिल महिन्यात एकूण तपासलेली घर १२३९७ आहेत. मे महिन्यात २०१३४ आहेत. जून महिन्यात १८४५१ आहेत. जुलै महिन्यात १९५३३ आहेत. असं एप्रिल ते जुलै पर्यंत आपण ७०५१५ घरे तपासलेली आहेत. तपासलेली एकुण कन्टेनर जी आहेत ती..........

दिनेश जैन :-

आप जो बोल रहे हो वो पेपर वर्क पे किया है। ओरिजनल किसी नगरसेवक को आज तक माहिती दी है क्या हमने आपके वॉर्ड में यह सर्व्हेक्षण किया है। खाली यह पेपर वर्क में है। आज मेरे को ४ साल हो गया आपके यहाँ सर्वेक्षण में से २ साल से आप यह डिपार्टमेंट संभाल रहे हो इन लोगो को। कोई भी आज तक मेरे वॉर्ड में एक भी बंदा नही आया आपका और किसीके यहाँ आया है क्या? किसीके यहाँ नही आता है। दुसरी बात आज बांधकाम विभाग को भी बोलोगे तो वो लोग का भी है ना मटेरियल बाहर पडा रहता है। अभी बारीश का सिजन जाएगा दुनिया भर के मच्छर हो जाएंगे उसके उपर किसीका भी ध्यान नही है। पानीवाले काम करते है पाईप खोद कर चले जाते है। अभी कोई भी आएगा रिलायन्सवाला वो खड्डा खोद कर चला जाता है। आयुक्त साहब वो वही पडा रहता है। पानी जाम होता है। चौक के अंदर नाले हो गए है। छोटे-छोटे उसके उपर कौन ध्यान देगा। हर एक जवाब दे रहा है हम आरोग्य के उपर भी नही डाल सकते है लेकिन सभी को समय करके य काम करना पडेगा। तभी जाके डेंग्यू से छुटकारा मिलेगा। यह छोटी मोठी बिमारी नही है जिसके घर में यह होता है उसको मालुम होता है।

राजेंद्र जैन :-

ऐसा रुलिंग दिजीए की इसके लिए एक सिंगल एजन्सी बने। उसके बिना यह कभी होने वाला नही।

दिनेश जैन :-

इस सभागृह में कितने लोगो को माहिती है की अपने जाधव साहब के पास में यह संरक्षण का डिपार्टमेंट है। कितने लोगो को माहिती है। हार्डली १० टक्का लोगो को भी इन्होंने माहिती नही दिया होगा।

राजेंद्र जैन :-

मॅडम कितनी बार यह हो चुका है की हम बोलते है की हर डिपार्टमेंट के काम की माहिती होनी चाहिए। हर विभाग की जानकारी बिलकुल नही होता है। कोई जानकारी नही मिलती है।

दिनेश जैन :-

महापौर मॅडम आप रुलिंग दिजीए। डेंग्यू यह सिरियसली है मतलब यह लोगो को जानसे जाने का इसमें खतरा है। जहाँ पे भी पानी का रिचा हो, जहाँ पे भी पानी का स्टोरेज हो। जहाँ पानी आता है, जहाँ जमा होता हो। ऐसे बिल्डर का जहाँ पे टाकी बनना कम्पलसरी है वो लोग नही करते है। बांधकाम विभाग हो, आरोग्य विभाग हो या अपना पाणी पुरवठा विभाग हो जो भी इससे संबंधित विभाग है या फिर जो नगरपालिका के पास परमिशन लेके जो बांधकाम करते है, बाहर हम जो गटर बनाते है उस कॉन्ट्रॅक्टर को उनको एक बाकायदा नोटिस देके उसके उपर कारवाई करनी चाहिए। जब तक इसके उपर आप स्ट्रिक्ट निर्णय नही दोगे महापौर मॅडम इसका कुछ होनेवाला नही है। इसके लिए में आपसे यह रुलिंग चाहता हूँ की इसके ऊपर आप एक अच्छा रुलिंग दो ताकी इसके उपर सही कारवाई हो सके।

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम त्यांची लक्षवेधी आहे त्याच विषयाला धरुन माझा विषय आहे माझी सूचना आहे की आमच्या प्रभागामध्ये सुध्दा औषध मारणे होत नाही. पानपट्टे साहेब मला आपल्याला सांगायचे आहे आपण इथे फार जुने आहात. पण जसं बोलता ना तुम्ही ठाम ठासून तस काम होत नाही. मला अंतकरणातुन जसं बोलावेसे वाटत आहे हे जनतेच्या हितासाठी लोक कितीतरी आजारी आहेत. कितीतरी हॉस्पीटलमध्ये आहेत. तुमची महिन्यातून शुक्रवारी एकच दिवशी गाडी प्रभागामध्ये येते. एवढा मोठा प्रचंड प्रभाग आहे. आणि त्यात औषधे टाकले जात नाही. महापौर मॅडम औषध बिलकुल टाकले जात नाही. माझी सूचना समाविष्ट करुन घ्या. यांच्या ८ गाड्या आहेत म्हणतात. त्या ८ गाड्या कुठे आहेत. एका लाइनशीर उभ्या करुन आम्हाला दाखवा आम्ही सर्व नगरसेवक सर्व पक्षाचे नगरसेवक ती पाहणी करणार आहे. यांच्या लक्षवेधीला आमचा पाठिंबा आहे. आणि तुम्ही जे करता ते चुकीच करता. माझा आरोप आहे कारण कुठे तुमच्या गाड्या आहेत. तुमचे कर्मचारी कुठे आहेत. तुमच्या पेपरवर आहेत हो.

मा. महापौर :-

वंदनाजी आप आपकी सूचना दिजीए और बैठ जाइए।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

तुमच्या प्रभागात कुठे कुठे फवारणी केली त्याचे रजिस्टर आहे ना माझ्याकडे.

वंदना चक्रे :-

रजिस्टर काय करायचं.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

अस नसते ना.

वंदना चक्रे :-

वॉचमनच्या सह्या घेतात. आमच्या सह्या नाहीत. सध्या कुणाच्या घेतात तुमचे कर्मचारी वाकडी तिकडी सही करतात. महापौर मॅडम दखल घ्या तुम्ही.

निलम ढवण :-

प्रकरण क्र. ४५, अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकरीता पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस दलातील विविध संवर्गातील निर्माण केलेल्या ७० पदांना मुदतवाढ मिळणेबाबत.

शुभांगी कोटियन :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी पोलीस अधीक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पोलीस आयुक्त ठाणे, यांच्या आस्थापनेवर एकुण ५३ पदे व महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्हांची नोंदणी तपास खटला भरण्यासाठी स्थापन करावयाच्या स्वतंत्र कक्षासाठी एकुण १७ पदे अशी एकुण ७० पदे निर्माण करुन त्यांच्या सेवा महानगरपालिकेकरीता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर पदांना गृह विभागाने दि. ०१ सप्टेंबर, २०१५ ते दि. २९ फेब्रुवारी, २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

शासन निर्णय क्र. सीटीई-०३१६/प्र.क्र.६/पोल-३, दि.१८/०३/०१६ मध्ये एकुण ७० पदांना दि. ०१ मार्च, २०१६ ते दि. ३० सप्टेंबर, २०१६ पर्यत खालील अटी/शर्तीच्या अधिन राहून शासनाने मुदतवाढ दिलेली आहे.

१) सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरीत पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजूर केली आहेत त्याचे पालन करण्यात यावे.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तिय सुधारणा-१ दि. १० सप्टेंबर, २००१ आणि क्र. असंक-१००४/प्र.क्र.१२/२००४/ वित्तिय सुधारणा-१ दि. १९ ऑगस्ट, २०१४ नुसार पदांच्या आढाव्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध उच्च स्तरीय सचिव समितीकडून अंतिमतः मान्य करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करण्यात यावा.
३) आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेताना शासनाच्या कार्यपध्दतीतील तंत्रज्ञानाचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मुष्यबळात बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबीचा विचार करुन अनावश्यक बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबीचा विचार करुन अनावश्यक पदे कमी करण्याचाही विचार करावा.
४) कोणत्याही परिस्थितीत सप्टेंबर-२०१६ पर्यंत पदांचा आढावा उच्चस्तरीय समितीसमोर ठेवून मान्यता घेण्याबाबत वित्त विभागाने संदर्भाधिन क्र. ०३ च्या शासन निर्णयानूसार सुचित केलेले आहे. ही बाब विचारात घता सप्टेंबर २०१६ अखेर पर्यंत पदाच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास वरील

अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्याचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधित कार्यालयाची जबाबदारी राहिल.

५) गृह विभाग, शा.नि दि. ०१ सप्टेंबर, २०१४ मधील अट क्र. १ ते ९ हया मिरा भाईंदर महानगरपालिकेवर बंधनकारक राहतील. सदर अटींचे रितसर पालन होत असल्याबाबतचा मिरा भाईंदर महानगरपालिका व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी संयुक्तपणे तपासून सादर केलेला तपशील पुढील मुदतवाढीच्या प्रस्तावासोबत सादर करावा. सदर तपशील सादर केल्याशिवाय सदरहू पदांना पुढील मुदतवाढ मिळणार नाही, असे वरील शासन निर्णयात नमुद आहे.

सबब अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी वरील शासन निर्णयाप्रमाणे पोलीस अधीक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस दलातील ७० पदाना मुदतवाढ देणेबाबत ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

निलम ढवण :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ४५ :-

अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकरीता पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस दलातील विविध संवर्गातील निर्माण केलेल्या ७० पदांना मुदतवाढ मिळणेबाबत.

ठराव क्र. ४४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी पोलीस अधीक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पोलीस आयुक्त ठाणे, यांच्या आस्थापनेवर एकुण ५३ पदे व महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्हांची नोंदणी तपास खटला भरण्यासाठी स्थापन करावयाच्या स्वतंत्र कक्षासाठी एकुण १७ पदे अशी एकुण ७० पदे निर्माण करुन त्यांच्या सेवा महानगरपालिकेकरीता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर पदांना गृह विभागाने दि. ०१ सप्टेंबर, २०१५ ते दि. २९ फेब्रुवारी, २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

शासन निर्णय क्र. सीटीई-०३१६/प्र.क्र.६/पोल-३, दि.१८/०३/०१६ मध्ये एकुण ७० पदांना दि. ०१ मार्च, २०१६ ते दि. ३० सप्टेंबर, २०१६ पर्यत खालील अटी/शर्तीच्या अधिन राहून शासनाने मुदतवाढ दिलेली आहे.

१) सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरीत पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजूर केली आहेत त्याचे पालन करण्यात यावे.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तिय सुधारणा-१ दि. १० सप्टेंबर, २००१ आणि क्र. असंक-१००४/प्र.क्र.१२/२००४/ वित्तिय सुधारणा-१ दि. १९ ऑगस्ट, २०१४ नुसार पदांच्या आढाव्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध उच्च स्तरीय सचिव समितीकडून अंतिमतः मान्य करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करण्यात यावा.

३) आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेताना शासनाच्या कार्यपध्दतीतील तंत्रज्ञानाचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मुष्यबळात बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबीचा विचार करुन अनावश्यक बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबीचा विचार करुन अनावश्यक पदे कमी करण्याचाही विचार करावा.

४) कोणत्याही परिस्थितीत सप्टेंबर-२०१६ पर्यंत पदांचा आढावा उच्चस्तरीय समितीसमोर ठेवून मान्यता घेण्याबाबत वित्त विभागाने संदर्भाधिन क्र. ०३ च्या शासन निर्णयानूसार सुचित केलेले आहे. ही बाब विचारात घता सप्टेंबर २०१६ अखेर पर्यंत पदाच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास वरील अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्याचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधित कार्यालयाची जबाबदारी राहिल.

५) गृह विभाग, शा.नि दि. ०१ सप्टेंबर, २०१४ मधील अट क्र. १ ते ९ हया मिरा भाईंदर महानगरपालिकेवर बंधनकारक राहतील. सदर अटींचे रितसर पालन होत असल्याबाबतचा मिरा भाईंदर महानगरपालिका व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी संयुक्तपणे तपासून सादर केलेला तपशील पुढील मुदतवाढीच्या प्रस्तावासोबत सादर करावा. सदर तपशील सादर केल्याशिवाय सदरहू पदांना पुढील मुदतवाढ मिळणार नाही, असे वरील शासन निर्णयात नमुद आहे.

सबब अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी वरील शासन निर्णयाप्रमाणे पोलीस अधीक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस दलातील ७० पदाना मुदतवाढ देणेबाबत ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- सौ. शुभांगी कोटीयन अनुमोदक :- सौ. निलम ढवण

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४६, रस्ते, चौक, वास्तु नामकरणाबाबत.

राजेंद्र जैन :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक, वास्तु यांची नामकरणे मा. महासभेच्या मान्यतेने करण्यात येत आहेत. याबाबत पदाधिकारी सन्माननीय नगरसेवक/ नगरसेविका यांच्यामार्फत सुचविण्यात आलेले प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात येतात. तथापी बऱ्याच वेळेत महानगरपालिकेमार्फत प्रशासनाच्या प्रस्तावाव्यतिरिक्त देखिल रस्ते, चौक, वास्तु नामकरणाच्या सुचना देवुन ठराव पारीत होत असतात, त्यामुळे सदर रस्ते, चौक, वास्तु यांना पुर्वी नावे दिली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी न करताच निर्णय झाल्याने त्यांच्या अंमलबजावणीस अडचणी निर्माण होऊन ज्या महापुरुषांची नावे पुन्हा देण्यात येतात, त्याबाबत वाद निर्माण होत असतात. मा. महासभा दि.१५/१०/२०१५ ठराव क्र.७८ च्या अनुशंगाने मा. महापौर यांनी सदर ठरावाच्या पूर्वी देण्यात आलेली कोणतीही नावे बदलण्यात येऊ नये याबाबत निदेश दिले आहेत. सद्यस्थितीत एकच रस्ता, वास्तु, चौक यांना पुनश्च नावे दिल्याच्या खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रथम झालेला निर्णय | तद्नंतर झालेले ठराव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्लेझंट पार्क रस्ता | राष्ट्रकवी रविंद्रनाथ टैगोर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा जोतिबा फुले मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६०<br>कै. केशव हरी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| २ | भाईंदर (पुर्व) व (पश्चिम) जोडणारा जैसल पार्क येथील सबवे. | लोकमान्य टिळक सबवे<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ | शहिद भगत सिंह मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ३ | जागृती इमारत ते रेल्वे फाटक पर्यंत रस्ता | महात्मा जोतिबा फुले मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | स्व. श्री. चंदुभाई रामशंकर रावल मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ४ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.२१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ | आई माता चौक<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ५ | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन रिक्षा स्टँड चौक | स्व. परशुराम टावरे चौक, माजी आमदार, मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | श्री. नरसिम्हा देव चौक<br>मा. महासभा दि. १५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ६ | जैसल पार्क, जैन मंदिर ते राहुल पार्क, आर.एन.पी. पार्क रस्ता | स्व.दिलीप माणिक बाबर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | मारुती मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ७ | काशीगाव रा.म.क्र. ८ हॉटेल निलकमल जनता नगर, सरिता डेअरी ते माशाचा पाडा पर्यंतचा रस्ता | श्री. धारावी रोड<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | धारावी देवी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ८ | घोडबंदर राष्ट्रीय महामार्ग जकात नाका क्र. ९ ते गावातील बस स्टॅाप ते रेतीबंदर वरून राष्ट्रीय महामार्गास जोडणारा रस्ता | धर्मवीर स्व.आनंद दिघे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | घोडबंदर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ९ | मिरारोड सृष्टी कॉम्पलेक्स मधील भक्ती वेदांत हॉस्पीटल समोरून जाणारा रस्ता, रॉयल कॉलेज ते सप्तश्री इमारतीपर्यंत | भक्तीवेदांत स्वामी मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२<br>केशव हरि पदाजी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/११/२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ठराव क्र. ६३ |
| १० | डॉ. हेडगेवार मार्गावरील सिल्व्हर पार्क वरुन विजय पार्क सृष्टी पर्यंत रस्ता | आचार्य विनोबा भावे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | ब्रम्हाकुमारीज मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ११ | बंदरवाडी नाका ते जैसल पार्क चौपाटी पर्यंतचा रस्ता | स्व.सै.स्व.कान्हा बालाजी पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | राणी लक्ष्मीबाई मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १२ | जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेज पर्यंत | गावदेवी मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | समाजसेवक हाजी गुलाम रसुल पठाण वेस्टर्न पार्क मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १३ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, सर्व्हे नं. ४७९ ते २९२ पर्यंत जाणारा रस्ता | मगदुम शाह बाबा मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |
| १४ | जैसल पार्क ते आर.एन.पी. पार्क ते पुढे घोडबंदरकडे जाणारा समुद्र किनारी रस्ता | स्व.सै.गोपाळ दामोदर पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | पं दिनदमाल उपाध्याय मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| १५ | काशिमिरा रोड सर्व्हीस रोड | संपूर्ण रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नांव आहे. | स्व. राजेश पायलट मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |
| १६ | मिरारोड रेल्वे स्टेशन (दक्षिणेकडून येणारा व मच्छी मार्केट पासून शांतीनगर सेक्टर ३ मधून सेक्टर नं. ५/६ पर्यंत जाणारा रस्ता | स्वामी विवेकानंद मार्ग्<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | आदिनाथ रोड<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| १७ | मिरारोड (पूर्व) सेक्टर नं. १, बी-१७,१८,१९,२०,२१,२२,२३ मधील मैदान | दिनदयाल उपाध्याय मैदान<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ | श्री. नाकोडा भैरव धाम उद्यान<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| १८ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ३ मधून सेक्टर नं. २ व १० मधून (रेल्वे लाईन कडून येणारा) शांतीपार्क फेज-३ कडून जाणारा व प्रशांत इमारत/ पुनम सागर बी-१ पर्यंतचा रस्ता | भगवान महावीर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | घनश्याम महाराज मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| १९ | मिरारोड (पूर्व) शांतीपार्क सेंट झेव्हीअर्स हायस्कूल रस्ता | शांतीलाल लल्लूभाई शहा मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | स्व. महादेव प्रसाद बजरंगलाल जोशी<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| २० | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ३ व फेज-३ येथील चौक | उमाकांत मिश्रा चौक<br>ग्रामपंचायत काळापासून | संत गुरू गोविंद सिंग चौक<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२<br>श्री. सदानंद चौक<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| २१ | मिरारोड (पूर्व)<br>एम.आय.डी.सी. पासून रॉयल कॉलेज ते सृष्टी ते शांतीनगर ते मच्छी मार्केट ते सर्कल ते मनपा कार्यालयापर्यंत | महात्मा गांधी मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.१९/१०/२००५ ठराव क्र. ५२ | केशव हरी पदाजी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ |
| २२ | शांतीनगर सेक्टर नं. ४ मैदान | जवाहरलाल नेहरू क्रिडांगण<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ | भारतरत्न स्वर्गीय राजीव गांधी मैदान<br>मा. महासभा दि.३०/०७/२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ठराव क्र. २५ |
| २३ | शितल नगर नाका चौक | जवाहरलाल नेहरु चौक<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र.५२ | सेंट जोसेफ चौक<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र.६३ |

वरील अ.क्र. ५ च्या ठिकाणी तद्नंतर दिलेले श्री. नरसिंम्हा देव चौक हे नाव जय अंबे झोपडपट्टी क्र. १ कडे जाणाऱ्या रस्त्यावरील चौकाचे आहे. तरी सदर नाव वगळण्यात यावे. अ.क्र. ५ वगळता सर्वात प्रथम नामकरण केलेली नावे अंतिम करण्यात येत असून तद्नंतर देण्यात आलेली नावे रद्द करण्यात येत आहेत. तसेच यापुढे यापूर्वी झालेली नामकरणे बदलण्यात येऊ नयेत.

दिनेश जेन :-

माझे अनुमोदन आहे.

आसिफ शेख :-

महापौर मॅडम क्लिअरकट ठराव जो आहे तुम्ही म्हणताय ना १ ते २३ पण नाव तर वाचून दाखवा म्हणजे आम्हाला कळतील नक्की तुम्हाला काय अभिप्रेत आहे.

प्रशांत केळुसकर :-

सर्वांकडे गोषवारा आहे.

राजेंद्र जैन :-

बोलता हूँ आप बैठीए।

प्रशांत केळुसकर :-

त्याच्यामध्ये ५ नंबर मध्ये एक सुधारणा आहे. नरसिमा देव चौक है जे नाव दिले आहे ते त्या रस्त्याला दिलेले नाही. ते दुसऱ्या चौकाला दिलं होते ते चुकुन तिथे आले आहे. हा जो चौक आहे रेल्वे स्टेशनचा रिक्षा स्टॅन्ड आहे हे नाव जे दिले नरसिमा चौक तिकडनं आपल ते फ्लाय ओव्हर अंडर पास जो निघतो त्यासाठी नाव दिले आहे त्या चौकला दिले आहे. तस पत्र आहे रवि व्यासच.

आसिफ शेख :-

नाही नाही पुन्हा गलफत करताय. भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन तिकडचा म्हणतोय मी.

जयंतीलाल पाटील :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. खांबित साहेब आपल्या उड्डाणपूलला नाव काय आहे. ओव्हर ब्रिजला नाव काय आहे आणि वरती कुठल नाव दिले आहे? उड्डाणपुलाच्यावर चौक असतो का? जे आपण उड्डाणपुल केले त्याच्यावर चौक असतो का? आयुक्त साहेब उड्डाणपुलच्यावर चौक असतो का?

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम चौकाच नाव काय आहे हे सांगितल आहे.

जयंतीलाल पाटील :-

आपण उड्डाणपुलला नाव दिलं आहे महात्मा गांधीच नाव दिले आहे आणि उड्डाणपुलाच्या वरती दिले इंदिरा गांधी. उड्डाणपुलाच्या वरती ते काय ब्रम्हकुमारी वगैरे मला नाही माहित ते नाव दिले आहे. चालत अस?

मा. आयुक्त :-

ते नाव आता दिलेले नाही पूर्वीपासूनचे नाव आहे.

जयंतीलाल पाटील :-

नाही नाही साहेब आता टाकलेलं आहे.

मा. आयुक्त :-

ते आता दिलेले नाव नाही.

जुबेर इनामदार :-

साहेब त्याला नाव चौक नाही त्याला सेतु.

दिपक खांबित :-

सेतु बदलून चौक केल आहे.

जुबेर इनामदार :-

कधी केले सेतु कुठे झाला आहे.

मा. आयुक्त :-

जुबेरजी मागच्याच कौन्सीलमध्ये आपण हा विषय काढला होता. परत हा विषय सभागृहामध्ये आणण्याची आवश्यकता नाही. आपण सूचना दिली होती की सेतु नाव काढावं महापौर मॅडमने त्यावेळी सांगितल नाव काढण्यात येईल. नविन आम्ही नाव दिलेले नाही आपणच जुन्या काळामध्ये ठराव घेतलाय त्याची व्यवस्थित अंमलबजावणी केली.

जुबेर इनामदार :-

साहेब जुन्या काळामध्ये चुकलो तर त्याची सुधारणा केली पाहिजे ना साहेब.

जयंतीलाल पाटील :-

आयुक्त साहेब जिथे आपण इंदिरा गांधी उड्डाणपुल दिले आहे तिथे वरती चौक असतो का? उड्डाणपुलाच्या वरती?

मा. आयुक्त :-

बघा साहेब मा. स्व. इंदिरा गांधी उड्डाणपुल असं आपण नाव दिलेल आहे आणि त्या चौकाच नाव आम्ही आता नव्याने दिलेले नाही. जुनच नाव आहे.

जयंतीलाल पाटील :-

कधी, कोणी टाकले ते नाव आयुक्त साहेब चौक कुठे आहे तो? चौक असतो ना?

मा. आयुक्त :-

मागे का दिली ते मला माहित नाही.

जयंतीलाल पाटील :-

कोणी पास केले आहे.

दिपक खांबित :-

सर्वानुमते नाव दिले आहे त्या चौकाला.

जयंतीलाल पाटील :-

उड्डाणपुलावर चौक असतो?

दिपक खांबित :-

चौक करुन त्याच्यावर नाव बॉडीनेच दिले आहे.

जयंतीलाल पाटील :-

उड्डाणपुलावरती? उड्डाणपुलाला खाली टाका.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

सचिवसाहेब पुढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

त्या चौकाचं बांधकाम केल ते स्ट्रक्चरल इंजिनियरकडून त्याची घेतली का शहानिशा करुन? इतका बोझा उचलेल का ते? एक छोटस होतं ते त्याच्या जागेवरती एक भरमसाठ मोठं काहीतरी आणून ठेवले.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ४६ :-

रस्ते, चौक, वास्तु नामकरणाबाबत.

ठराव क्र. ४५ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक, वास्तु यांची नामकरणे मा. महासभेच्या मान्यतेने करण्यात येत आहेत. याबाबत पदाधिकारी सन्माननीय नगरसेवक/ नगरसेविका यांच्यामार्फत सुचविण्यात आलेले प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात येतात. तथापी बऱ्याच वेळेत महानगरपालिकेमार्फत प्रशासनाच्या प्रस्तावाव्यतिरिक्त देखिल रस्ते, चौक, वास्तु नामकरणाच्या सुचना देवुन ठराव पारीत होत असतात, त्यामुळे सदर रस्ते, चौक, वास्तु यांना पुर्वी नावे दिली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी न करताच निर्णय झाल्याने त्यांच्या अंमलबजावणीस अडचणी निर्माण होऊन ज्या महापुरुषांची नावे पुन्हा देण्यात येतात, त्याबाबत वाद निर्माण होत असतात. मा. महासभा दि.१५/१०/२०१५ ठराव क्र.७८ च्या अनुशंगाने मा. महापौर यांनी सदर ठरावाच्या पूर्वी देण्यात आलेली कोणतीही नावे बदलण्यात येऊ नये याबाबत निदेश दिले आहेत. सद्यस्थितीत एकच रस्ता, वास्तु, चौक यांना पुनश्च नावे दिल्याच्या खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रथम झालेला निर्णय | तद्नंतर झालेले ठराव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्लेझंट पार्क रस्ता | राष्ट्रकवी रविंद्रनाथ टैगोर मार्ग मा. स्थायी समिती सभा दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा जोतिबा फुले मार्ग मा. महासभा दि.१२/१०/२००६ ठराव क्र. ६० |
| | | | कै. केशव हरी भोईर मार्ग मा. महासभा दि.०६/०७/२०१३ ठराव क्र. २३ |
| २ | भाईंदर (पुर्व) व (पश्चिम) जोडणारा जैसल पार्क येथील सबवे. | लोकमान्य टिळक सबवे मा. महासभा दि.०६/०७/२०१३ ठराव क्र. २३ | शहिद भगत सिंह मार्ग मा. महासभा दि.१५/१०/२०१५ ठराव क्र. ७८ |
| ३ | जागृती इमारत ते रेल्वे फाटक पर्यंत रस्ता | महात्मा जोतिबा फुले मार्ग मा. स्थायी समिती सभा दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | स्व. श्री. चंदुभाई रामशंकर रावल मार्ग मा. महासभा दि.१५/१०/२०१५ ठराव क्र. ७८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.२१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ | आई माता चौक<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ५ | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन रिक्षा स्टँड चौक | स्व. परशुराम टावरे चौक, माजी आमदार, मा. स्थायी समिती सभा दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | श्री. नरसिम्हा देव चौक<br>मा. महासभा दि. १५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ६ | जैसल पार्क, जैन मंदिर ते राहुल पार्क, आर.एन.पी. पार्क रस्ता | स्व.दिलीप माणिक बाबर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | मारुती मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ७ | काशीगाव रा.म.क्र. ८ हॉटेल निलकमल जनता नगर, सरिता डेअरी ते माशाचा पाडा पर्यंतचा रस्ता | श्री. धारावी रोड<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | धारावी देवी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ८ | घोडबंदर राष्ट्रीय महामार्ग जकात नाका क्र. ९ ते गावातील बस स्टॅाप ते रेतीबंदर वरून राष्ट्रीय महामार्गास जोडणारा रस्ता | धर्मवीर स्व.आनंद दिघे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | घोडबंदर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ९ | मिरारोड सृष्टी कॉम्पलेक्स मधील भक्ती वेदांत हॉस्पीटल समोरून जाणारा रस्ता, रॅायल कॉलेज ते सप्तश्री इमारतीपर्यंत | भक्तीवेदांत स्वामी मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२<br>केशव हरि पदाजी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ |
| १० | डॉ. हेडगेवार मार्गावरील सिल्व्हर पार्क वरुन विजय पार्क सृष्टी पर्यंत रस्ता | आचार्य विनोबा भावे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | ब्रम्हाकुमारीज मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ११ | बंदरवाडी नाका ते जैसल पार्क चौपाटी पर्यंतचा रस्ता | स्व.सै.स्व.कान्हा बालाजी पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | राणी लक्ष्मीबाई मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १२ | जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेज पर्यंत | गावदेवी मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | समाजसेवक हाजी गुलाम रसुल पठाण वेस्टर्न पार्क मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १३ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, सर्व्हे नं. ४७९ ते २९२ पर्यंत जाणारा रस्ता | मगदुम शाह बाबा मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |
| १४ | जैसल पार्क ते आर.एन.पी. पार्क ते पुढे घोडबंदरकडे जाणारा समुद्र किनारी रस्ता | स्व.सै.गोपाळ दामोदर पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | पं दिनदमाल उपाध्याय मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| १५ | काशिमिरा रोड सर्व्हीस रोड | संपूर्ण रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नांव आहे. | स्व. राजेश पायलट मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |
| १६ | मिरारोड रेल्वे स्टेशन (दक्षिणेकडून येणारा व मच्छी मार्केट पासून शांतीनगर सेक्टर ३ मधून सेक्टर नं. ५/६ पर्यंत जाणारा रस्ता | स्वामी विवेकानंद मार्ग्<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | आदिनाथ रोड<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| १७ | मिरारोड (पूर्व) सेक्टर नं. १, बी-१७,१८,१९,२०,२१,२२,२३ मधील मैदान | दिनदयाल उपाध्याय मैदान<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ | श्री. नाकोडा भैरव धाम उद्यान<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| १८ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ३ मधून सेक्टर नं. २ व | भगवान महावीर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा | घनश्याम महाराज मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | १० मधून (रेल्वे लाईन कडून येणारा) शांतीपार्क फेज-३ कडून जाणारा व प्रशांत इमारत/ पुनम सागर बी-१ पर्यंतचा रस्ता | दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | ठराव क्र. ५२ |
| १९ | मिरारोड (पूर्व) शांतीपार्क सेंट झेव्हीअर्स हायस्कूल रस्ता | शांतीलाल लल्लूभाई शहा मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | स्व. महादेव प्रसाद बजरंगलाल जोशी<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| २० | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ३ व फेज-३ येथील चौक | उमाकांत मिश्रा चौक<br>ग्रामपंचायत काळापासून | संत गुरू गोविंद सिंग चौक<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२<br>श्री. सदानंद चौक<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| २१ | मिरारोड (पूर्व)<br>एम.आय.डी.सी. पासून रॉयल कॉलेज ते सृष्टी ते शांतीनगर ते मच्छी मार्केट ते सर्कल ते मनपा कार्यालयापर्यंत | महात्मा गांधी मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.१९/१०/२००५ ठराव क्र. ५२ | केशव हरी पदाजी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ |
| २२ | शांतीनगर सेक्टर नं. ४ मैदान | जवाहरलाल नेहरू क्रिडांगण<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ | भारतरत्न स्वर्गीय राजीव गांधी मैदान<br>मा. महासभा दि.३०/०७/२०१०<br>ठराव क्र. २५ |
| २३ | शितल नगर नाका चौक | जवाहरलाल नेहरु चौक<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र.५२ | सेंट जोसेफ चौक<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र.६३ |

वरील अ.क्र. ५ च्या ठिकाणी तद्नंतर दिलेले श्री. नरसिंम्हा देव चौक हे नाव जय अंबे झोपडपट्टी क्र. १ कडे जाणाऱ्या रस्त्यावरील चौकाचे आहे. तरी सदर नाव वगळण्यात यावे. अ.क्र. ५ वगळता सर्वात प्रथम नामकरण केलेली नावे अंतिम करण्यात येत असून तद्नंतर देण्यात आलेली नावे रद्द करण्यात येत आहेत. तसेच यापुढे यापूर्वी झालेली नामकरणे बदलण्यात येऊ नयेत.

सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४७, भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.

नयना वसाणी :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार भाईंदर (प) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्वरीत कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विविध संवर्गातील स्थायी वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) पदावर भरती करणेकरीता दि.२९/०६/२०१६ रोजी दैनिक सकाळ, दै. मिड डे, साप्ताहिक राजबंजारा, साप्ताहिक परशुराम समाचार या वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्यानुसार पात्र उमेदवारांची दि.२०/०७/२०१६ रोजी थेट मुलाखत घेऊन निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निवड व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव | पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| निवड यादी | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. सकपाळ आशिष हरिश्चंद्र | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. भदगरे श्रध्दा सुधीर | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला (महिला) |
| ३. | डॉ. माने अश्विनी गौतम | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ४ | डॉ. कासले आशिष प्रकाशराव | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | इमाव |
| | | प्रतिक्षा यादी | |
| १. | डॉ. गायकवाड मोहन गोविंद | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. गायकवाड उमाकांत राजाराम | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ३. | डॉ. वानखेडे गिरीश शिरीष | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार ''महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहेत.''

त्यामुळे वरील निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवार वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या संवर्गातील असल्यामुळे त्यांचे नियुक्तीस हि महासभा मंजुरी देत आहे.

सुनिला शर्मा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ४७ :-

भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. ४६ :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार भाईंदर (प) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्वरीत कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विविध संवर्गातील स्थायी वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) पदावर भरती करणेकरीता दि.२९/०६/२०१६ रोजी दैनिक सकाळ, दै. मिड डे, साप्ताहिक राजबंजारा, साप्ताहिक परशुराम समाचार या वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्यानुसार पात्र उमेदवारांची दि.२०/०७/२०१६ रोजी थेट मुलाखत घेऊन निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निवड व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव | पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | निवड यादी | |
| १. | डॉ. सकपाळ आशिष हरिश्चंद्र | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. भदगरे श्रध्दा सुधीर | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला (महिला) |
| ३. | डॉ. माने अश्विनी गौतम | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ४ | डॉ. कासले आशिष प्रकाशराव | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | इमाव |
| | | प्रतिक्षा यादी | |

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. गायकवाड मोहन गोविंद | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. गायकवाड उमाकांत राजाराम | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ३. | डॉ. वानखेडे गिरीश शिरीष | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार ''महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहेत.''

त्यामुळे वरील निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवार वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या संवर्गातील असल्यामुळे त्यांचे नियुक्तीस हि महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- डॉ. नयना वसाणी अनुमोदक :- श्रीम. डिम्पल मेहता

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४८, दि. १५ ऑगस्ट २०१६ रोजी परिवहन सेवेची वॉल्वो बससेवा सुरु करुन फक्त १५ ऑगस्ट २०१६ रोजी मुक्त सेवा देणेबाबत.

ध्रुवकिशोर पाटील :-

याचा गोषवारा कुठे? मॅडम आयुक्त साहेब गोषवारा नाही. आम्ही स्टडी कस करणार.

मा. महापौर :-

ठराव सुन लिजीए। कभी महापौर को भी कोई विषय लाने दिजीए।

प्रशांत केळुसकर :-

मिरा भाईंदर महापालिकेतील परिवहन सेवा सन २००४ पासुन अस्तित्वात आली. त्यामध्ये नागरीकांसाठी नविन सोयीसुविधा पुरविण्यासाठी महापालिका सतत प्रयत्नशील आहे. आता केंद्रशासनाकडून जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत १०० बसेस करीता अनुदान प्राप्त झाले होते. त्यामध्ये महापालिकेस बिनावातानुकुलीत बसेस व वातानूकुलीत वॉल्वो बसेस प्राप्त झाल्या आहेत.

वरील बसेस पैकी सर्वच बसेस महापलिकेकडे प्राप्त होवून त्याची सेवा यापूर्वीच नागरीकांना उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र परिवहन सेवे अंतर्गत वॉल्वो या प्रकारच्या बसेस प्रथमच उपलब्ध होत असून दि.१५ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सुरु लोकार्पण करण्यात येत आहे. तसेच दि.१५ ऑगस्ट २०१६ याच दिवशी सर्व नागरीकांना भेट म्हणून वॉल्वो बसेस मधुन प्रवास मुफ्त हा फक्त त्याच दिवसापुरता राहिल असा मी ठराव मांडत आहे.

अनिल भोसले :-

माझे अनुमोदन आहे.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम आपण जे आता नविन चालू करतोय त्याच अभिनंदन. सगळे लोक स्विकारतीलच. एकमेव सभागृहाचं लक्ष वेधतोय. आयुक्त साहेब ज्या आपल्या बसेस चालु आहेत त्याची स्थिती आपल्याला काही माहित आहे का? काय स्थिती आहे? पूर्णपूणे विनंती करुन कॉलेज बस चालु केली ती बंद २३ नंबर ची बस बंद. तुमचे सगळ्यांचे टायर नाही हे नाही ते नाही.

प्रमोद सामंत :-

४२ मधील १८ बसेस काका.

मा. महापौर :-

आप उनको बोलने देंगे।

रोहिदास पाटील :-

त्या ठिकाणी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच आपल्याला रिपोर्टिंग करणे काम आहे का नाही? हे तरी व्हायला पाहिजे ना? या ठरावाबद्दल एक चांगल केल तर अख्ख्या गावात कौतुकच करील. पण ते चांगल तर चालल पाहिजे. त्याची स्थिती काय? त्याच जे इमरजन्सी काय पर्चेस आहे. एक तर तुम्ही त्याला ते राईट तरी द्यायला पाहिजे किंवा नसलं तर तुमच्याकडे तुम्ही ते मागवायला पाहिजे आणि हे कुणी टिका टिप्पणी करायचं कारण नाही. हे छापुन आल तरी त्यांची आपण दखल नाही घ्यायची. तुम्ही काही तरी गंभीरता घ्यायला पाहिजे.

प्रमोद सामंत :-

डेपोची परिस्थिती मी सांगतो. बसेसची परिस्थिती मी सांगतो मी कधी-कधी जातो तिकडे. आयुक्त साहेब मला सांगितल पाहिजे त्यांना माहिती नाही परिस्थिती. आपल्या महापालिकेकडे पहिले २४ बसेस नंतर आणखीन काही बसेस एकूण ४२ बसेस सध्या चालू होत्या आणि आणखीन बसेस आलेल्या आहेत. त्या देखील १८ बसेस बंद आहेत. नविन बसेसमधून १८ बसेस बंद आहेत. नविन आलेल्या बसेस न चालता, कोरी करकरीत, कोण पॅसेंजर बसलेले नाही त्यागाडीचे सुध्दा ४ टायर नाहीत. एकूण ५७ टायर नसल्यामुळे आपल्या १८ बसेसपैकी १२ बसेसचे टायर नाही म्हणूनच बंद आहेत. आणि ६ बसेस अशा आहेत तिथे त्या बसेसला एकही टायर नाही. आणि टायरनसल्यामुळे बसेस शहरामध्ये चालत नाही आणि आमचे काका एवढ्या वर्षापासून त्या बसेससाठी ओरडत असतात २३ नं, २० नं. २२ नं कॉलेजच्या समोरुन जाणारा रस्ता असं असताना आपल्या बसेस मधन कोणी अधिकारी, कोणी कर्मचारी त्या टायरसाठी कुठली कारवाई करत नाही. टायरका नाही तर आयदर त्याची वॉरंटी संपली आहे किंवा टायर आणायला पैसे नाहीत. महापौर मॅडम वोल्वोची परिस्थिती आता चांगली आहे काही दिवसांनी तशीच होणार आहे. थांबा जरा आयुक्त साहेब पुढची परिस्थिती तुम्हाला सांगतो. आपल्या इथे डेपो बनवला आहे. डेपो म्हणजे सर्व्हिस स्टेशन एक छोटसं बनवलं आहे. बसेस साफसफाई करायला. बसेसची परिस्थिती अशी आहे साफसफाई केली ती बस बाहेर परत येऊन उभी करायला लागते. कारण त्या डेपोच्या जागेची आपण सोलींग पी.सी.सी. केलेली आहे ना ते पार धुवून गेलेले आहे. पार म्हणजे त्यावरती ग्राऊंटींगवरचा १ दगड सुध्दा दिसत नाही नुसतं चिखल दिसते. कम्पाऊंड वॉलसाठी खड्डे करतोय ना त्याची माती त्या नविन बसवरती आहेत ज्याचे ४ टायर नाहीत आणि तुम्हाला सांगतो साहेब आपण किती तरी गोष्टी अग्रिमावर करतो. गाडीच त्या मिनी बसचे टायर १५ हजार, १७ हजार, २० हजार ला असेल, १० मिनी बस, १० मिनी बस चे १० स्टेपनी आणि त्यानंतर सुध्दा टायर नाहीत म्हणजे ५७ टायर नाहीत त्यामधले ४२ स्टेपनी नाहीत आणि उरलेले टायर मग ते शेवटी स्टेपनी संपली म्हणून नविन बसेस चे टायरघालुन बसेस चालवल्या गेल्या तोपर्यंत काय आपली लोक काय झोपलेलीत का? आपल्या लोकांना जाग नव्हती का? कि तिकडचे जे डेपो मॅनेजर आहेत सुपरव्हायझर आहेत आपला जो १०,२०,२५ जणांचा स्टॉफ आहे आपल्या इथे १ जण जो सुपरव्हायझर बसतो त्याने काय आपल्या प्रशासनाला आपल्या आयुक्तांना, उपायुक्तांना हे कळविले नाही का? आयुक्त उपायुक्त करत नाहीत तर स्टॅन्डिंग चेअरमन आहेत आमचे महापौर आहेत त्यांना कळविले नाही का? १० टायर घेण्याइतके अग्रीम आपल्याला मिळत नाही का, की त्याच टेंडर काढल का? जी.सी.सी. वरती द्या लौकर द्या सेवा चालू असतांना आता १८ बसेस मॅडम बंद पुढचं मी तुम्हाला नुकसान सांगतो. १८ बसेस वरती १८ दुने ३६, ३६ ड्राव्हर आणि ३६ कंडक्टर बसले आहेत. फुकटच पगार देतोय त्यांना आणि त्या डेपो वरती काम केलं ठेकेदाराने सोलींग केलं ग्राऊटिंग केलं, लेव्हलींग केलं लाईट लावल्या. परवा गेलो तर ६ पैकी ४ लाईट बंद आहेत. काय करतात हो आपले ठेकेदार आणि इंजिनियर? काय करतात रिटेन्शन देऊन काय करणार ८० लाखातले ८ लाख घेणार त्याने कामच केलं नाही. ते ठेकेदार आहेत ना मॅडम, ज्यांनी त्या ३५४ नंबर आणि ३५५ या आरक्षणात ज्या ठेकेदाराने त्याच लेव्हलींग ग्राऊंटिंग सोलींग लाईट लावायची व्यवस्था तो जो सर्व्हेसिंग साठी ट्रॅक बनवला आहे ४० इंचचा अँगल लावला आहे. एवढा एक फुट बाहेर वळला आहे तो वाकडा झाला आहे. त्यांना पैसे नाही दिलेत का फुकट केलं का काम त्याने ते झोपडं तरी बरं असतं त्या माशाच्या पाड्यात झोपड बनवलं आहे ना ते तरी तो जो गरिब असतो ना तो चांगल बनवतो त्याने ते शेड जे बनवलं ते जरा कधी तरी जाऊन बघुन या. म्हसाळ साहेब तुम्ही जात असाल तर मॅडमला वेळ नसतो त्यांना माहित नाही बिचाऱ्यांना. त्यांची ती लाईन नाही पण ते काय आहे शेवटी टेक्नीकल माणून नाही म्हणून त्यांना त्रास होतो. पण या सगळ्या गोष्टी आयुक्त साहेब तुमच्या समोर आणल्यात तुम्हाला माहितीसाठी एवढं बोललो आहे मी जाऊन बघावं तिथे काय केले आहे ते आणि जर त्यांच्याकडे काही क्लासीफिकेशन असेल एक्सप्लॅनेशन असेल तर त्याने सभागृहासमोर ठेवावे आता तर ५० च बसेस आहेत आणखी ५० यायच्या आहेत काय करणार आहोत आम्ही. नाही जमत आम्हाला सांगा आम्ही मदत करू वॉलन्टरी आम्ही जाऊ. १-१ बस आम्ही चालवु १०० बसेस, ५० करोड.

दिपक खांबित :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, की नविन भरणी असल्यामुळे नविन भरणी होती सोलिंग करून आपण ग्राऊंटिंग केले होते. ते दबलं आहे सगळं आपण त्या ठेकेदाराला १ रुपया पण पेमेन्ट केलेले नाही. त्याच्यामुळे ते सगळं काम आपण पाऊस कमी झाल्यानंतर पुन्हा करून घेणार आहोत आणि ते शेड तुम्ही बोलता ती शेड आपली टेम्पररी शेड आहे अँगल आणि पत्रे बाकी काहीच नाहीए.

प्रमोद सामंत:-

साहेब अँगल पत्रे दिवार सगळं आहे. ती शेड आतमध्ये बनवली नाही त्यांनी त्याच्यात टायर ५७ जपून ठेवलेत आपण ते बनवलय ना. त्याच प्लॅस्टर पडतयं त्याचे पण पैसे नाही दिलेत.

दिपक खांबित :-

पैसे कसलेच दिलेले नाहीत. ते व्यवस्थित करून घेऊ आम्ही.

प्रमोद समांत :-

महानगर पालिकेकडे असेच चांगले ठेकेदार आहेत जे पैसे घेतल्याशिवाय काम करून देत आहेत.

दिपक खांबित :-

नाही व्यवस्थित काम करून घेऊ सर.

मा. आयुक्त :-

साहेब फुकटमध्ये काम केलेले नाही पैसे देणे आहे पण आपली जर तक्रार असेल तर त्याच्यामध्ये चौकशी करून जर समजा खराब काम असेल तर त्याच्याकडून कामाचं व्यवस्थित काम करून घेण्यात येईल आपण म्हणलात अँगल चुकीच्या पध्दतीने बाहेर गेला आहे वगैरे टेम्पररी शेड आहे ते जर खराब क्वॉलिटीचे असेल इस्टीमेट मध्ये जे काही दिले आहे त्याच्या व्यतिरिक्त काही उगाच जर टकर-मकर लावलं असेल तर त्याच्या पेमेन्ट मधून तेवढे पैसे वजा करण्यात येतील आणि त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. त्याला भविष्यात पुढे असं काम दिले जाणार नाही.

प्रमोद सामंत :-

त्याच्या पुढचं मी बोलतो साहेब आपण सोलिंग करून घेतल पी.सी.सी. करून घेतले जे काही आहे ग्राऊटिंग करून घेतलं भराव करून घेतला आपल्या जे ई ने एम.बी. लिहीले ना का ते पण नाही लिहीले. कामाचं देयक द्यायचं म्हणून बील नाही पण एम.बी. लिहीले की नाही मग ते एम.बी. चुकीचे लिहीले आहे त्याने त्या कामाकडे लक्ष दिलं नाही हे तुम्हाला आठवण करून द्यायच आहे. माझ्याकडे फोटो विडियो सगळं आहे.

मा. आयुक्त :-

त्यामुळेच आपल्याला म्हटलय की, कामाची चौकशी करण्यात येईल.

प्रमोद सामंत :-

मला एवढच सांगायच आहे त्या पर्टीक्युलर जी.ई. ला ४ लाईनची १ नोटिस बजवा की, तु तुझं काम नीट केलं नाही तु तुझ्या कामामध्ये कामचुकारपणा केला आहे. म्हणून ही परिस्थिती आहे. तुझ आणि त्या ठेकेदाराचं काही आहे का? का रे बाबा असं एकदा विचारा असे मला वाटते.

मा. आयुक्त :-

मी आपल्याला त्याच्यामुळेच सांगितल संबंधितावर कारवाई करण्यात येईल म्हणून जर कोणी हलगर्जीपणा केला असेल तर.........

प्रमोद सामंत :-

साहेब तुम्ही बोललात बर झाल परवा त्याच ठिकाणी गेलेलो परत डेपोमध्ये बाहेर गटारचे काम चालु आहे. या पर्टीक्युलर जे.ई. ला मी फोन केला. सांगितलं हे चुकीचं काम करतोय दुसऱ्या दिवशी मी त्याला फोन केला का रे बाबा काल तुला सांगितलेलं हा चुकीचा काम करतोय ६ बाय ६ चा गाळा स्टीलचा ठेवायचाय त्याने ८ इंचचा गाळा ठेवलाय तु काय केलं उलट बरोबर केलं त्याने काय म्हणतो बरोबर चाललय काम त्या जे.ई. ला आठवणीने बोलावून घ्या तुमच्याकडे आणि त्याची कान पडताळणी करा.

मा. आयुक्त :-

ठिक आहे ओके.

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम त्या गाड्यांबद्दल जरा आम्हाला माहिती द्या. आणि मी वोल्वोची परिस्थिती सांगतो मॅडम तुम्हाला. सर वोल्वो बस कितनी किंमत है वोल्वो बस की, ५० लाख, ६० लाख?

मा. उपायुक्त (मु.) :-

नाही एक करोड पर्यंत.

सुरेश खंडेलवाल :-

एक करोड रु. की १ बस सर, ५ वॉल्वो बस मॅडम मैंने खुद वहाँ पर जाकर व्हिजीट किया था वॉल्वो बस आने के बाद सर उसका जो नंबर है ना नंबर कितने दिनो के बाद उसका नंबर आया अपने को। बसेस वहाँ पे ऐसी स्थिती में खडी थी वोल्वो बस मॅडम १-१ करोड की बस। यह जो प्रश्न उठाया है ना १ से देढ महिना खाली उसपे नंबर लाने के लिए रोड पे लाने के लिए १५ अगस्त का आपने इंतजार किया होगा। दुसरी बात है आप जो इतना इनीटीएटीव्ह ले रहे है। लेकिन वो १-१ करोड की बस रोड पे आने के बाद में कितने दिन चलेगी कितनी उसकी मेन्टेनन्स वगैरे जो भी उसकी व्यवस्था है ना खाली एक दिन के लिए नही लेकिन आगे यह सर्व स्थिती को ध्यान में रखते हुए मैं यह कहता हूँ सर आप है तब तक रिझन लेके जाओ मुझे पता है की...............

मा. आयुक्त :-

मैं जानेवाला हूँ ऐसा कौन बोला आपको।

सुरेश खंडेलवाल :-

यह मेरी दिल की भावना है सर बस की स्थिती देखते हुए आप आज ही कोई ऐसा डिसीजन लिजीए महापौर मॅडम के साथ में बैठके यह बसेस वापस फिरसे जो है ना यह स्थिती में ना आए।

शिल्पा भावसार :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने मी बोलू इच्छिते, कमिशनर साहेब मला पण इथे एवढच सांगायच आहे की आपल्या ज्या बस जिथे प्लेझंट पार्कला डेपोला थांबलेल्या आहेत. तिथे आम्ही सर्वांनी जाऊन व्हिजीट घेतल्या होत्या. खूपच खराब कंडीशनमध्ये ते बसेस आहेत. त्या वॉचमनला सुध्दा माहित

नाही की किती महिन्यापासून ते थांबलेले आहे. कस काय त्यांना काहीच माहित नाही. आणि दुसरं आपलं ते डेपोचे काम करताना माझ्या वॉर्डातल्या सोसायटीचे भरपूर नुकसान झाले आहे. खांबित साहेबांना मी सांगितल होतं त्यांनी सांगितल आपण बनवून देणार पण अजूनपर्यंत आपण बनवून दिले नाही त्यांची दिवारची जी बाऊन्ड्री होती ती बाऊन्ड्री आपलं हे बनवताना तुटलेली आहे आपण त्यांना बनवून दिली नाही. तिथे चोरीचा प्रकार घडतो घडी घडी कारण इकडून चोर तिकडे त्यांच्या कॉम्पलेक्समध्ये जातात आणि त्यांना भरपूर त्रास होतो. तर ते काम पण आपल्या बी.एम.सी. कडून लवकरात लवकर करुन देण्यात यावे अस मी सांगू इच्छिते इथे.

मा. उपायुक्त :-

सन्मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आपल्याकडे ४२ बसेसचे आपण रजिस्ट्रेशन केले आहे जनरलच्या तर ४२ पैकी २७ बस आपल्या ऑन रोड आहेत. ३ बस आपल्या रिझर्व्हला आहेत आणि बाकीच्या बस आहेत तर त्याच्याबद्दल छोट्या मोठ्या ज्या १५ बस आहेत तर त्या काही टायरच्या याच्यासाठी तर त्या टायरची वर्क ऑर्डर आपण देण्यात आलेली आहे. काल टायर येणार होते. सगळ्या टायरसाठी नाही थांबलेले आहेत काही छोट्या मोठ्या मेन्टेनन्स आहे तर त्या मेन्टेनन्सचे सुध्दा काम चालु आहे.

शिल्पा भावसार :-

साहेब एक विचारायचा आहे प्रश्न आपल्या इथे बसेसचे टायर किती महिन्याने खराब होतात.

मा. उपायुक्त :-

त्याचे कि.मी. रनिंगवरती आहे. किती दिवसांचा नाही हिशोब. आपण दररोज आपली अवरेज २०० कि.मी. गाडी चालते. त्या हिशोबाने आपण हे करतो.

मुन्ना सिंग :-

महापौर मॅडम टायर एक दिन में थोडी खराब हुए है।

प्रमोद सामंत :-

हाच विषय आहे. साहेबांना टेक्नीकली याची माहिती नाही म्हणून त्यांनी अस उत्तर दिलं.

मा. आयुक्त :-

साहेब मेकॅनिकल इंजिनिअर आहेत याची आपल्याला कल्पना नाही.

प्रमोद सामंत :-

मला टेक्नीकल उत्तर अपेक्षित होतं. मी माझे शब्द परत घेतले. माझी चुक झाली सर.

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम आपल्या झी टिव्हीला एक अस्मिता सिरिअल चालु आहे मॅडम आयुक्त साहेब त्या बसेस आपल्याला डिस्कवर उभ्या आहे. त्या पूर्ण त्या सिरियलमध्ये दाखवल्या जातात. अस्मिता नावाची डिटेक्टीव सिरियल आहे. मराठी झी चॅनलला चालु आहे डिटेक्टीव म्हणून. अस्मिता सिरियलमध्ये साहेब आपल्या पूर्ण बसेस डिस्कवर उभ्या आहेत त्या पूर्ण दाखवल्या जातात.

मा. आयुक्त :-

आपण मागच्या महासभेत ठराव पारित केला. जी.सी.सी. वर कान्ट्रॅक्ट देण्याबद्दल त्याच टेंडर काढलेलं आहे. त्याच वेगळ टेंडर आहे. आता जर समजा एखादी आपल्या महापालिकेची वास्तु जर कुठे आपल्या प्रिमायसेसमध्ये उभी असेल तर त्याच कुणी चित्र काढून दाखवत असेल तर आपण काय करु शकतो.

प्रेमनाथ पाटील :-

प्रिमायसेसमध्ये नाही ऑन द रोडवर उभ्या आहेत आपल्या बसेस साहेब. आणि तिकडे शुटींग चालते त्यामध्ये मिरा भाईंदर परिवहन सेवा.

मा. आयुक्त :-

कोणत्या एरियामध्ये बोलता.

प्रेमनाथ पाटील :-

भाईंदर वेस्टच्या बसेस कुठे उभ्या आहेत आपल्या विचारा मॅडम त्या ब्रिजच्या खाली जो सरळ रोड जातो तेथे उभ्या आहेत त्या सर्व.

दिपक खांबित :-

भाईंदर वेस्टला कुठे बसेस आहेत.

ध्रुवकिशोर पाटील :-

जुन्या बसेस आहेत.

मा. आयुक्त :-

खंडेलवाल साहेब तुम्हीच सांगा ना काढल्या का नाहीत बसेस तुम्हीच आले होते ना तक्रार घेऊन माझ्याकडे. त्या बस आहेत का जागेवर तिकडे.

सुरेश खंडेलवाल :-

नाही आहे काढलं ना साहेब बस तिकडनं.

मा. महापौर :-

प्रेमनाथजी वो पहले की शुटिंग होगी।

सुरेश खंडेलवाल :-

बहुत बहुत धन्यवाद मॅडम आपका भाईंदर वेस्ट में से आपने सारी बसेस हटवाई उसके लिए।

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ४८ :-

दि. १५ ऑगस्ट २०१६ रोजी परिवहन सेवेची वॉल्वो बससेवा सुरु करुन फक्त १५ ऑगस्ट २०१६ रोजी मुक्त सेवा देणेबाबत.

ठराव क्र. ४७ :-

मिरा भाईंदर महापालिकेतील परिवहन सेवा सन २००४ पासुन अस्तित्वात आली. त्यामध्ये नागरीकांसाठी नविन सोयीसुविधा पुरविण्यासाठी महापालिका सतत प्रयत्नशील आहे. आता केंद्रशासनाकडून जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत १०० बसेस करीता अनुदान प्राप्त झाले होते. त्यामध्ये महापालिकेस बिनावातानुकुलीत बसेस व वातानूकुलीत वॉल्वो बसेस प्राप्त झाल्या आहेत.

वरील बसेस पैकी सर्वच बसेस महापलिकेकडे प्राप्त होवून त्याची सेवा यापूर्वीच नागरीकांना उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र परिवहन सेवे अंतर्गत वॉल्वो या प्रकारच्या बसेस प्रथमच उपलब्ध होत असून दि.१५ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सुरु लोकार्पण करण्यात येत आहे. तसेच दि.१५ ऑगस्ट २०१६ याच दिवशी सर्व नागरीकांना भेट म्हणून वॉल्वो बसेस मधुन प्रवास मुफ्त हा फक्त त्याच दिवसापुरता राहिल असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. अनिल भोसले

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४९, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ७ प्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांमधील मालमत्तांवर, मालमत्ता कराच्या आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविणेकरिता वाजवी भाड्याचा दर निश्चित करणेबाबत.

प्रतिभा पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंदाजे ४६ झोपडपट्ट्या आहेत. या झोपडपट्ट्यां मधील काही मालमत्तांना कराची आकारणी झालेली नाही. झोपड्यांना कराची आकारणी करणेबाबत त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांकडून सातत्याने मागणी होत आहे.

महानगरपालिकेने अंदाजे १० ते १२ वर्षापासून शासनाच्या व केंद्र शासनाच्या जागेवर झालेल्या झोपडपट्ट्यांना कराची आकारणी केलेली नाही. मधल्या काळामध्ये महाराष्ट्र शासनाने सन २००० वर्षा पर्यंतच्या झोपडपट्ट्या अधिकृत करण्याचा निर्णय घेतला आहे. महानगरपालिका क्षेत्रामधील काही झोपडपट्ट्यांमध्ये राजीव गांधी आवास योजने अंतर्गत सर्वेक्षण होऊन पक्की घरे देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण होणार असून या योजनेचा लाभ भविष्यात मालमत्ता धारकांना मिळू शकतो.

तसेच महानगरपालिका झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्यसेवा/ शैक्षणीक/ रस्ते/ दिवे व पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी सुविधा देत आहे. या प्रमुख सोयी सुविधा पुरवण्या करीता महानगरपालिकेस स्वतःचा निधी खर्ची पडत आहे. परंतू या झोपडपट्ट्यां कडून महानगरपालिकेस कोणतेही किमान उत्पन्न मिळत नाही. या करीता महानगरपालिका क्षेत्रामधील झोपडपट्ट्यां मधील मालमत्तांना कर आकारणी करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी मधील मालमत्तांच्या बांधकामाचे सर्वसाधारण सर्वेक्षण केले असता महानगरपालिका क्षेत्रामध्ये गेल्या १० वर्षामध्ये झोपडपट्ट्यांच्या बांधकामांमध्ये वाढ झाली आहे. झोपडपट्ट्या बांधकामावर महानगरपालिकेने वेळोवेळी तोडक कारवाई केलेली आहे. शासनाने २००८ मध्ये घेतलेल्या निर्णयाप्रमाणे झोपडपट्ट्यांमधील मालमत्तांना शास्तीसह कर आकारणी करणे क्रमप्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे झोपडपट्टी मालमत्ता धारकांना महानगरपालिका प्रशासनाने तसेच शासनाने घेतलेले निर्णय लागू राहतील.

महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीमधील मालमत्तांच्या कर आकारणी मध्ये एकसुत्रीपणा व समानता आणणे आवश्यक आहे, या करीता महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे कर विभागाकडून सर्वेक्षण करावे. तसेच मालमत्तेला कर आकारणी झाल्यानंतर सदर मालमत्ता या अधिकृत आहेत असे मानु नये. याकरीता बांधकामाच्या प्रकाराप्रमाणे कर आकारणीचे दर मा. महासभा ठराव क्र. ४३ नुसार निश्चित केलेले आहेत. निश्चित केलेल्या दराप्रमाणे व बांधकामाच्या प्रकाराप्रमाणे त्या त्या विभागामध्ये कर

आकारणी करण्यास हि सभा मंजूरी देत आहे. (सोबत दि. २१/०८/२००६ रोजीचा ठराव क्र. ४३ जोडून देत आहे.)

महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्ट्यांमध्ये यापुर्वी ज्या मालमत्तांना कराची आकारणी निवासी दराने झालेली आहे. सद्यपरिस्थितीत काही मालमत्तांचा वापर बिगरनिवासी होत असल्यामुळे अशा मालमत्तांवर बिगरनिवासी दराने कराची आकारणी करण्यात यावी.

अशोक तिवारी :-

अनुमोदन है।

जुबेर इनामदार :-

मॅडम हा धोरणात्मक निर्णय आहे. आम्हाला बोलु द्या नंतर तुमचा ठराव तुम्ही मांडा.

मा. महापौर :-

ठराव पढने के बाद बोलिए जुबेरजी।

जुबेर इनामदार :-

मॅडम लेकीन इसका गोषवारा नही है। यह धोरणात्मक निर्णय है प्रशासन की कोई भूमिका नही।

निलम ढवण :-

महापौर मॅडम माझी एक सूचना आहे या विषयाला धरुन एक सूचना आहे. झोपडपट्ट्यांप्रमाणेच मिरा भाईंदर क्षेत्रामधील सर्वच गाळे धारकांना गाळ्याचे मोजमाप करुन शास्तीसहीत वाढीव बांधकामास कराची आकारणी करुन व त्वरीत कार्यवाही करावी. जेणेकरुन पालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल अशी मी सुचना मांडत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम सन्मा. सदस्या काहीतरी बोलल्या खरं गोडगोड पण आमच्या काही लक्षात आलं नाही. त्याला प्रथमतः धोरणात्मक निर्णय आहे म्हणजे प्रशासनाचा गोषवारा त्याला महत्वाचा आहे. प्रशासनाची भूमिका काय असणार याच्यामध्ये झोपडपट्टयाचं सर्वेक्षण झालेले आहे का? किती झोपडपट्टया ९५ च्या आधीच्या आहेत. ९५ च्या नंतरच्या आहेत. २००० च्या आधीच्या आहेत. २००० च्या नंतरच्या आहेत. कर आकारणी करता येईल नाही येणार. प्रशासनाची काहीच भूमिका स्पष्ट नाही या विषयावर.

आसिफ शेख :-

महापौर मॅडम सन्मा. आयुक्त साहेबांनी यावेळी मला वाटते लेखी आदेश काढलेत सगळ्या विभाग प्रमुखांना की जोपर्यंत प्रशासनाचा गोषवारा येणार नाही तोपर्यंत कोणताही असा ठराव मंजूर करता येणार नाही.

जुबेर इनामदार :-

त्यांनी दिलेल्या त्या कौलाला ते ठाम आहेत. त्याच्यामध्ये अजिबात बदलणार नाहीत.

आसिफ शेख :-

आयुक्त साहेबांनी एकदा निर्णय घेतला की ते पुन्हा मागे बघत नाहीत.

जुबेर इनामदार :-

साहेब तुम्ही राहिलात तरी करा नाही तर जाता-जाता बोलुन जा.

आसिफ शेख :-

आता काय सगळ्यांना माहित आहे. हा प्रस्ताव महापौरांनी आणला म्हणजे कुणी आणला. आता निवडणुका आहेत.

अनिल भोसले :-

तुमची भुमिका गरिबांच्या विरोधात दिसते.

आसिफ शेख :-

पहिली गोष्ट म्हणजे प्रशासनामार्फत गोषवारा आला नाही. विषय आला नाही आपण परस्पर घेतला आहे. निवडणुकीचं श्रेय आपल्याला घ्यायचं आहे. आम्हाला माहित आहे परंतु त्यापूर्वीच उपायुक्त म्हसाळ साहेबांनी म्हसाळ साहेब आपण सगळ्या कर निरिक्षकांना आणि सगळ्यांना ऑर्डर दिलेल्या आहेत. घरोघरी जाऊन सर्व्हे करा आणि कर आकारणी करा ती प्रक्रिया सुरुच आहे. सर्व्हे करने के बादही टॅक्स लगानेवाले है। उन्होंने ऑर्डर निकाल दिया है पहले से तो अभी यह लोगो को गुमराह करने का प्रस्ताव जो तुम ला रहे हो परस्पर। आमच एवढच म्हणणं आहे की झोपडपट्टयांना आम्ही कित्येक वर्षापासून सांगत आहे की झोपडपट्टयांमध्ये आपण सगळ्यांना कर लावा आपण ती प्रक्रिया सुरु केलेली आहे सुविधा तर आपण देतच आहोत आणि आता आपण प्रस्ताव आणलेला आहे.

प्रशांत केळुसकर :-

आता अडचण काय लावतायेत ना. म्हणजे आपला विरोध आहे का? लावू नये अस आहे का आपलं म्हणणं.

आसिफ शेख :-

आम्ही म्हणतो लावा. आदेशला लावलेत आदेश झालेत.

जुबेर इनामदार :-

हा विषय कर लावण्याचा किंवा नाही लावण्याचा नाहीच आहे ना. कर लावून त्या लोकांचा फायदा झाला पाहिजे ना.

मा. महापौर :-

आपकी बातो का खुलासा हो रहा है पहले इनको बोलने दिजीए फिर विजय पाटील साहब सबका खुलासा करेंगे।

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम मुझे बस यही बोलना है। हमारा बिलकुल विरोध नही है। जिस तरह इललिगल बिल्डींग को शास्ती के साथ में सबको टॅक्स लगाया जाता है।

प्रशांत केळुसकर :-

आपका नही लग रहा है आसिफ का विरोध लग रहा है।

सुरेश खंडेलवाल :-

विरोध नही है सिर्फ बोलने का मतलब यह है की प्रशासनने इसका गोषवारा नही दिया है। इसलिए मन में यह कन्फ्यूजन है की यह जो आपने प्रस्ताव लाया है उसमें प्रशासन की भूमिका क्या है। यदी इसके हिसाब से होता है तो बहुत ही अच्छी बात है। इसलिए बस खाली यह कन्फ्युजन दूर करना है। और मेरा यह कहना है की जो टॅक्स लगाने का जो हम बात कर रहे है उसकी रुपरेषा कैसी होनी चाहिए। जैसे हम बिल्डींग को शास्ती के साथमें लगाते है तो झोपडपट्टी वालो के लिए किस तरह की वो जरा हमको थोडा..............

मा. महापौर :-

शास्ती होगी, वो आपको बता रहे है।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम झोपडपट्टयांना टॅक्स लावण्या संदर्भात आलेला विषय एकतर झोपडपट्टया तुम्ही त्यांना अधिकृत घोषित करणार आहात का? तिथून सुरु करा उत्तर देताना.

मा. महापौर :-

जुबेरभाई टॅक्स लगाने से वो अधिकृत नही होती है वो आपको भी पता है।

जुबेर इनामदार :-

इसिलिए तो मुझे बोलने दिजीए ना। एकतर ते बिचारे गोरगरिब लोक त्यांच्याकडे घरे नाहीत. म्हणून ते झोपडपट्टीमध्ये राहतात. त्यांना ठिक आहे एक डोक्यावरती काही तरी छत पाहिजे म्हणून ते आणि तशीच त्यांची आर्थिक परिस्थिती दुर्बल असल्यामुळे ते झोपडपट्टीमध्ये राहतात. आर्थिक परिस्थिती चांगली असती तर कुठे तरी चांगल्या इमारतीमध्ये राहिला गेले असते तुमचे आणि माझ्यासारखे. त्यांना तुम्ही एकतर टॅक्स लावणार म्हणजे त्यांच्यावरती अजून आर्थिक भुर्दंड येणारच आहे. अनधिकृत असलं तर तुम्हाला त्याच्यावरती शास्ती लावावीच लागेल म्हणजे हा विषय आणला कुणासाठी आहे. गोरगरिबांना अजून त्रास देणार हेच काय तुमचे अच्छे दिन?

मा. महापौर :-

जुबेरभाई अगर आपका ऐसा मत है की टॅक्स नही लगना चाहिए तो आप उस विषय में ऐसा ठराव कर सकते है।

जुबेर इनामदार :-

लेकिन मेरा मत लगेगा है या नही तो पता कैसा चलेगा प्रशासन कहना क्या चाहती है। ठराव पहले प्रशासन बादमें बोलेगी। विषय पहले लेके आए। तुमचा विषय होता का हा प्रशासनाचा मग प्रशासनाने गोषवारा का नाही दिला तुम्ही स्पष्टीकरण द्यायला कसे उभे राहिलात. प्रशासनाचा गोषवारा आहे का?

विजय पाटील :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. मला एक दोन मिनिटं बोलायला दिल तर...........

जुबेर इनामदार :-

साहेब तुम्ही कागदावर आणायला पाहिजे होता रितसर विषयपटलावर आलेला विषय. तुम्ही कस त्याच स्पष्टीकरण देऊ शकता.

विजय पाटील :-

स्पष्टीकरण मी सभागृहाला देऊ शकतो.

जुबेर इनामदार :-

कसं?

विजय पाटील :-

मी सांगतो ना.

जुबेर इनामदार :-

मग का नाही गोषवाऱ्याच्या माध्यमातून दिल? प्रश्न उपस्थित केला. ठराव झाल्यानंतर स्पष्टीकरण हा कुठला नियम झाला. हे प्रशासकीय काम आहे? हे लोकतंत्र आहे.

मा. महापौर :-

जुबेरभाई आप सुन लिजिए उनका खुलासा। बैठ जाइए।

जुबेर इनामदार :-

दिल को लगे उसको टॅक्स मत लगाओ पहले उसको अधिकृत करो उसके बाद लगाओ।

विजय पाटील :-

मी महापौरांच्या परवानगीने बोलतो दि. २१/०८/२००६ रोजी ठराव झालेला आहे. आपला ठराव क्र. ४३ आणि त्या ठराव क्र. ४३ मध्ये जे दर ठरलेले होते विभागवाइज.

जुबेर इनामदार :-

पूर्ण ठराव वाचा. गोषवारा नाही. पूर्ण ठराव वाचून दाखवा आम्हाल काय होता तो.

मा. महापौर :-

ठराव पढ लिया है आपको सुनना चाहिए था। आप खाली खुलासा करेंगे विजय पाटील।

जुबेर इनामदार :-

प्रशासन बिना गोषवारा के हमको स्पष्टीकरण करने को खडी है तो ठराव पढने दो।

मा. महापौर :-

विजय पाटील साहब आप खाली खुलासा करेंगे। अगर उनको वो भी नही सुनना है तो आप जाने दिजीए।

विजय पाटील :-

२१/८/२००६ रोजी प्रकरण क्र. ५३ आणि ठराव क्र. ४३ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराच्या आकारणीसाठी आपण दर प्रस्थापित केले होते. त्या दराच्या अनुषंगाने आपण झोपडपट्टीला कराची आकारणी करणार आहोत. त्यावेळी जे झोपडपट्टीतच दर होते ते भाईंदर पूर्व आणि पश्चिमसाठी ४० पैसे होते, मिरारोडसाठी ३५ पैसे होते आणि घोडबंदरकरिता ३५ पैसे आहेत. उत्तनसाठी ३२ पैसे आहेत. राई, मुर्धा, मोर्वा या विभागासाठी ३२ पैसे आहेत आणि काजुपाडा आणि चेना जे आपले आदिवासी बांधव आहेत त्यांच्यासाठी शुन्य पैसे ५ पैसेने आपण घेतो. आता मी सभागृहाला इथे सांगू इच्छितो की झोपडपट्टीचे जे वर्णन आहे भिंती, झोपडी आणि कुडाच्या भिंती अशा प्रकारच्या झोपडपट्टीसाठी आपण ४० पैशाने तेव्हा कराची आकारणी करत होतो पण आता त्या बांधकामामध्ये संपूर्णप्रकारे बदल झालेला आहे. त्याच्यामुळे त्याच्यावरती बांधकामाच्या प्रकाराप्रमाणे कराची आकारणी होणार आहे आणि यासाठी प्रशासनाने दर इथे निश्चित का केले नाही कारण २० फेब्रुवारी म्हणजे फायनान्शील इयर २० फेब्रुवारीच्या आतमध्ये सभागृहासमोर दर आणावे लागतात. आता हे जे नविन दर आणले झोपडपट्टीसाठी स्पेशली जर नविन दर आपण लावले असते तर तो ठराव मान्य झाला नसता. म्हणून २००६ चा जो ठराव आहे २१ तारखेला जो ठराव झालेला आहे ठराव क्र. ४३ जो ठराव झालेला आहे त्या ठरावामध्ये जे दर दिलेले आहेत त्या दराच्या अनुषंगाने आपण झोपडपट्टीमधील बांधकामाच्या प्रकाराला कराची आकारणी करणार आहोत. मध्यंतरी २ वेळा आपण रेट मंजूरीसाठी दिले होते पण त्यावेळी बॉडीने ते मान्य केले नाही. आपण याच्यावरती टिप्पणी दिली होती. विषयपण दिला होता, गोषवारा पण दिला होता पण त्यावेळच्या बॉडीने ते बाजूला ठेवले.

जुबेर इनामदार :-

ठराव असेल ना वाचून दाखवा विरोधकाचा ठराव असेल.

विजय पाटील :-

जुबेरभाई त्यावेळी विषय दिला होता सचिव साहेबाना विचारा. पण त्यावेळेच्या बॉडीने सांगितल आता आम्हाला कोणत्याही प्रकारचे दर वाढवायचे नाहीत.

जुबेर इनामदार :-

बरोबर आहे.

विजय पाटील :-

म्हणून तो विषय घेतला गेला नाही.

आसिफ शेख :-

आम्ही १० वर्षापूर्वी म्हणजे आम्हाला गोरगरिबांवर अन्याय करायचा नाही म्हणजे आम्हाला टॅक्स त्यांना जास्त वाढवून द्यायचा नाही. तुमची अपेक्षा वेगळी दिसते इथे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

वर्षा भानुशाली :-

प्रभाग क्र. ४ मध्ये कुठली बिल्डींग आहे कुठला गाळा आहे तर त्याचे टॅक्स आपण कुठल्या प्रभागातून लावणार प्रभाग क्र. ४ च्या एरियामध्ये असेल तर टॅक्स कुठे लावणार तुम्ही.

विजय पाटील :-

तलाव रोडवरुन येणार.

वर्षा भानुशाली :-

४ नंबर मधून ना.

विजय पाटील :-

हो.

वर्षा भानुशाली :-

बरेच प्रकरण असे आहेत सर प्रभाग क्र. ४ मध्ये ते गाळा आहे या बिल्डींग आहे त्याचे टॅक्स लावले आहेत ६ नं. मध्ये

विजय पाटील :-

सन्मा. सदस्या अस असत की आपल्याकडे रजिस्टर जी आहेत ना वसुली वॉर्ड आहेत ते अे टॅ झेड आहेत त्याच्यामध्ये एफ १,२,३ वॉर्ड नं. ४ साठी आहे आणि एफ ४,५,६ वॉर्ड नं. ६ साठी आहे म्हणजे कनाकियाला जातात. कधी कधी काय होते बाऊन्ड्रीचे जम्बलींग असेल म्हणजे जर.............

वर्षा भानुशाली :-

नाही नाही बाऊन्ड्रीमध्ये नाही ते मिडलमध्ये.

विजय पाटील :-

मिडलमध्ये आहे तर मग तो वॉर्ड नं. ४ लाच लागायला पाहिजे.

वर्षा भानुशाली :-

सर मी झालेल एक प्रकरण तुम्हाला दाखवते. त्याचे दोषी अधिकारी आहेत का कोण?

विजय पाटील :-

जर वॉर्ड ३ मधून ४ मध्ये गेले असेल तर ते प्रकरण आपल्याला...........

वर्षा भानुशाली :-

तस नाही साहेब ४ मध्ये जी इमारत आहे त्याच टॅक्स लावलेल आहे आपण ६ मध्ये.

विजय पाटील :-

ते आपल्याला घेता येईल ना. त्याच्यामध्ये चूक नाही. फक्त ते जे मालमत्ताधारक आहेत त्यांना तिथपर्यंत जावं लागत हा एक त्रास मान्य करतो.

वर्षा भानुशाली :-

नाही साहेब मी ते नाही विचारत माझ्या प्रभागामध्ये एक गाळा आहे साहेब. त्याचे टॅक्स आपण जे लावतो आतापर्यंत.

विजय पाटील :-

तो ४ मध्येच यायला पाहिजे.

वर्षा भानुशाली :-

पण ते तुम्ही ६ मध्ये लावलेलं आहे कारण की ते इललिगल आहे ४ मध्ये लावू शकत नाही त्याने ६ मध्ये लावलेल आहे.

विजय पाटील :-

प्रकरण दाखवा तुम्ही मला प्लीज. कारवाई करु.

प्रशांत केळुसकर :-

कर लावणाऱ्यावर पण कारवाई करा.

वर्षा भानुशाली :-

माझे बोलण्याचे मत तेच आहे जे आपले अधिकारी, गाळा आहे त्याच्यावर तर कराच पण जे अधिकारी आहेत त्यांच्यावर पण.

आसिफ शेख :-

सन्मा. महापौर मॅडम, प्रशासनाची भूमिका जी आहे आपण इथे जो प्रस्ताव आणलेला आहे त्यापूर्वीच आपल्या मिरा भाईंदर महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार म्हसाळ साहेबांनी मनपा जा.क्र./कर/९७/२०१६-१७ दि. ३०/६/२०१६ रोजी आदेश पारित केलेला आहे. कार्यालयीन आदेश, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम २० नुसार प्रत्येक सरकारी वर्षात आकारणी, पुस्तक अद्यावत करणे आवश्यक आहे. तथापी असे निदर्शनास आले आहे की मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील बऱ्याच इमारती, गाळे, व्यापारी प्रतिष्ठाने, झोपडपट्टीतील घरे, औद्योगिक प्रतिष्ठाने इ. मालमत्तांची कर आकारणी प्रलंबित आहे तसेच अनेक मालमत्तांच्या वापरामध्ये बदल झाले असून वाढीव बांधकामाची सुधारित कर आकारणी सुध्दा प्रलंबित आहे. तरी प्रभाग क्षेत्रातील अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यांत येते की, त्यांनी आपआपल्या क्षेत्रातील मालमत्तांचे सर्वेक्षण करुन विहित मार्गाने कर आकारणी प्रस्ताव तात्काळ सादर करावे. सदर सर्वेक्षण हे १०/७/२०१६ पर्यंत पूर्ण करुन १५ जुलै पर्यंत आपल्या कार्यक्षेत्रात सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे असे लेखी प्रमाणित करुन घ्यावे. त्यानंतर बांधकाम पूर्ण असून वापर चालू आहे परंतु त्याची कर आकारणी झाली नाही असे निदर्शनास आल्यास आपणावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यांत येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी. सर्व कर निरिक्षक सर्व लिपिक कर विभाग. हे म्हसाळ साहेबांचे आदेश आहे ३०/६/२०१६ रोजी त्यांनी आदेश दिलेला आहे. प्रत्येक ठिकाणी कर आकारणी करायचा म्हणजे आता आपण जो प्रस्ताव आणला आम्ही तेच सांगतो ही पश्चात बुध्दी आहे. आणि यामध्ये आम्ही प्रशासनाला विचारतो की

१०/७/२०१६ रोजी पर्यंत पूर्ण करुन १५/७ पर्यंत आपण सर्वेक्षण पूर्ण करुन काय रिपोर्ट आला का म्हसाळ साहेब.

मा. उपायुक्त :-

मा. महापौर मॅडम आपण वेगवेगळ्या गटनेत्यांबरोबर किंवा आपल्या दालनामध्ये चर्चा झालेली होती. त्यानुसार आम्ही आदेश काढला होता ज्या मालमत्तांना कराची आकारणी झालेली नाही त्याच सर्वेक्षण करा किंवा वापरात बदल असेल तरी आपण सगळी सुविधा सर्वांना देतो पण कर आकारणी लागली नसेल तर ती करुन घ्यावी. असा आपण आदेश दिला होता. आणि सर्वेक्षण त्या-त्या दृष्टीने त्या करनिरिक्षक आणि लिपिकांनी चालु केलेला आहे. त्यापरिने त्यांचे रिपोर्ट आलेले नाहीत. पण ते आल्यानंतर आपण कर आकरणी करतो पण व्यापक प्रमाणावर आहे त्याला लगेच आपण शॉर्ट पिरेड दिलेला होता एवढ्या लवकर त्याच सर्वेक्षण होणार नाही त्याला वेळ लागणार आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम नुकत्याच आफ्टरनून पेपरमध्ये अशी बातमी होती की आपल्या देशपांडे मॅडमच पासवर्ड हॅक केले आणि ज्या बिल्डींगला ज्या घरांना शास्ती लागली होती ती शास्ती उडवली आणि असा गुन्हा दाखल आपल्या पोलीस स्टेशनला झालेला आणि तसचं याच प्रकारच दिड वर्षापूर्वी सुध्दा असच ते हॅक केल होतं आणि शास्ती उडवल्या होत्या ही दुसरी कम्पलेन्ट आहे मॅडम मग हे टॅक्स डिपार्टमेंट करतं तरी काय?

मा. महापौर :-

ध्रुवकिशारेजी हॅक करना उसमें टॅक्स डिपार्टमेंट की गलती होती नही है। आपको भी पता है बडे से बडे अकॉऊन्ट हॅक करनेवाले है करते है उसमें हम किसी अधिकारी की गलती निकाले यह बराबर नही।

ध्रुवकिशोर पाटील :-

हम गलती बोल ही नही रहे है ना।

मा. महापौर :-

हम निर्देश में आते ही उसको सुधार रहे है।

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम हो सकता है की वो अपना हॅक जो हो रहा है वो निकालना भी अपना काम है ना। अपने संगणक विभाग का काम है। और हो सकता है यह हॅक हो ना यह अपने ही कुछ कम्प्युटर ऑपरेटर लोगोने मिस्टेक भी किया होगा या जान बुझके शास्ती उडाई भी होगी ना? अपने लोग भी यह मिस्टेक कर सकते है ना और यह २-२ बार हुई है।

मा. महापौर :-

नही नही उसका हमने सायबर सेल में कम्पलेन्ट दिया है। उधर से वहाँ चौकशी चालु है।

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम उस इन्सपेक्टर से मैंने बात किया चव्हाण साहब अभी वो यहाँ से भाईंदर से ट्रान्सफर होके गए अभी ठाणा रेल्वे में है। मैंने उनसे कल बात किया की साहब ऐसी रिपोर्ट है म्युनिसीपल कार्पोरेशन का लेटर आया था उन्होंने कोई भी गुन्हा दाखल नही किया था और फिर मैंने सामने से कार्पोरेशन को लेटर दिया की ऐसा ऐसा आपने लेटर दिया है। तो उसका जवाब देने के लिए आप लोग आ जाओ। लेकिन आपके कोई भी ऑफिसर आए नही और मजबुरीसे मुझे वो फाईल रिझंव्ह करनी पडी।

मा. उपायुक्त :-

नाही नाही देशपांडे मॅडम स्वतः गेलेल्या होत्या त्यावेळी त्यांच्याकडून इमिजिएटली गुन्हा दाखल नाही करुन घेतला.

ध्रुवकिशोर पाटील :-

मी सुमारे एक दिड वर्षापूर्वीची केस सांगतो जी अशी केस झाली होती चव्हाण साहेब नावाचे पी.एस.आय आहेत. आता ते एस.पी.आय. झालेले आहेत. मॅडम मैंने कल उनसे बात किया, उनको पूछा बोले की आपके कार्पोरेशन से मुझे कोई भी रिपोर्ट नही मिला।

मा. महापौर :-

वो देढ साल पहले थी ना अभी जो है।

ध्रुवकिशोर पाटील :-

मैं वही आपको बोलना चाहता हूँ, प्रशासन को बोलना चाहता हूँ की जो केस पुराना हुआ है उसको भी अभी रि-ओपन करो और उसकी भी तेहकीकात करो और इसकी भी तेहकीकात करो और यह जो आपने विषय लाया है यह विषय प्रशासन का गोषवारा नही होने के वजह से हम प्रशासन से डिमांड करते है और हम ठराव करते है की सदर विषयाचा गोषवारा प्रशासनाने दिला नसल्याने तसेच हा धोरणात्मक निर्णय आहे त्यामुळे प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट करणे अनिवार्य आहे म्हणून सदर विषय प्रशासनाने गोषवाऱ्यासह पुढील मिटींगमध्ये आणावा असा मी ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मतदानाला घ्या.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम आता ध्रुवकिशोर साहेबांनी जो अकाऊंट हॅकच्या विषयी बोलले त्या विषयी पोलीस स्टेशनला एक अर्ज देऊ शकतात की तुमच्या सिस्टमचा आय.टी. ऑडीट करण्यात यावे. म्हसाळ साहेब तो एक विषय लक्षात घेऊन तुम्ही आय.टी. ऑडिट करा म्हणजे कोणत्या वेळी कोणी तुमची सिस्टम लॉग इन केले, कोण व्यक्ती होता त्यावेळी त्याचा लॉग इन आय.डी. काय हे सगळ लक्षात येईल पण हे पत्र आणि हे विषय लवकरात लवकर केले पाहिजे नंतर त्या गोष्टी होत नाहीत.

मा. उपायुक्त :-

दिड वर्षापूर्वीची गोष्ट होती त्याच्यानंतर आपण बऱ्याचशा सुधारणा केल्या होत्या की भरपूर लोकांना जे आय.डी. दिले होते ते आपण काढून घेतले होते लिमिटेड लोकांना दोनच लोकांना दिले होते आणि मॅडमचे आणि त्याच्यावरती आपण सेफ्टी मेजरच्या दृष्टीने आता बायोमॅट्रीक आणि हे असं जे वेगळे टोकन सिस्टम त्यामध्ये अजून नविन करायला सांगितलेले इमिजिएटली दुसरी गोष्ट ते ऑडिटच्या दृष्टीने आपण ऑडिट पॅनल वरची जी लोक आहेत त्यांच्याबरोबर ऑलरेडी आपण कम्युनिकेशन केले आहे. कारण गर्व्हमेंटचे जे पॅनलवरचे ऑडिट करतात आय.टी. चे त्यांच्याकडून ऑडिट करुन घ्यायची कारवाई सुरु आहे.

आसिफ शेख :-

आपण ते ऑडिट करा पोलीसांना पत्र द्या परंतु ही इतकी गंभीर बाब आहे काही गोष्टी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की जे पासवर्ड हॅक झालेले आहे मॅडमचे परस्पर हॅक झालेले आहे त्यामध्ये माझी माहिती अशी आहे की मे २०१६ ते जुलै २०१६ या कालावधीमध्ये ते संपूर्ण पासवर्ड हॅक करुन बिल काढण्यात आलेली आहेत आणि ती बिल कुणासाठी काढली तर बिल्डरच्या हितासाठी काढण्यात आलेली आहे. काय केलं तर बिल्डर ना जी शास्ती लागली होती त्यांनी अनधिकृत बांधकाम केल होत त्यांना शास्ती लागली होती ती शास्तीचे बिल मॅडमचे पासवर्ड हॅक करुन ती बिल काढण्यात आली त्यामुळे महानगरपालिकेचे कमीत कमी ५० लाख रुपयाचे नुकसान झाले अशी आमची माहिती आहे तर ही फार अत्यंत गंभीर गोष्ट आहे.

मा. उपायुक्त :-

नाही नाही त्यात करेक्शन आपण इमिजिएटली निदर्शनास आल्यानंतर करुन घेतले आहे.

आसिफ शेख :-

आपल्या एखाद्या कर्मचाऱ्याचे किंवा त्या कम्प्युटर ऑपरेटरची की मॅडमचे पासवर्ड हॅक करुन परस्पर मनास वाटले या बिल्डरची शास्ती कमी करा कुठल्या बिल्डींगला कर लावा, परस्पर लावून बिल वाटून काय करताय काय? मी मागच्या ३-४ वर्षापासून सांगता की १-२ लोकांना घरी बसवा म्हणजे कर विभागामध्ये एवढा सावळा गोंधळ आहे की विचारुच नका. सगळे परेशान आहेत. लोकांना ८-८, १०-१० हजार रु. बिल दिलेले आहेत. आपल्या लोकांनी टॅक्स नाही त्याला असेसमेन्ट नाही काही नाही परस्पर कम्प्युटर दाबल बटन काढलं महानगरपालिका लोगो शिक्का देऊन टाकल त्यांना बिल गेल आणि दुसऱ्या वर्षाना त्यांना बिलच नाही आलं म्हणजे असेच हॅक करुन लोकांना बिल वाटलेली आहेत आणि आता हा गंभीर प्रकार आहे. मी तुम्हाला नाव सांगतो वॉर्ड भाईंदर पूर्वेचा आहे. एफ १, एफ २ त्यामध्ये लक्ष्मण बिल्डींग, आर.के. बिल्डर्स, विजय बिल्डर्स हा एक विजय बिल्डर तो घोडबंदरचा आहे तर याच्यामध्ये हा सगळा प्रकार झालेला आहे. आणि यामध्ये ५० लाख रुपयाचे महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे. आणि त्यांची शास्ती ऑटोमॅटिकली कमी केली जाईल.

मा. उपायुक्त :-

जे काही आपण बोललात त्याच करेक्शन इमिजिएटली सिस्टमध्ये करुन घेतलं जाईल.

आसिफ शेख :-

कारवाई करणार की नाही करणार. हे कोणी केल कोणासाठी केलं संपूर्ण अशी चैन उघडेल ना. तपास करा पोलीसांना पत्र द्या.

मा. उपायुक्त :-

तो जो गुन्हा दाखल आहे ना ते सगळ्यांचा जाबजबाब घेऊन त्याच्यावरती कारवाई होईल ना.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम इसमें एक सूचना है मेरी वैसे तो आपने पत्र दिया है लेकिन मैंने पिछली बार भी एकबार यह प्रश्न उठाया था की महानगरपालिका की उत्पन्न बढाने के लिए अपने हायवे पे जितने भी हॉटेल और जितने भी रेस्टॉरन्ट चलते है सब ओपन स्पेस को सब कर्मशियल यूज करते है लेकिन मैंने यह देखा की उनको जो टॅक्स लगता है वो सिर्फ उनका जो स्ट्रक्चर जो ढाचा होता है बिल्डींग का उसी के उपर टॅक्स लगता है। तो मैंने लास्ट टाईम भी महासभा में यह पास भी हुआ है की जितने भी ऐसे ओपन स्पेस कर्मशियल यूज करते है उनके उपर भी टॅक्स की आकारणी अपने को करना चाहिए। तो साहेब इसका भी एकबार आदेश देके इसकी भी इन्क्वायरी कराई जाए।

मा. महापौर :-

अभी ढवण मॅडम की सूचना अल्मोस्ट उसी तरह की थी।

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४९ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्रीम. प्रतिभा प्रकाश तांगडे पाटील त्याच्यामध्ये सुचना निलम ढवण यांची आहे. दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सूचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील तर त्यांनी हात वर करायचे आहेत. सूचक श्रीम. प्रतिभा पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील तर त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्रीम. प्रतिभा प्रकाश तांगडे पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३९, विरोधात २३, तटस्थ १ इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. प्रतिभा प्रकाश तांगडे पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ४९ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ७ प्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांमधील मालमत्तांवर, मालमत्ता कराच्या आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविणेकरिता वाजवी भाड्याचा दर निश्चित करणेबाबत.

ठराव क्र. ४८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंदाजे ४६ झोपडपट्ट्या आहेत. या झोपडपट्ट्यां मधील काही मालमत्तांना कराची आकारणी झालेली नाही. झोपड्यांना कराची आकारणी करणेबाबत त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांकडून सातत्याने मागणी होत आहे.

महानगरपालिकेने अंदाजे १० ते १२ वर्षापासून शासनाच्या व केंद्र शासनाच्या जागेवर झालेल्या झोपडपट्ट्यांना कराची आकारणी केलेली नाही. मधल्या काळामध्ये महाराष्ट्र शासनाने सन २००० वर्षा पर्यंतच्या झोपडपट्ट्या अधिकृत करण्याचा निर्णय घेतला आहे. महानगरपालिका क्षेत्रामधील काही झोपडपट्ट्यांमध्ये राजीव गांधी आवास योजने अंतर्गत सर्वेक्षण होऊन पक्की घरे देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण होणार असून या योजनेचा लाभ भविष्यात मालमत्ता धारकांना मिळू शकतो.

तसेच महानगरपालिका झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्यसेवा/ शैक्षणीक/ रस्ते/ दिवे व पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी सुविधा देत आहे. या प्रमुख सोयी सुविधा पुरवण्या करीता महानगरपालिकेस स्वतःचा निधी खर्ची पडत आहे. परंतू या झोपडपट्ट्यां कडून महानगरपालिकेस कोणतेही किमान उत्पन्न मिळत नाही. या करीता महानगरपालिका क्षेत्रामधील झोपडपट्ट्यां मधील मालमत्तांना कर आकारणी करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी मधील मालमत्तांच्या बांधकामाचे सर्वसाधारण सर्वेक्षण केले असता महानगरपालिका क्षेत्रामध्ये गेल्या १० वर्षामध्ये झोपडपट्ट्यांच्या बांधकामांमध्ये वाढ झाली आहे. झोपडपट्ट्या बांधकामावर महानगरपालिकेने वेळोवेळी तोडक कारवाई केलेली आहे. शासनाने २००८ मध्ये घेतलेल्या निर्णयाप्रमाणे झोपडपट्ट्यांमधील मालमत्तांना शास्तीसह कर आकारणी करणे क्रमप्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे झोपडपट्टी मालमत्ता धारकांना महानगरपालिका प्रशासनाने तसेच शासनाने घेतलेले निर्णय लागू राहतील.

महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीमधील मालमत्तांच्या कर आकारणी मध्ये एकसुत्रीपणा व समानता आणणे आवश्यक आहे, या करीता महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे कर विभागाकडून सर्वेक्षण करावे. तसेच मालमत्तेला कर आकारणी झाल्यानंतर सदर मालमत्ता या अधिकृत आहेत असे मानु नये. याकरीता बांधकामाच्या प्रकाराप्रमाणे कर आकारणीचे दर मा. महासभा ठराव क्र. ४३ नुसार निश्चित केलेले आहेत. निश्चित केलेल्या दराप्रमाणे व बांधकामाच्या प्रकाराप्रमाणे त्या त्या विभागामध्ये कर आकारणी करण्यास हि सभा मंजूरी देत आहे. (सोबत दि. २१/०८/२००६ रोजीचा ठराव क्र. ४३ जोडून देत आहे.)

महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्ट्यांमध्ये यापुर्वी ज्या मालमत्तांना कराची आकारणी निवासी दराने झालेली आहे. सद्यपरिस्थितीत काही मालमत्तांचा वापर बिगरनिवासी होत असल्यामुळे अशा मालमत्तांवर बिगरनिवासी दराने कराची आकारणी करण्यात यावी.

सुचक :- श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील अनुमोदक :- श्री. अशोक तिवारी

सदर ठरावामध्ये सुचक श्रीम. निलम ढवण व अनुमोदन श्री. प्रशांत केळूसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडलेली आहे.

झोपडपट्ट्यांप्रमाणेच मिरा भाईंदर क्षेत्रामधील सर्वच गाळे धारकांना गाळ्याचे मोजमाप करुन शास्तीसहीत वाढीव बांधकामास कराची आकारणी करुन व त्वरीत कार्यवाही करावी. जेणेकरुन पालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल अशी मी सुचना मांडत आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | श्री. जयंतीलाल पाटील |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | डिमेला बर्नट अल्बर्ट | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ५ | मीरादेवी रामलाल यादव | ५ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ६ | डॉ. नयना मनोज वसाणी | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ७ | जैन गिता भरत | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | अरोरा दिपिका पंकज | ८ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ९ | रावल भगवती जयशंकर | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | मेहता डिंपल विनोद | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | मेघना दिपक रावल | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १३ | वंदना रामदास चक्रे | |
| १४ | सुजाता रविकांत शिंदे | १४ | अनिता जयवंत पाटील | |
| १५ | पाटील प्रेमनाथ गजानन | १५ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १६ | कांगणे यशवंत ठकाजी | १६ | इनामदार जुबेर | |
| १७ | अनिल बाबुराव भोसले | १७ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १८ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १८ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १९ | जैन दिनेश तेजराज | १९ | सामंत प्रमोद जयराम | |
| २० | जैन रमेश धरमचंद | २० | खंडेलवाल सुरेश | |
| २१ | निलम हरिश्चंद्र ढवण | २१ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| २२ | तारा विनायक घरत | २२ | नरेश तुकाराम पाटील | |
| २३ | शुभांगी महिन कोटियन | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २५ | परमार अनिता भरत | | | |
| २६ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| २७ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| २८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३२ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३३ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३४ | भोईर भावना राजु | | | |
| ३५ | भोईर राजु यशवंत | | | |
| ३६ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | | |
| ३८ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |
| ३९ | अशोक तिवारी | | | |

ठराव सुचनेसह बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रमोद सामंत :-

शासकीय अधिकाऱ्यांची पत्रे किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडे आलेली पत्र निरंक कायमच निरंक असतात.

नगरसचिव :-

त्या विभागात आलेली पत्रे त्यांनी सादर करायची असतात. त्याच्यानंतर सभागृहात तरतूद केली जाते अशी पध्दत आहे.

प्रमोद सामंत :-

अशी पध्दत आहे तर आता काही पत्र आलीत का तुमच्याकडे? महापौर मॅडम आपल्याकडे? महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचलनालयाच पत्र आल होत ३ ऑगस्टला. ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातून वर्ष २०१० ते २०१६ या कालावधीत वितरीत झालेल्या अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत. महापौर मॅडम त्या ठिकाणी शेवटी त्यांनी असं दिल आहे पुढच्या पानावर आहे की वरील अर्हता धारण न केलेल्या अधिकाऱ्यांनी जर अशी अग्निशमनचे ना हरकत दाखले सादर केले असतील तर ते सर्व दाखले अवैध ठरतील २०१० पासून २०१६ पर्यंत जर त्यांनी असे ना हरकत दाखले दिले असतील एम.ओ.सी. तर ते अवैध ठरतील असे पत्र आपल्याकडे आलेले आहे. मागे आपण एक ठराव केला मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल अत्यावश्यक सेवा असून २४ तास कार्यरत असते. ठरावाचा विषय वाचतो मी विषय नाही वाचला. अग्निशमन दलाकरिता ६५ मी. उंच पी.टी.एल. लॅडर प्लॅटफॉर्म खरेदी करण्याबाबत असा १/७/२०१५ ला ठराव झाला होता आणि त्या ठरावात असं लिहील होतं. मा. संचालक साो. महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्याकडील क्रम अग्निशमन सेवा ३०/१/२०१३, ६६१ दि. १४/५/२०१३ रोजीच्या मंजूरी पत्रान्वये, मिरा भाईंदर शहरात ७० मिलीमीटर उंच पर्यंतच्या इमारतीची परवानगी देण्यात येत आहे हे असं त्या ठरावात नमूद केल गेल होतं. प्रशांत केळुसकर यांनी ठराव मांडला होता आणि अश्विन कासोदरिया यांचे अनुमोदन आहे. ठराव झाला पण त्यामध्ये त्यांनी ज्या पत्राचा अहवाल दिलेला आहे १४/५/२०१३ चा तर १४/५ ठरावाच्या पत्राबाबत त्यामध्ये त्यांनी शेवटच्या याच्यात काय लिहीलं ते १४/५/२०१३ चं पत्र पण माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्यांनी लिहील आहे ९ नंबर शेवटचं. मिरा भाईंदर महानगरपालिका उपरोक्त बाबीत अधिन राहून ऊंच इमारतीचे नकाशे मंजूर करु शकतील तथापी उपरोलिखित बाब क्र. ५,६,७,८ ची पूर्तता झाल्याशिवाय त्या इमारतींना भोगवटा पत्र अदा करणे योग्य ठरणार नाही. आणि पुढे ते लिहीतात तथापी १५/५/२०१३ नंतर ज्या इमारती आय.ओ.डी अथवा सी.सी. देण्यात येईल अशा इमारतीच्या बाबतीत अग्निशमन दलाचे पूर्ण सक्षमीकरण होईपर्यंत अशा इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्र देणे उचित ठरणार नाही. त्या अगोदरचे २८ ऑक्टोबरचे पण एक पत्र आहे मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्तांना, उपायुक्तांना त्यामध्ये त्यांनी असं मागितले आहे ४५ मीटर ऊंचीपेक्षा उधिक ऊंचीच्या इमारती अग्निशमन विभागाच्या तात्पुरत्या ना हरकत दाखला देणेकामी मार्गदर्शन मिळणेबाबत. त्यांनी संदर्भ टाकला आहे आपल्या पत्राचा ५/५/२०१० चा त्यामध्ये पण त्यांनी असं लिहिलं आहे आपल्या कार्यक्षेत्रात ४५ मि. पेक्षा ऊंच इमारतींना अनुमती देताना आपल्याला अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने कार्यालयाचे पत्र १४/५/२०१३ मध्ये ९ मुद्दे दिलेले होते. सदर मुद्देबाबत तसेच आपल्या अग्निशमन सेवेच्या सक्षमीकरणासाठी आपल्या महानगरपालिकेने कार्यवाही केली आहे. त्याबाबतचा मुद्देसुद अहवाल या कार्यालयात तात्काळ पाठवावे ही विनंती. म्हणजे संचालनालयाने आपल्याला वारंवार कळवून सुध्दा आपण अशा प्रकारचा हा ठराव करतो त्यानंतर त्यांनी एक पत्र दिले आहे की, तुम्ही जेवढ्या परवानग्या दिलेल्या आहेत त्या सर्व परवानग्या अवैध आहेत का नाही. ३ ऑगस्टला पत्र आले की तुम्ही दिलेल्या सर्व परवानग्या मिलन म्हात्रे साहेबांनी हा पत्रव्यवहार केलेला त्यामध्ये त्यांनी असं शेवटच्या पॅरेग्राफमध्ये लिहीले आहे की मिलन म्हात्रे यांनी कार्यालयात सादर केलेल्या आपल्या महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडून निर्गमित केलेल्या अग्निशमन ना हरकत दाखल्याच्या प्रती सादर केलेल्या आहेत वरील अर्हता धारण न केलेल्या अधिकाऱ्यांनी जर अशी अग्निशमन दलाची ना हरकत दाखला सादर केले तर ते अवैध ठरतील अस स्पष्ट लिहीलं आता हे सगळे दाखले, आय.ओ.डी. सी.सी. गेल्या ६ वर्षात दिलेले आहेत ते आपण अवैध ठरवणार का? मग ते...............

मा. महापौर :-

राहायला गेलेत ते.

प्रमोद सामंत :-

ज्या नाही राहायला गेलेत त्यातरी ठरवा त्यांनी पत्र दिलं आहे तसं तुम्ही चुकीच्या पध्दतीने केली कारवाई म्हणून जे खाली आहे आता बिल्डींग ज्या चालु आहेत त्यांच तरी ठरवा. तुमची पण बिल्डींग आहे उदया त्रास होईल. तुमच्या इमारती आहेत विकासकाने कितीही व्यवस्थित काम केल असेल तरी ते सक्षम अधिकारी नाहीत किंवा ते आपल्या अग्निशमन दलाचं सक्षमीकरण करायचं आहे त्यांनी जर ते केलेले नसेल आणि अशा परवानग्या दिल्या असतील तर ते चुकीचं ठरेल आपण १२ कोटी रुपयाची टी.टी.एल.व्हॅन मागवतोय त्यामध्ये आपण चुकीच कोट करतोय ना. मा. संचालक साो. महाराष्ट्र अग्निशमन सेवा साो. ॲण्ड सो १४/५/२०१३ च्या पत्रान्वये, मिरा भाईंदर शहराच्या ७० मीटर ऊंची पर्यंतच्या इमारतींना परवानगी देण्यात येत आहे अस लिहील आहे चुकीच लिहील आहे सभागृहाला चुकीची माहिती मिळाल्यामुळे किंवा हा जर गोषवारा प्रशासनाने दिला असेल तर हे चुकीच ठरेल ना. आता करणारच काय?

राकेश शहा :-

मॅडम आपण ‘‘ज’’ चा विषय घ्या.

प्रमोद सामंत :-

इथे विषय आहे थांबा जरा.

राकेश शहा :-

हा काय विषय नाही.

प्रमोद सामंत :-

विषय आहे इथे. शासनाच्या पत्रांचा स्पष्टीकरण द्या तुम्हाला सगळ्या परवानग्या रद्द कराव्या लागणार आहेत पानपट्टे साहेब.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मला विषयच समजला नाही. मी आता आलो सांगा ना.

आसिफ शेख :-

सन्मा. महापौर मॅडम सन्मा. आमचे सदस्य प्रमोद साहेबांनी या ठिकाणी जी शहराच्या बद्दलची काळजी व्यक्त केली आहे. अग्निशमन यंत्रणाबद्दल आणि ते पत्र संचालकामार्फत आपल्या महानगरपालिकेला आलेले आहे. त्या संदर्भात त्यांनी कमीत कमी १५-२० मिनिट त्यांनी वक्तव्य केले. मला या ठिकाणी एवढेच म्हणायचे आहे की, ज्या-ज्या बाबतीत आपण फायर एम.ओ.सी. दिल्या आहेत आपल्याकडे सक्षम अधिकारी नसताना त्या एम.ओ.सी देण्यात आलेल्या आहेत. आणि आता त्या बिल्डींग सगळ्या तयार झालेल्या आहेत लोक तिथे रहायला गेली आहेत. झाल गेल गंगेला मिळालं.

प्रमोद सामंत :-

अस नाही चालत झाल गेल गंगेला मिळालं.

आसिफ शेख :-

गंगेला मिळाल म्हणजे काय प्रकरण बंद करा अस म्हणत नाही मी. माझं अस म्हणण आहे की, आपण काय केलय की, शासनाकडन आपल्याला मंजूर पदे जी आहेत मुख्य अग्निशमन अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी तर यांच्या पोस्ट सॅग्शन पोस्ट आहेत ना. त्या गर्व्हमेंटच्या प्रतिनियुक्तीवर मागवून घ्या ना.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

शासनाला पत्र देऊन प्रतिनियुक्ती मागितली. शासनाने भरले नाही कोणी शासनाकडून मागितले होते आम्ही...........

आसिफ शेख :-

खांबित साहेबांना सांगा ते २ मिनिटात मंजुर करुन आणून देतील. आपल्याकडे जे पदे पाहिजेत ते मंजूर करुन घेता येतात.

(सभागृहात गोंधळ)

प्रमोद सामंत :-

आपण २०१५ ला एक टी.टी.एल. खरेदी करण्याचा ठराव केला त्यामध्ये तुम्ही अस दिल आहे की ठरावात असे आहे की, मा. संचालक सो. महानगरपालिका अग्निशमन सेवा यांनी १४/५/२०१३ च्या पत्रान्वये, ७० मीटर ऊंचीपर्यंत परवानगी देण्यात आलेली आहे अस लिहिल आहे पण त्याने जी परवानगी दिली आहे साहेब.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

६२ मीटरच्या वर सांगितल महासभेने निर्णय घेतलेला डी.सी. रुलमध्ये ७० मीटरपर्यंत परवानगी देतो त्यानुसार महासभेने निर्णय घेतला ६२ मीटरपेक्षा ७० मीटर घ्या म्हणून.

प्रमोद सामंत :-

अस नाही हो साहेब अस नाही होत तुम्ही त्या दिवशीच्या पत्राचा अहवाल ठेवतात ना त्या दिवशीच्या पत्राच्या अहवालात त्यांनी अस स्प्ष्ट लिहीलेल आहे तथापी उपरोलिखित बाब क्र. ५,६,७,८ ची पूर्तता करुनच. ५,६,७,८ ची पूर्तता झाली का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

५,६ म्हणजे मॅन पावरची ना.

प्रमोद सामंत :-

नाही हो. इथे हे पॉईंट दिलेत वेगवेगळे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

हो ना मग? मॅन पावरचा आहे १ पी.टी.ओ. चा आहे.

प्रमोद सामंत :-

मी ८ नं. वाचतो महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या कार्यभार सक्षमरित्या चालवण्यासाठी प्रशिक्षित व अर्हताधारक मुख्य अग्निशमन अधिकारी व उपमुख्य अग्निशमन अधिकारी यांची नेमणूक प्राथम्याने करणे प्राथम्याने करणे आवश्यक आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आता अग्निशमन अधिकारी बोराडे यांची नेमणूक केली आहे त्याच्याकडे अर्हताधारक आहे क्वॉलीफिकेशन त्याच्याकडे आहे. एक्झाम पास केलेली आहे.

प्रमोद सामंत :-

काय बोलतात तुम्ही.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ग्रेड आहेत, एक्झाम पास केलेल्या आहेत.

प्रमोद सामंत :-

म्हणजे त्या अगोदर जो तुम्ही ठराव केला.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

त्यावेळेसचे क्वालिफिकेशन तस नव्हतं.

प्रमोद सामंत :-

म्हणजे त्या अगोदरच्या परवानग्या रद्द कराव्या लागतील ना.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मी बघतो उपायुक्त बघतात. साहेबपर्यंत कमिशनरपर्यंत त्या परवानग्या.

प्रमोद सामंत :-

टेक्नीकल माणूसच नाही तुमच्याकडे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ती प्रत्येक फाईल आयुक्तांकडे जाते साहेब.

प्रमोद सामंत :-

मी कितीही टेक्नीकल असलो तरी चालेल का? मी कुठलीही परवानगी दिली तर मला आयुक्त झालं पाहिज ना. मला आयुक्त व्हायला पाहिजे की नाही ऑर्डर करायला. मी काय म्हणतो मी कितीही परफेक्ट असलो मला किती ही कायद्याचा अनुभव असला तरी मी आयुक्तांच्या वतीने आदेश काढू शकतो का? हो का नाही सांगा ना.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

बरोबर आहे.

प्रमोद सामंत :-

म्हणजे पानपट्टे साहेब आतापर्यंत दिलेल्या जेवढ्या परवानग्या आहेत त्या रद्द कराव्या लागतील तुम्हाला त्यांनी तस पत्र पण दिलेलं आहे तुम्हाला.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

कुठ म्हटलं आहे परवानग्या रद्द करा म्हणून.

प्रमोद सामंत :-

३ ऑगस्टला पत्र दिले आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

कुठ म्हणलं आहे सांगा तुम्ही.

प्रमोद सामंत :-

३ ऑगस्टला आयुक्तांना पत्र आलेले आहे अवैध.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

कुठे अवैध दिले आहे लास्ट पॅराग्राफ वाचा. केलेल्या कारवाईचा अहवाल परस्पर तक्रारदारांना कळवा त्याची कॉपी डायरेक्टर साहेबांना कळवायला सांगितली आहे. वाचा लास्टचा पॅरेग्राफ काय आहे ते.

प्रमोद सामंत :-

तुम्ही पहिले अवैध ठरवले आहे आणि अवैध ठरवून केलेल्या कारवाईचा पत्रव्यवहार.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आयुक्तांना अधिकार आहे टेक्नीकल.

प्रमोद सामंत :-

इथे आयुक्तांच अधिकाराबाबत कुठे आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आयुक्तांना अधिकार आहे साहेब.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, महानगरपालिकेचा जो कायदा १९४९ आहे त्याच्यामध्ये अधिकार कुणाला प्राधिकृत करायचं नाही करायचं हा आयुक्तांचा अधिकार आहे. आणि माझ्या पूर्वीच्या आयुक्तांनी त्याच्यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांना प्राधिकृत केलं आहे तर त्याला चॅलेन्ज करायचं असेल तर आपण शासनाकडे तक्रार करु शकता की हे चूकीचं केलं म्हणून त्याच्यामुळे सभागृहात वाद घालण्याबद्दल काही विषय नाही.

प्रमोद सामंत :-

तुम्हाला जे पत्र आलेलं आहे. साहेब तुमच्या नावाने आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका ३ ऑगस्टला पत्र आलेलं आहे साहेब.

मा. आयुक्त :-

यस त्याच उत्तर दिलेलं आहे. शासनाला उत्तर दिलेलं आहे आम्ही जर चुकीच काम करत असू तर शासन आम्हाला त्याच्यामध्ये जे निर्देश देईल त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यांत येईल.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम हे जे पत्र आहेत त्याच काय.

वंदना चक्रे :-

बोललेत ना आता.

प्रमोद सामंत :-

तुमच्या इथे पत्र दिलं आहे बघा मी १४/५/२०१३ च पत्र आयुक्त साहेब आपण जो ठराव केला त्या अगोदर आपल्याला हे पत्र आलं होते. मग आपण ते ठरावात मंजूरी मिळाली म्हणून का नमूद करतो. त्या ठरावात तुम्ही मंजूरी दिली आहे ती कुठली मंजूरी दिली आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

७० मीटरची.

प्रमोद सामंत :-

नियमामध्ये अधीन राहून मंजूरी दिली आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

हो ना.

प्रमोद सामंत :-

पण नियम तुम्ही पाहिले नाहीत.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

७० मीटरपर्यंत डी.सी. रुलमध्ये परवानगी आहे साहेब आपल्याला.

प्रमोद सामंत :-

डी.सी. रुलमध्ये कितीही परवानगी असली तरी अग्निशमन सेवेचा काहीतरी नियम कायदा.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

४ वर्षामध्ये गाडी येणार आहे साहेब ती आपली.

प्रमोद सामंत :-

पानपट्टे साहेब मला पुढे जायला सांगू नका पुढे बरेच विषय आहेत. मी फक्त एवढच विचारतो ही जी परवानगीमध्ये ५,६,७,८ ला अनुसरून घ्यायची आहे तुम्हाला गाडी किंवा ७० मीटर, ६२ मीटरची परवानगी. मग ५,६,७,८ पूर्तता झाली का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ते दोन विषय शासनाचे प्रलंबित आहेत ना. आमचा विषय आहे फक्त गाडी घ्यायचा. पद मंजूरीचा प्रस्ताव शासनाला पाठवला आहे साहेब आम्ही त्यांचाच विषय आहे तो.

प्रमोद सामंत :-

तुमच्याकडे कुठलाही टेक्नीकल माणूस नसताना १२ करोडची कुठून आली. १२ करोडचं कॅल्क्युलेशन कोणी दिले.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ते अंदाजे आम्हाला माहित नसंत साहेब फंडची यादी आहे. आता जे ॲक्च्युअल होईल ते ती अंदाजे किंमत लिहीली आहे.

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब तुम्हाला मला हेच सांगायचे आहे आपल्याकडे टेक्नीकल माणूस नाही. आपल्याकडे त्याची माहिती नाही आणि आपण आपलं सांगायच याला १२ करोडची मंजूरी द्यायची. इथे सभागृहाची दिशाभूल करायची आम्ही ठराव करायचा बहुमताने ठराव मंजूर व्हायचा आणि आपण १२ करोडची मंजूरी घेऊन हवी ती गाडी घेऊन यायची असं चालत का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

तो प्रस्ताव आल्यानंतर त्याचा अभिप्राय घेऊ.

प्रमोद सामंत :-

जी.आर मध्ये काय आहे ते वाचतो. प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची नॉन टेक्नीकल तांत्रिक व लेखा सेवेतील पदावर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील पदावर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिकाऱ्यांची प्रशासकीय सेवेतील पदावर बदलीने किंवा प्रतीनियुक्तीने नेमणूक करता येते असा त्यांनी त्यात सांगितलेलं आहे. आता त्यामध्ये त्यांनी कोण टेक्नीकल आहे आणि कोण टेक्नीकल नाही हे पण सविस्तर दिलं आहे आणि कदाचित हा जी.आर आहे ना साहेब हा तुमच्याकडे असेल पण काय आपण ते लक्ष देत नाही सभागृहाच्या समोर पण आणत नाही आणि मग हा सगळा गोंधळच गोंधळ करुन आपण काहीतरी वेगळ काम करुन टाकतो. आणि मग सगळे कामाला लागतात. मग महापौरांच पण नाव येत पार्टी बनवतात कोर्टामध्ये जाऊन त्रास होतो आमचे महापौर आहेत. पानपट्टे साहेब हा विषय लक्षात येतो का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

तो प्रस्ताव आल्यानंतर आम्ही डायरेक्टर ऑफ फायरची मान्यता घेऊन करु.

प्रमोद सामंत :-

साहेब यात भरपूर विषय आहेत नंतर घेऊ पण याच्यावर काहीतरी करा. आम्हाला क्लेरीफाय करा की तुम्ही करता ते बरोबर आहे की चुकीचं. तुम्ही चुकीच म्हणा ना आपण रेक्टीफाय करु.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

नाही नाही त्याची जी काही किंमत येईल ना.

प्रमोद सामंत :-

ती गाडीच चुकीची आहे. मी सांगतो कोण आहे तुमच माणूस ज्याने मागणी केली आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आम्ही पत्र पाठवलं होत साहेब डायरेक्टर ऑफ फायरला. त्याच स्पेसिफिकेशन आहे.

प्रमोद सामंत :-

तुमच्याकडे जे अॅटमॉसफेर आहे तुमच्याकडे जी परिस्थिती आहे त्या पध्दतीने.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

म्हणूनच डायरेक्टर ऑफ फायरला प्रस्ताव पाठवला होता. साहेब त्यांनी स्पेसिफिकेशन दिले आहे आमच्याकडे. तुम्हाला दाखवतो स्पेसिफिकेशन आहे.

प्रमोद सामंत :-

मग तीच पत्र तुम्ही सभागृहात का नाही ठेवत हाच विषय आहे. हा विषय तुम्ही त्या आमच्या केळुसकर साहेबांनी ठराव केला तरी चुकीची माहिती देतात. ते का अस करायला लावतात तुम्ही महापौर मॅडम यापुढे हा विषय आता मी पानपट्टे साहेबांपुढे आयुक्तांसमोर, तुमच्यासमोर आणि सभागृहासमोर आणलेला आहे. यापुढे जी काही पत्र शासनाकडून येतील जे काही जी.आर येतील मागे पण हा विषय झालेला. अगोदर जी.आर. दिले जायचे आता का नाही दिले जात. मागे घेवारे साहेबांनी कुठली तरी डेट सांगितली आम्हाला आणि सांगितल शासनाची मान्यता आलेली आहे. आमच्याकडे नाही ना मग आमच अज्ञान कधी दूर होणार. तुम्ही एकटेच सज्ञान व्हायचं २ महिने तुम्ही अभ्यास करायचा आणि ६ दिवसात आम्हाला अभ्यास करायला लावायचा. अस नका करु आम्ही काय अभ्याय करायचा अख्ख तुमच प्रशासन पूर्ण स्टाफ, पूर्ण सिस्टम काम करणार. २ महिने आणि सभागृह काम करणार त्या विषयपत्रिकेवर फक्त ६ दिवस. हे असं नाही चालणार. तर तुम्ही सचिवांना पण स्टॅन्डिंग ऑर्डर द्या. आयुक्तांना पण सांगा सर्व डिपार्टमेंटला सांगा त्यांच्याकडे आलेले जी.आर. त्यांच्याकडे आलेली शासनाची पत्रके परिपत्रक जे काही असतील नोटिफिकेशन ते तुम्ही प्रत्येक सदस्याला वेळोवेळी दिलं पाहिजे प्रत्येक महासभेत तुम्ही दिलं पाहिजे. ते नाही दिलं तर उदया आम्ही सचिवांना धरु. सचिव म्हणतात माझे ३ महिने राहिलेत मला धरु नका.

मा. महापौर :-

सामंतजी आपका सुझाव बहुत अच्छा है और आगे से यह अंमल मे लायेंगे।

नगरसचिव :-

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १२/०८/२०१६ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ५० सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०३/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - भाईंदर (पूर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरुन भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधून आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार करणे.

प्रशांत केळुसकर :-

सदरची विकासकामे एमएमआरडीए मार्फत करण्यात येणार असून याबाबत एमएमआरडीए ने निविदा काढलेली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. करीता सदरचा विषय फेटाळण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

नयना वसाणी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर. आसिफ शेखजी आप कुछ बोले उसके पहले में कुछ बोलना चाहती हूँ। मेरी बात सुन लिजिए यह जो आप लाए है प्रस्ताव उसका जो भी करना है वो हमें एम.एम.आर.डी.ए मैं करना है अब हम यहाँ बैठके उसको सडन करना है उनके कन्सल्टंट है उनके टेक्निकल लोग है और वो चीज बनानी भी है उनको हमारे हाथ में कुछ नही। आज हम यहाँ बैठके भी बोलेंगे की हमे एक नही ४ बनाने है तो वो माननेवाले है।

आसिफ शेख :-

प्रस्ताव किसने दिया हमने दिया। आप महासभा के बाहर की बात मत करीए महासभा के अंदर में प्रस्ताव हमने लाया है। आपने एम.एम.आर.डी.ए. से क्या बात की अधिकारी से क्या बात की उसका यहाँ पे कुछ लेना देना नही है। प्रस्ताव यह डॉ. आसिफ शेख ने लाया है तो मेरा फर्ज बनता है मैं सन्मा. सदस्य हूँ। मेरे अधिकार का आप अनन मत करीए।

मा. उपमहापौर :-

महापौरांच्या परवानगीने, आसिफजी तुम्ही जो आता विषय आणला आहे. त्याच्यामध्ये आमची अशी भूमिका आहे मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक यांनी एम.एम.आर.डी.ए. सभा घेतली होती. त्याच्यामध्ये एक इलिमिटेड रोड असावा असा एक प्रस्ताव त्यांच्याकडे ठेवला होता. तरी आमची अशी भूमिका आहे तिथे एकच रोड असावा.

आसिफ शेख :-

तोच तर आम्ही प्रस्ताव आणलेला आहे. त्या संदर्भात आम्ही जो प्रस्ताव आणलेला आहे या ठिकाणी स्पष्ट प्रस्ताव दिलेला आहे. महासभेच्या सर्व सदस्यांनी मला वाटते प्रस्ताव वाचलेला आहे. आता या संदर्भात मी ठराव मांडतो. मिरा-भाईंदर महापालिकेने छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट वाहतुक बेट दरम्यान दिपक हॉस्पिटल, एस.के.स्टोन व प्लेझंट पार्क येथे तीन उड्डाणपुल प्रस्तावित केले आहे. त्यांचे बांधकाम एम.एम.आर.डी.ए मार्फत नियोजित आहे. या उड्डाणपुलामुळे वाहतुक कोडींचे नियोजन होणार असले तरी काही अंशीच उपयोगी ठरणार आहे. परंतू त्याचा विशेष काही फायदा होणार नाही व वाहतुकीची कोंडी तशीच कायम राहण्याची शक्यता आहे. सदर या तीन उड्डाणपुलाऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट वाहतुक बेट मार्गे पुर्वीचे रेल्वे फाटकावरून थेट भाईंदर पश्चिमेकडे डायरेक्ट एलिवेटेड रोड (थेट एकच उन्नत मार्ग) निर्माण झाल्यास वाहतुक कोडींचे नियोजन निश्चित होईल. तसेच आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार केल्यास त्यांचा उपयोग नागरिकांना होईल शिवाय वाहतुक देखील गतिमान होऊन अस्तित्वातील असलेल्या एकमेव भारतरत्न स्व. इंदिरा गांधी उड्डाणपुलाला पर्याय उपलब्ध होईल.

सध्या भाईंदर पश्चिम व भाईंदर पुर्व यांना जोडणारा भारतरत्न स्वर्गीय इंदिरा गांधी हा एकमेव उड्डाणपुल अस्तित्वात असून वाहतुकीसाठी खुला आहे. याच पुलावरून हजारो-लाखोच्या संख्येने दिवस-रात्र वाहतुक सुरू आहे. जर भविष्यात या अस्तित्वातील हा एकमेव उड्डाणपुल नैसर्गिक अथवा तांत्रिक अडचणीमुळे बंद झाल्यास नागरिकांची फारच गैरसोय होईल तसेच भाईंदर पुर्व - भाईंदर पश्चिम वाहतुकीला पर्याय उपलब्ध होणार नाही. त्यामुळे मोठया प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. काही महिन्यांपुर्वी वसई विरारकडे व गुजरातकडे जाणाऱ्या फाऊंटन हॉटेल समोरील वरसावे येथील खाडी पुलावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊन अवजड वाहनांना दुरचे अंतर कापून वसई- विराराला जावे लागत होते. व तासन तास वाहतुकीची कोंडी होत होती. त्याचा बोध घेवून आपण भाईंदर (पुर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरून भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधल्यास व आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार केल्यास त्याचा नागरिकांना भरपुर फायदा होईल व वाहतुकीची कोंडी देखील होणार नाही.

तरी नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने व सोयीसाठी तसेच प्रचंड प्रमाणात होत असलेली वाहतुक कोंडी दुर करण्यासाठी भाईंदर (पुर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरून भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधण्यात यावा व आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार करण्यात यावेत असा ठराव मी मांडत आहे. मा.आयुक्त यांनी तातडीने सदर ठरावाची अंमलबजावणी करून आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी. सदर ठराव वाचून कायम करण्यांत येत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत केळुसकर :-

हे ''ज'' चे विषय आहेत हे निर्णयात्मक होऊ शकत नाही. त्यामुळे मग असा जर विषय आहे सर्वांच्या हितासाठी त्यामुळे सदर विषय रितसर आणा ना पुढच्यावेळी.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम प्रशांतजी सही बोल रहे है ऐसा ही ठराव हमारे मा. नरेंद्र मेहताजी ने लाया था और मिरारोड का जो प्रोजेक्ट है ना एस.के.स्टोन के उधर उसमें प्ले ग्राऊंड, गार्डन, मंडई सब डाला था और पुरा प्रोजेक्ट उसपे रुका था। और वैसेही घोडबंदर में ईस्ट में एक प्रपोजल आया था वहाँ पर भी ऐसे ही ''ज'' के प्रस्ताव के माध्यम में रिझर्व्हेशन डाला है। और उसका प्लान रुकाया है तो जब आप बोलते हो यह बराबर नही है तो वो कैसे बराबर है आयुक्त साहब इसका खुलासा किजीए।

आसिफ शेख :-

नियमाप्रमाणे २ ठराव आलेले आहेत आयुक्त साहेब महापौर मॅडम मतदानाला घेऊन टाका.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य काशिमिरा ते गोल्डन नेस्ट चौकापर्यंत जो आपल्याला ब्रीज बनवायचा आहे त्याच्याबद्दल मला वाटते यापूर्वीच ठराव महानगरपालिकांमध्ये पास झाला आहे. त्याच २५८ कोटीचं इस्टीमेंट २०१२ मध्ये झालं होते आणि आजच्या तारखेला त्याची इस्टीमेटेड कॉस्ट आता विषय असा

आहे की मला वाटते मागच्या अधिवेशनाच्या वेळेस मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी आपल्या मिरा भाईंदरच्या कामाबद्दल जी बैठक लावलेली होती त्या बैठकीमध्ये हा विषय होता. त्या ठिकाणी मा. महापौर, मा. आमदार नरेंद्र मेहता, मा. आमदार प्रताप सरनाईक आणि मी स्वतः आणि आपले काही पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका त्या ठिकाणी उपस्थित होते. माझ्या माहितीनुसार त्यावेळी प्रताप सरनाईक साहेबांनी ही सूचना मांडली होती की त्या ठिकाणी इलीमेटेड ब्रिज व्हावा अशी सूचना मांडली होती. त्याअनुषंगाने मा. मुख्यमंत्री साहेबांनी एम.एम.आर.डी.ए. च्या लोकांना निर्देश दिले होते की याची फिजिबीलीटी तपासून घ्या. म्हणजे हा सगळा टेक्नीकल मुद्दा आहे आणि त्याच्यामध्ये जर समजा इलिमेटेड करायचं त्या इंजिनिअर लोकांनी प्रस्तावित केलं तर इलिमिनेट होईल जर ते म्हटले की इलिमेनेटेड करता येणार नाही आपल्याला हे रॅम्पच करावे लागतील मध्ये २-३ ठिकाणी करावे लागेल तर त्याप्रमाणे होईल आता तो चेंडू कोर्टात गेलेला आहे एम.एम.आर.डी.एच्या. आता एम.एम.आर.डी.ए. मध्ये सगळी टेक्नीकल ऑथोरिटी आपल्या इथे जे इंजिनियर आहेत तिथे सगळे स्ट्रक्चरल इंजिनियर सगळे मोठमोठे ब्रिजेस बांधतात अशी सगळी मंडळी टेक्नीकल ऑथोरिटी तिथे आहे तर ते ठरवतील की हे कस बांधायच कारण पैसे ते देणार आहेत आणि महानगरपालिकेला १ रु. खर्च नाही आणि एम.एम.आर.डी.ए. स्वतः इनीशीएटीव घेऊन आपल्या इकडचा लिंक रोड बनवणार आहे त्याच्यानंतर आपला उत्तनला जाणारा रस्ता सुध्दा त्यांनी घेतलेला आहे आणि त्यानंतर हा इलिमिनेटेड ब्रिज करायचा की त्याला रॅम्प असणारा ब्रिज करायचा ती टेक्नीकल ऑथोरीटी ठरवणार आहे. त्याच्यामुळे आपण या ठिकाणी वाद घालण्याचा विषय नाही.

आसिफ शेख :-

बरोबर आहे. तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत.

मा. आयुक्त :-

जे काही टेक्नीकली फिजीबल आहे ते होणारच आहे.

आसिफ शेख :-

तुमच्या मताशी आम्ही १०० टक्के सहमत आहोत. महासभेमध्ये आम्ही हा ठराव आणलेला आहे. महासभेची ही अशी मागणी आहे ती एम.एम.आर.डी.ए. ठरवेल. त्यांचे निर्णय घेतील पण आमचा ठराव आहे २ ठराव आले मतदानाला टाका.

मा. महापौर :-

आसिफभाई आपको फिर वही बोलना चाहती हूँ। यहाँ जब दो उनके प्रस्ताव मुख्यमंत्री के पास जा चुके है। वापस क्या भेजेंगे हम।

आसिफ शेख :-

उधर क्या हो या उसकी पुरी जानकारी आयुक्त साहब ने दि है।

मा. महापौर :-

पर वापस वो प्रस्ताव क्या भेजेंगे जो ऑलरेडी हम प्रस्थापित कर चुके है।

आसिफ शेख :-

ठराव आया है अभी आपको अडचण क्या है मतदान लो ना एक तो प्रशांत केळुसकर बोल रहे है सावन है, सावन है जाना है तो अभी हमने २ ठराव दिए मतदान करो आप।

ध्रुवकिशोर पाटील :-

आयुक्त साहेब आपण खुलासा नाही केला आता प्रशांतजी बोलले की ''ज'' च्या प्रस्तावाचा जो ठराव होतो त्याला त्याची व्हॅलिडीटी नसते. म्हणजे त्याची व्हॅलिडीटी नाही. मग असचं मा. नरेंद्र मेहता यांनी जो ठराव केला होता मागे ''ज'' च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जे रिर्झर्व्हेशन टाकले होते २-३ काही प्रॉपर्टीमध्ये एस.के.स्टोनच्या इकडे आणि भाईंदर इस्टला आपल्या हनुमान नगरमध्ये आणि साहेब त्या विकासकाचे प्लान आपल्या प्रशासनाने थांबवले आहे. तर हे कितपत योग्य आहे. ''ज'' चा प्रस्ताव म्हणतात की हे व्हॅलीड नाही आणि तुम्ही तो प्रस्ताव थांबवतात आणि साहेब रिझर्व्हेशन चेंज केलेलं आहे. तर तुम्ही याचा खुलासा करा की ''ज'' च्या प्रस्तावामध्ये रिर्झर्व्हेशन चेंज होऊ शकत का?

शरद पाटील :-

महापौर मॅडम आता आयुक्त साहेबांनी सांगितल की, हा चेंडु एम.एम.आर.डी.ए च्या कोर्टात गेलेला आहे.

आसिफ शेख :-

आता चेंडू महासभेत आहे. महासभेने निर्णय घ्यायचा आहे.

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम पहला ठराव प्रशांतभाईने पढा उनको यह मालुम होना चाहिए की मैं क्या ठराव पढ रहा हूँ ''ज'' में और फिर वह यह भी बोल रहे है की ठराव की कोई व्हॅल्यू नही है। पहले मैं उनको बताना चाहता हूँ की, दुसरी बात महापौर मॅडम अभी दोनो जगह से ठराव हो गए है आप वोटिंग लिजीए। कमिशनर साहब डिसाईड करेंगे बादमें की उनको आगे भेजना क्या करना क्या नही करना।

मा. महापौर :-

मुझे जहाँ तक लग रहा है यह विषय टेक्नीकल है और हम इसपे कमेंट देने के लिए यहाँ नही बैठे है। दुसरी बात यह है अभी अभी कमिशनर साहबने कहाँ की अब वो बॉल जो है वो एम.एम.आर.डी.ए. के कोर्ट में है। हमें यहाँ बैठके उसपे भाष्य करने का कोई मतलब रह नही जाता है। तो अब आप ठराव करेंगे भी तो उसको भेजने का औचित्य नही रहेगा। तो कही ना कही यह हमारे महासभा की स्थिति यह होगी की जब ऑलरेडी दोनो ठराव हमने भेजे थे। मुख्यमंत्री के सामने जब हमने दोनो टेक्नीकल बाते डिसकस की थी और उसके बाद अगर एम.एम.आर.डी.ए. ने कन्सल्टंट भेजके जब उन्होंने ऑलरेडी यह डिसीजन ले लिया है की उन्हें क्या करना है तो क्या हम अब वापस नया ठराव भेजके उस चीज को प्रलंबित नही कर रहे है। अगर उन्होंने कोई डिसीजन ले लिया है तो वो प्रलंबन में जाएगा। उनको वापस हमने ठराव करके भेजा है इसलिए वो और आगे जाएगा।

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम आपकी बात बिलकुल सही है। महापौर मॅडम पहले तो यह जो ठराव किया है इस ठराव के अंदर उन्होंने जो मुद्दे रखे है। और पहली बात तो यह हम यह रोड बना किस लिए है पब्लिक के लिए बना रहे है ट्रॅफिक की समस्या खतम हो उसके लिए बना रहे है।

मा. महापौर :-

मैं आपको फिर बोल रही हूँ सेम ठराव वापस भेजने का औचित्य क्या है?

दिपक खांबित :-

महापौरांच्या परवानगीने, एम.एम.आर.डी.ए. ने ऑलरेडी तिकडे इलिमेट ब्रिज होत नाही म्हणून डिसीजन घेतलेला आहे. ३ ब्रिज करायचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी पहिला जो ब्रिज आहे त्याचं ते आता टेंडर काढतील ७-८ दिवसामध्ये त्यांनी ऑलरेडी डिसीजन घेतलेले आहे. ३ ब्रिज करायचे हा इलिमिटेड रस्ता फिजिबल नाही. फिजिबलच नाही महासभेत घेऊन काय करणार तुम्ही.

मा. आयुक्त :-

जनरल प्रोसेसमध्ये ऑलरेडी निर्णय झालेला आहे आणि ते इलिमेटेड ब्रिज त्या ठिकाणी फिजिबल नाही अस ते सांगतात की निर्णय झालेला आहे.

दिपक खांबित :-

सरनाईक साहेब आमदार साहेब स्वतः त्यांना भेटले या विषयावरती त्यांना ही त्यांनी सांगितले की हे फिजिबल नाही म्हणून. सरनाईक साहेब आम्ही गेलो होतो तिकडे.

मा. महापौर :-

हा निर्णय आम्ही १० मिनिट नंतर घेऊ. १० मिनिटांसाठी तहकुब करते.

आसिफ शेख :-

२ ठराव आलेले आहेत.

वंदना चक्रे :-

थांबा ब्रेक दिलेला आहे.

आसिफ शेख :-

नाही नाही ब्रेक कुणी सांगितला. अस करता येणार नाही. महापौर मॅडम.

ध्रुवकिशोर पाटील :-

मतदान सुरु होणार आहे आणि तुम्ही तहकुब कशी केली. सचिव साहेब २ ठराव आलेले आहेत आणि मतदानाला सुरुवात केलेली आहे. सभा तहकुब होऊ शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

इस ठराव को मतदान में डालने के पहले १ बात में जरुर बोलना चाहूँगी सभागृह में शांती से सुने प्लीज। जैसे अभी हमारे खांबितजीने बताया की यह ७ दिनो में टेंडर प्रोसेस होनेवाला है। में नही चाहती की हमारा कोई ऐसा ठराव वहाँ पहूँचे और उस टेंडर प्रोसेस को रोकके हम इस काम में बांधा डाले और फिरसे हमारा शहर उतने ६ महिने या ८ महिने पिछे जाए। ऐसा कोई ठराव अगेर पोहचता है और अगर टेंडर प्रोसेस रुकती है और उसलिए हमारे शहर में ब्रिज बनने के कामों मे देरी होती है तो शायद हमें इस बात का दुख होगा की हमने महासभा में गलत निर्णय लेके यह काम किया में फिर एक बार कहती हूँ की आप वापस सोचले इस बात को की आपको यह ठराव लाना है या नही। यह काम हमें विलंब में डालना है या नही।

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव सुचक श्री. आसिफ शेख. दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. आसिफ शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

इस विषयपे हमने एक और ठराव इसके पहले भेजा हुआ है अगर आप लोगो को याद हो तो की यहाँ तीन ब्रिजेस हो इसके लिए हमने गए सभा में यह ठराव भेजा हुआ है। पहले तो हमें वो ठराव रद्द करना होगा। नए ठराव भेजने के लिए तो आप यह नमूद करना शायद भूल गए होंगे और एकही विषयपे दो ठराव हो नही सकते। मैं फिर बोलती हूँ। मैं विषय मंजूर करते हुए यह कहती हूँ की अगली सभा में यह विषय फिर लाया जाए और उसपे चर्चा की जाए।

जुबेर इनामदार :-

हो नही सकता।

मा. महापौर :-

मैं यह विषय आपका मंजूर कर रही हूँ। मैं आपको फिर बोल रही हूँ।

आसिफ शेख :-

आप बात को घूमा रहे है। अभी खाली आपको निर्णय देना है। ठराव हो गया है।

मा. महापौर :-

मैं निर्णय दे रही हूँ पर एक विषय पे यह दुसरा ठराव जा रहा है। इसलिए मैं आपको फिर बोल रही हूँ की यह विषय मैं मंजूर कर रही हूँ और इस विषय में आपके। डॉ. आसिफ शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३५, विरोधात २६, तटस्थ ० इतकी मते पडली आहेत. श्री. आसिफ शेख यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ५० :-

सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०३/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - भाईंदर (पूर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरुन भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधून आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार करणे.

ठराव क्र. ४९ :-

मिरा-भाईंदर महापालिकेने छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट वाहतुक बेट दरम्यान दिपक हॉस्पिटल, एस.के.स्टोन व प्लेझंट पार्क येथे तीन उड्डाणपुल प्रस्तावित केले आहे. त्यांचे बांधकाम एम.एम.आर.डी.ए मार्फत नियोजित आहे. या उड्डाणपुलामुळे वाहतुक कोडींचे नियोजन होणार असले तरी काही अंशीच उपयोगी ठरणार आहे. परंतू त्याचा विशेष काही फायदा होणार नाही व वाहतुकीची कोंडी तशीच कायम राहण्याची शक्यता आहे. सदर या तीन उड्डाणपुलाऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट वाहतुक बेट मार्गे पुर्वीचे रेल्वे फाटकावरून थेट भाईंदर पश्चिमेकडे डायरेक्ट एलिवेटेड रोड (थेट एकच उन्नत मार्ग) निर्माण झाल्यास वाहतुक कोडींचे नियोजन निश्चित होईल. तसेच आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार केल्यास त्यांचा उपयोग नागरिकांना होईल शिवाय वाहतुक देखील गतिमान होऊन अस्तित्वातील असलेल्या एकमेव भारतरत्न स्व. इंदिरा गांधी उड्डाणपुलाला पर्याय उपलब्ध होईल.

सध्या भाईंदर पश्चिम व भाईंदर पुर्व यांना जोडणारा भारतरत्न स्वर्गीय इंदिरा गांधी हा एकमेव उड्डाणपुल अस्तित्वात असून वाहतुकीसाठी खुला आहे. याच पुलावरून हजारो-लाखोच्या संख्येने दिवस-रात्र वाहतुक सुरू आहे. जर भविष्यात या अस्तित्वातील हा एकमेव उड्डाणपुल नैसर्गिक अथवा तांत्रिक अडचणीमुळे बंद झाल्यास नागरिकांची फारच गैरसोय होईल तसेच भाईंदर पुर्व - भाईंदर पश्चिम वाहतुकीला पर्याय उपलब्ध होणार नाही. त्यामुळे मोठया प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. काही महिन्यांपुर्वी वसई विरारकडे व गुजरातकडे जाणाऱ्या फाऊटंन हॉटेल समोरील वरसावे येथील खाडी पुलावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊन अवजड वाहनांना दुरचे अंतर कापून वसई- विराराला जावे लागत होते. व तासन तास वाहतुकीची कोंडी होत होती. त्याचा बोध घेवून आपण भाईंदर (पुर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरून भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधल्यास व आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार केल्यास त्याचा नागरिकांना भरपुर फायदा होईल व वाहतुकीची कोंडी देखील होणार नाही.

तरी नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने व सोयीसाठी तसेच प्रचंड प्रमाणात होत असलेली वाहतुक कोंडी दुर करण्यासाठी भाईंदर (पुर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरून भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधण्यात यावा व आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार करण्यात यावेत असा ठराव मी मांडत आहे. मा.आयुक्त यांनी तातडीने सदर ठरावाची अंमलबजावणी करून आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी. सदर ठराव वाचून कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- डॉ. आसिफ शेख अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | १ | शरद केशव पाटील | निरंक |
| २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | २ | पाटील रोहिदास शंकर | |
| ३ | डिमेला बर्नट अल्बर्ट | ३ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ५ | भावसार शिल्पा कमलेश | ५ | मीरादेवी रामलाल यादव | |
| ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ६ | कोठारी सुमन रमेश | |
| ७ | पाटील सुनिता कैलास | ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | |
| ८ | झिनत रऊफ कुरेशी | ८ | जैन गिता भरत | |
| ९ | पुजारी कांचना शेखर | ९ | अरोरा दिपिका पंकज | |
| १० | डिसा मर्लिन मर्विन | १० | रावल भगवती जयशंकर | |
| ११ | वंदना रामदास चक्रे | ११ | मेहता डिंपल विनोद | |
| १२ | अनिता जयवंत पाटील | १२ | मेघना दिपक रावल | |
| १३ | बगाजी शर्मिला विल्सन | १३ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| १४ | इनामदार जुबेर | १४ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | |
| १५ | वेतोसकर राजेश शंकर | १५ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| १७ | सामंत प्रमोद जयराम | १७ | कांगणे यशवंत ठकाजी | |
| १८ | खंडेलवाल सुरेश | १८ | अनिल बाबुराव भोसले | |
| १९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | १९ | कासोदरीया अश्विन श्यामजी | |
| २० | नरेश तुकाराम पाटील | २० | जैन दिनेश तेजराज | |
| २१ | निलम हरिश्चंद्र ढवण | २१ | जैन रमेश धरमचंद | |
| २२ | तारा विनायक घरत | २२ | डॉ. राजेंद्र जैन | |
| २३ | शुभांगी महिन कोटियन | २३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| २४ | जयमाला किशोर पाटील | २४ | केळूसकर प्रशांत नारायण | |
| २५ | परमार अनिता भरत | २५ | मुन्ना सिंग | |
| २६ | पाटील प्रणाली संदिप | २६ | मयेकर सरस्वती रजनकांत | |
| २७ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| २८ | संदिप मोहन पाटील | | | |
| २९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३० | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३१ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३३ | जयंतीलाल पाटील | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५१, सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महाराष्ट्र विधानमंडळातील सदस्य/आमदारांप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सदस्य/नगरसेवकांना मनपाचे बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) देणेबाबत.

राकेश शहा :-

सदर विषयाकरीता मा. महासभेच्या ठरावाची आवश्यकता नसून याबाबत बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) देणेबाबतचा अधिकार पालिका प्रशासनास आहे करीता सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

शरद पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

आसिफ शेख :-

सन्मा. महापौर मॅडम, विषय क्र. ५१ करिता ''ज'' चा प्रस्ताव या ठिकाणी मी महासभेपूढे दिला. सर्व सन्मा. सदस्यांनी वाचलेला आहे आणि आपल्याकडे खर सांगायच झालं तर या सभागृहात आमदार, नगरसेवक आहेत. यापेक्षा दुसरी भाग्याची गोष्ट होऊ शकत नाही तर आम्ही प्रस्ताव असा दिला आहे की

आमदार जे असतील त्यांना २-२ बिल्ले लावावे लागतील किंवा इकडे येताना नगरसेवकांचा बिल्ला लावा तिकडे जाताना त्यांनी आमदारकीचा बिल्ला लावावा. पण चांगली गोष्ट झाली की आम्ही या ठिकाणी विषय आणलेला आहे की आमदार आणि खासदार. खासदाराचं माहित नाही पण आमदाराचं आपण बघतो की विधान परिषदेमध्ये त्यांना बिल्ले दिले जातात की त्यांची विशिष्ट ओळख व्हावी आणि प्राधान्याने त्यांना प्रवेश द्यावा सभागृहामध्ये. आणि त्यांचा योग्य तो मान राखला जावा. आता आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये बरेचसे सन्मा. नगरसेवक पहिल्या टर्मला आहेत. जुने आहेत त्यांना असेच नावाने पण ओळखतात चेहऱ्याने पण ओळखतात. नविन सदस्यांना अडचण होते. परंतु लोक प्रतिनिधींचा योग्य तो मान राखला पाहिजे. शासनाचे पण तसे निर्देश असतात. आदेश आलेले आहेत की लोकप्रतिनिधींच्या पत्रांना म्हणा सगळ्यांना उत्तर द्यायला आणि प्राधान्याने काम पण करायला पाहिजे तर आपण या ठिकाणी त्यांच जो मी प्रस्ताव दिलेला आहे त्यामध्ये मला असं वाटत की, सर्व सन्मा. सदस्यांनी सर्वानुमते हा जर प्रस्ताव मंजूर केला तर आणखीन चांगल होईल. पहिल्या प्रस्तावामध्ये जसं राजकारण झालं तस या विषयामध्ये होऊ नये असे वाटते. आपण ठराव केलेला आहे. पण आम्ही आमचा ठराव या ठिकाणी मांडत आहोत. महाराष्ट्र विधानमंडळातील (विधानसभा / विधानपरिषद) सदस्य / आमदारांची ओळख पटण्यासाठी व त्यांचा योग्य तो मान सन्मान राखला जावा यासाठी तसेच विधीमंडळ सभागृहात तसेच मंत्रालयात आमदारांना सहज प्रवेश मिळावा यासाठी शासनाने विधीमंडळाचे बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) सर्व आमदारांना दिले आहेत. तसेच याच पध्दतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेने देखील सर्व नगरसेवकांना बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) दिले आहेत. तरी याच धर्तीवर नगरसेवकांची स्वतंत्र ओखख होऊन त्यांचा योग्य तो मान सन्मान राखला जावा व त्यांना सभागृहात व महानगरपालिकेत सहज प्रवेश मिळावा यासाठी महानगरपालिकेचे बोधचिन्ह/प्रतिकृती असेलेले बिल्ले (बॅच) तयार करुन ते आपल्या मनपा नगरसेवक/नगरसेविकांना वाटण्यात यावेत, असा ठराव मी मांडत आहे.

वंदना चक्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मतदानाला घ्या.

नगरसचिव :-

दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्री. राकेश शहा. दुसरा ठराव सुचक श्री. आसिफ शेख. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सूचक श्री. आसिफ शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सूचक श्री. राकेश शहा यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

श्री. राकेश शहा यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४०, विरोधात २१ इतकी मते पडली आहेत. श्री. राकेश शहा यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ५१ :-

<u>सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.</u> -- महाराष्ट्र विधानमंडळातील सदस्य/आमदारांप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सदस्य/नगरसेवकांना मनपाचे बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) देणेबाबत.

ठराव क्र. ५० :-

सदर विषयाकरीता मा. महासभेच्या ठरावाची आवश्यकता नसून याबाबत बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) देणेबाबतचा अधिकार पालिका प्रशासनास आहे करीता सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्री. शरद पाटील

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | निरंक |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | डिमेला बर्नट अल्बर्ट | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ५ | मीरादेवी रामलाल यादव | ५ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | जैन गिता भरत | ८ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ९ | अरोरा दिपिका पंकज | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | डिसा मर्लिन मर्विन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | मेहता डिंपल विनोद | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | मेघना दिपक रावल | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १३ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १४ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १४ | इनामदार जुबेर | |
| १५ | सुजाता रविकांत शिंदे | १५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | सामंत प्रमोद जयराम | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | खंडेलवाल सुरेश | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोसा | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | नरेश तुकाराम पाटील | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २५ | तारा विनायक घरत | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३१ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | जयंतीलाल पाटील | | | |
| ३८ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | |
| ४० | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५२, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- खाजगी शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत.

शरद पाटील :-

सदरचा विषय फेटाळण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ध्रुवकिशोरजी यह ठराव हो चुका है और हमने इसको मंजूरी दी है आप कुछ अलग करनेवाले नही हो तो वापस वही ठराव वही मंजूरी देना शायद कही यह लग रहा है।

ध्रुवकिशोर पाटील :-

१८/१/२०१६ की मिटींग में हमारे रोहिदासजी पाटील सन्मा. सदस्य इन्होंने यह ठराव पास किया था। नयना वसाणी मॅडमने उसका अनुमोदन दिया था। लेकिन आज ७ महिने हो गए कोई कारवाई नही हुई इसके लिए मुझे मजबुरन यह विषय लाना पडा।

मा. महापौर :-

प्लीज आप ठराव नही आप विषय में यह कहीए की वो कारवाई करिए जल्दी।

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम हमारे आदरणीय पंतप्रधान मोदीजीने कहाँ था की हमारा सरकार गतीमान रहेगा। यह क्या गतीमान है मुझे बताइए ना ६-६ महिना हो गया लेकिन अभी तक............

मा. महापौर :-

ध्रुवकिशोरजी आप अपने विषयमें पंतप्रधान तक नही जाए तो ज्यादा अच्छा होगा।

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम मैंने उनका अपमान नही किया, तारीफ की मैंने।

मा. महापौर :-

मैंने यह नही कहाँ अपमान किया। आपकी फिलींग बहुत अच्छी है। आप हमारे विषय में बोलिए। आपकी भावना अच्छी है और हम सब उससे सहमत है। हमने इसिलिए सर्वानुमते वो ठराव किया था।

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम लेकिन उसके उपर अंमलबजावणी होनी चाहिए ना। ७-७ महिना हो गया अंमलबजावणी हुई नही है।

मा. महापौर :-

ओके आप अपना ठराव पढिए। मैं आपसे फिर बोल रही हूँ की वो सेम ठराव देने में कोई औचित्य है क्या?

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम ठराव नही दे रहे है। खाली कारवाई चल रही है या नही तो खाली प्रशासन या आप बता दिजीए।

मा. महापौर :-

मैं वही आपको बोल रही हूँ आप प्रशासन को पूछिए मांगीए मैं उससे आपको मना नही कर रही हूँ। मैं आपको यह बोल रही हूँ आप उनसे जवाब मांगिए कहाँ तक पहूँचे क्या है?

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम आपकी बात में मानता हूँ लेकिन आपही मुझे बताइए की हम अपोझिशन वाले जब कोई सत्ताधारी जब कोई प्रशासन अगर स्लो काम करता है अगर काम नही करता है तो हमारा काम है उसको जगाने के लिए तो हम जगाने के लिए ‘‘ज’’ के प्रस्ताव लाए है।

मा. महापौर :-

ठिक है आप अपना ठराव मांडिए।

ध्रुवकिशोर पाटील :-

अभी आपकी बात मान रहे है तो।

मा. महापौर :-

तो आप बारबार वही कर रहे है। आप प्रशासन को बुलालो उनसे जवाब मांगिए। मैं उसके लिए मना नही कर रही हूँ।

ध्रुवकिशोर पाटील :-

म्हसाळ साहेब तुम्ही खुलासा करा की आम्ही ऑलरेडी हा ठराव ७ महिन्यांपूर्वी मांडला होता आणि तो पास झाला होता. आम्ही सर्वानुमते हा ठराव पास केला म्हणजे आम्ही विरोध पण नाही केला तसच तुमच्या प्रशासनातर्फे सगळ्या शाळेच्या मुख्याध्यापकांना ट्रस्टींना पत्र दिलं होत की सगळ्या शाळांनी अग्निरोधक यंत्रणा बसवण्याचे गरजेचे आहे. सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसवण्याचे गरजेचे आहे. तुमच पत्र शासनाच पत्र कोणतीही शाळा ऐकत नाही मानत नाही. तुमच्या एज्युकेशन डिपार्टमेंटचा कुठलाही कंट्रोल शाळेवरती नाही. त्याच्यामुळे आज आम्ही हा ठराव आणलेला आहे. ७ महिने होऊन गेले अजुन तुम्ही काही कारवाई केली नाही. तरी कृपया तुम्ही खुलासा करा.

मा. महापौर :-

ध्रुवकिशोरजी देशमुख को बुलाया गया है अगर आने तक टाईम शायद लगेगा तो हम अगले विषय पे जाए। उनके आते ही वो विषय लेते है।

प्रकरण क्र. ५२ :-

<u>सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.</u> -- खाजगी शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत.

ठराव क्र. ५१ :-

सदरचा विषय फेटाळण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील  अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५३, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होऊन दोन महिने झाले तरी अद्याप शैक्षणिक साहित्यांचे वाटप झाले नाही.

अनिल भोसले :-

महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होवून दोन महिने झाले तरी अद्याप शैक्षणिक साहित्यांचे वाटप करणेबाबत निविदा काढण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. करीता सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

देखो मॅडम आप बोल रहे हो यह दुसरा उदाहरण है।

मा. महापौर :-

उसका टेंडर निकल चुका है। आप अभी बोल रहे है।

ध्रुवकिशोर पाटील :-

अभी आप बताइए मॅडम आप भी एज्युकेटेड हो स्कूल खुल गई है, अभी तक ना गणवेश है, ना किताब है, ना नोटबुक, ना पेन्सिल, पेन, बुट,मोजे है..............

मा. महापौर :-

आप एकही शब्द में बोल सकते हो। विद्यार्थी को जो भी चाहिए वो नही है। लेकिन उसके लिए हमने विषय लिया था आचारसंहिता लगी थी और आचार संहिता की वजह से वो विषय लेट हुआ था और इसके लिए अब टेंडर निकल चुका है।

ध्रुवकिशोर पाटील :-

आचार संहिता के अंदर आपने एक स्पेशल स्टॅन्डिंग कमिटी की मिटींग लगाई थी। आमगावकर साहब बराबर है? और उसमें नालेसफाई का विषय लिया था। जब शहर की नालेसफाई इर्म्पोटन्ट है तो म्युनिसिपालटी के बच्चों को नोटबुक देना भी बहुत इर्म्पोटन्ट है और हमारा एक दायित्व भी है। आप ही बताइए मॅडम आज बच्चों की यूनिट टेस्ट होगी अदर स्कूल में और अभी तक हमारे स्कूल के बच्चों को नाही नोटबुक दिया है नाही कुछ दिया है। वो बच्चे स्कूल में क्या पढेंगे मुझे बताओ ना आप अगर वो टेंडर बोलता है बच्चों यह लिखो बच्चे लिखेंगे कैसे।

मा. महापौर :-

ध्रुवकिशोरजी मैं आपको फिर बोल रही हूँ की इस बार हमारी आचार संहिता की वजहसे वो लेट हुआ है।

ध्रुवकिशोर पाटील :-

तो जब स्टॅन्डिंग कमिटी की मिटींग नालेसफाई के लिए लगी थी तब यह विषय क्यों नही लिया।

मा. महापौर :-

ठिक है। पर अब हमारे हाथ में सिर्फ यह है की उसका टेंडर निकल चुका है।

ध्रुवकिशोर पाटील :-

ऐसे ही लास्ट इयर आपने ही बोला था। प्रोसिडिंग निकालके देख लिजीएगा लास्ट इयर भी यही डिले हुआ था तब आपने बोला था अगली साल हम टाईम पे उनको पुरा शैक्षणिक साहित्य देंगे तो क्यों नही दिया। लास्ट इयर का आपका वादा फेल गया।

मा. महापौर :-

ध्रुवकिशोरजी आपको कोई ठराव मांडना है इस विषय पे।

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम मेरा आपको एक सजेशन है की देशमुख साहब को आपने बुलाया है इस विषय को हम होल्ड करते है।

मा. महापौर :-

इस विषय को होल्ड करने का अभी कोई मतलब नही है। क्योंकी इसका टेंडर निकल चुका है। फिर भी आपको कोई ठराव करना है तो बोलिए नही तो मैं यह ठराव मंजूर करती हूँ।

ध्रुवकिशोर पाटील :-

मिरा भाईंदर मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होऊन सुमारे दोन महिने झाले पण त्यांना आजतागायत शैक्षणिक साहित्यांचे वाटप झाले नाही. सुमारे १०,००० विद्यार्थी मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना मनपा तर्फे पाठ्यपुस्तके, वह्या, गणवेश, दप्तर, बुट, मौजे, पाण्याची बाटली, इत्यादी शैक्षणिक साहित्य दिले जाते पण यावर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांना अद्याप दिले नसल्याने दोन महिन्यापासून त्यांना अभ्यास करता आला नाही. शिक्षक विद्यर्थ्यांना शिकवणार कसे? विद्यार्थी शाळेत येणार तर कश्यामुळे? काय करणार येऊन? असा प्रश्न पालक, विद्यार्थी, शिक्षक, जनता करत आहेत. शासनतर्फे पाठ्यपुस्तके देण्यात आली पण वह्या अभावी अभ्यास कसा करणार? इतर

शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या युनिट टेस्ट झाल्या आहेत. मागील वर्षी सुध्दा उशीरा शैक्षणिक साहित्यांचे वाटप झाले होते. तत्कालीन मा. महासभेत त्यावेळी मा. महापौर व प्रशासनातर्फे पुढील वर्षी म्हणजे यंदा शैक्षणिक साहित्य वेळेवर देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. पण ते आश्वासन फोल ठरले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान झाले आहे. या घटनांची सखोल चौकशी करुन विलंब करणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी व शैक्षणिक साहित्यांचे वाटप लवकर करणे व पुढील वर्षी शाळा सुरु होणार त्याच दिवशी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करणे करीता मी ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. अनिल भोसले, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुक्रमे दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सूचक श्री. अनिल भोसले यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

श्री. अनिल भोसले यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४०, विरोधात २१ इतकी मते पडली आहे. श्री. अनिल भोसले यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ५३ :-

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होऊन दोन महिने झाले तरी अद्याप शैक्षणिक साहित्यांचे वाटप झाले नाही.

ठराव क्र. ५२ :-

महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होवून दोन महिने झाले तरी अद्याप शैक्षणिक साहित्यांचे वाटप करणेबाबत निविदा काढण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. करीता सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. अनिल भोसले अनुमोदक :- श्री. राकेश शाह

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | निरंक |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | डिमेला बर्नट अल्बर्ट | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ५ | मीरादेवी रामलाल यादव | ५ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | जैन गिता भरत | ८ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ९ | अरोरा दिपिका पंकज | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | डिसा मर्लिन मर्विन | |
| ११ | मेहता डिंपल विनोद | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | मेघना दिपक रावल | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १३ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १४ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १४ | इनामदार जुबेर | |
| १५ | सुजाता रविकांत शिंदे | १५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | सामंत प्रमोद जयराम | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | खंडेलवाल सुरेश | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोसा | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | नरेश तुकाराम पाटील | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | तारा विनायक घरत | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३१ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | जयंतीलाल पाटील | | | |
| ३८ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | |
| ४० | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

मागचे थांबवलेले प्रकरण क्र. ५२ परत सुरु.

ध्रुवकिशोर पाटील :-

आपल्या खाजगी शाळांमध्ये सी.सी. कॅमेरा आणि अग्निरोधक यंत्रणा प्रत्येक शाळांमध्ये बसवणे असं आपल्या प्रशासन अधिकाऱ्यांनी उपायुक्त पानपट्टे साहेबांनी सगळ्या शाळांना पत्र दिलं होतं परंतु कोणतीही शाळा ऐकत नाही. कोणतीही शाळा तुमची जुमानत नाही तर तुम्ही काय कारवाई केली.

देशमुख (प्रशासन अधिकारी, शिक्षण) :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आपल्या अग्निशमन यंत्रणेच्या बाबतीत अग्निशमन यंत्रणेकडून आपल्या पानपट्टे साहेबांनी जी यादी दिली त्या यादीनुसार सगळ्या शाळांना मी नोटिसा दिलेल्या आहेत. त्यानंतर सी.सी.टी.व्ही. च्या बाबतीत सुध्दा पत्र आपल्या शासनाचं सुध्दा जी.आर. झाला होता. अनुदानित शाळा आणि मनपाच्या बाबतीत आणि खाजगी शाळांच्या बाबतीत. त्याच्या बाबतीत सुध्दा आम्ही सगळ्या शाळांना नोटिसा दिल्या आणि आढावा सुध्दा घेतलेला आहे. ५० टक्के शाळांनी काम केलेले आहे आतापर्यंत.

ध्रुवकिशोर पाटील :-

टोटल किती शाळा आहेत.

देशमुख (प्रशासन अधिकारी, शिक्षण) :-

टोटल २१० शाळा आहेत. ५० टक्के शाळांनी सी.सी.टी.व्ही. बसवलेले आहेत. अग्निशमन यंत्र बसवले आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

बाकीच्या ५० टक्के शाळा कधीपर्यंत करणार आहे.

देशमुख (प्रशासन अधिकारी, शिक्षण) :-

आता मी आढावा घेतो दर महिन्याला. त्यांना सांगितलेल आहे तात्काळ करा असं. दर महिन्याला आढावा घेतो मी खाजगी शाळांचा आणि मनपाचा.

ध्रुवकिशोर पाटील :-

म्हणजे पुढची महासभा घेण्याच्या अगोदर. तुम्ही खात्री देता? की अग्निशमन यंत्रणा आणि सी.सी.टि.व्ही. कॅमेरा ही जी यंत्रणा आहे ही यंत्रणा आपल्या सगळ्या महानगरपालिकेच्या शाळा तसेच ज्या खाजगी शाळा आहेत त्या सगळ्या शाळामध्ये ही बसली पाहिजे.

देशमुख (प्रशासन अधिकारी, शिक्षण) :-

हो बसतील.

ध्रुवकिशोर पाटील :-

आर.यू.शुअर? आणि नाही बसली तर.

देशमुख (प्रशासन अधिकारी, शिक्षण) :-

आपण कारवाई करु ना त्यांच्यावर.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५४, सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदानांवर होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांना लावण्यात येणाऱ्या भाड्यांमध्ये फेरबदल करणेबाबत.

प्रशांत दळवी :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भाड्याने देण्यात येत असलेल्या मालमत्तांचे भाडे हे अल्प असल्याने सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि. २३/०३/२०१५ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मिरा भाईंदर शहरातील मैदाने (आरक्षणे व आर.जी. जागा) ह्या पूर्वी प्रति दिन रु. १०००/- इतकी होती. त्यात सुधारणा करुन प्रति रु. ३०००/- इतके भाडे आकारण्यास ठराव क्र. ८० अन्वये मंजूरी दिलेली आहे. व त्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. परंतु सदरहू भाडे जास्त प्रमाणात आकारण्यात येत असल्यामुळे सर्वधर्मियामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे.

सबब सर्वधर्मियांची भावना लक्षात घेवून येणाऱ्या गणेशोत्सव व नवरात्र उत्सवाकरीता पहिल्या दिवशी रु. ३०००/- व त्या पेक्षा अधिक काळ असल्यास प्रत्येक दिवसामागे प्रति दिन रु. १०००/- इतके भाडे आकारण्यात यावे व तद्नंतर सदर विषयातील इतर धार्मिक कार्यक्रमा बाबत निर्णय करण्यासाठी रितसर मा. महासभेपुढे घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

अश्विन कासोदरिया :-

माझे अनुमोदन आहे.

प्रमोद सामंत :-

महसुलाची बाजू आहे ना अस करता येईल आपल्याला.

ध्रुवकिशोर पाटील :-

अंदाजपत्रक कोसळेल.

मा. महापौर :-

अंदाजपत्रक कोसळेल तेवढा मोठा फरक पडणार नाही.

प्रमोद सामंत :-

माझी एक सूचना आहे ठरावाला विरोध नाही. मागे आपण एक विषय घेऊन लायब्ररीची फी ५०० रु. केली होती. १५० रु. होती ती ५०० रुपये केली.

प्रशांत दळवी :-

आपण फक्त अस म्हटल आहे महापौर मॅडम धार्मिक उत्सव येणारे गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सव आणि त्यानंतर हा विषय परत आपण रितसर आपल्या सभांपुढे आणायचा आहे. आणि त्यामध्ये मग लायब्ररी जी असेल किंवा काही असेल ते महापौरांनी सुचविल्याप्रमाणे ते डिसाईड करता येईल.

प्रमोद सामंत :-

कस आहे आपण या ३ उत्सवांसाठी जो हा विषय आणला आहे ना तसच माझी रिक्वेस्ट आहे की लायब्ररीची फी याच विषयामध्ये नमूद करुन ती १०० रु. करुन घ्या.

प्रशांत दळवी :-

लायब्ररीची फी हा धार्मिक विषय नाही ना.

प्रमोद सामंत :-

धार्मिक नसला तरी शैक्षणिक आहे.

मा. महापौर :-

सामंत साहेब तस आपण पुढच्या वेळी विषय आणू.

प्रमोद सामंत :-

मॅडम ३ उत्सवासाठी चेंज करणार आहात?

मा. महापौर :-

२ उत्सवांसाठी आणि पुढच्या महासभेत आपण ते विषय आणू. सगळेच जे-जे धार्मिक उत्सव आहेत.

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब मला जरा खुलासा करुन द्या अस करता येईल का?

मा. महापौर :-

प्रमोद सामंतजी आपको अगर ठराव विरोध में करना है तो करीए।

प्रमोद सामंत :-

खुलासा करो ना ऐसा हो सकता है क्या?

जुबेर इनामदार :-

“ज” च्या प्रस्तावाच्या माध्यमातून धोरणात्मक निर्णय घेता येत नाही आणि ते निर्णय घेता येत नाही ज्याच्यामध्ये आर्थिक बाबी आहेत. “ज” च्या प्रस्तावाला प्रशासकीय गोषवारा नसतो. ज्याला प्रशासकीय गोषवारा नाही आणि आर्थिक बाबी असल्या अशा विषयाला प्रशासनाला हात टाकता येणार नाही. त्यांनी तसं स्पष्टीकरण करावे. करता येईल का? केल नाही. विषय चांगला आहे. आमचा विरोध नाही पण तुम्हाला करता येईल का? तुम्हाला गरज लागल तर विशेष सभा बोलवा मॅडम त्याच्यासाठी हा विषय विषयपटलावर आणा आणि करुन घ्या.

मा. महापौर :-

हरकत नाही.

मा. उपमहापौर :-

जर तस पॉसिबल नसेल तर आपण तस करु.

मा. उपायुक्त :-

यामध्ये कायदेशीर बाबी तपासून लेखा परिक्षण विभागाचे अधिकारी यांच्याशी तपासून घेऊन करु घेऊ ना.

मा. महापौर :-

हरकत नाही ना. नाही होणार तर नाही करणार. हे बघा त्यांची रिक्वेस्ट होती. गणेश उत्सव येतोय म्हणून करुन द्या. जर तुम्हाला सगळ्यांना पटत नाही. कायदेशीर बसत असेल तर करु. नाही कायदेशीर बसत असेल तर नका करु.

प्रमोद सामंत :-

कस आहे शहरामध्ये हा विषय आला की प्रसिध्दी मिळते. प्रसिध्दी मिळाल्यानंतर ती लोक त्यांना याच्या परवानग्या घ्यायच्यात ते आपल्या विभागीय कार्यालयात लोक येणार. तुमचे कर्मचारी त्यांनी काय सांगणार. उद्यापासून प्रकार चालू होणार तर त्याला काय सांगणार. म्हणजे तो माणूस जस आता ६ नं. प्रभाग कार्यालयात.............

मा. महापौर :-

सामंत साहेब ज्यांना प्रसिध्दी मिळणार त्यांना हे ही न्यूज मिळणार की आता हे प्रलंबित आहे पॉसिबल असणार तर करणार.

प्रमोद सामंत :-

नाही नाही हे प्रलंबित आहे ही न्यूज नाही मिळणार ना हेडींग तेवढीच असते.

मा. महापौर :-

अस काहीच नसते. साहेब जेव्हा न्यूज असते तेव्हा पूर्णच मिळत असते. अर्धी न्यूज मिळत नाही बसा पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ५४ :-

<u>सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.</u> -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदानांवर होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांना लावण्यात येणाऱ्या भाड्यांमध्ये फेरबदल करणेबाबत.

ठराव क्र. ५३ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भाड्याने देण्यात येत असलेल्या मालमत्तांचे भाडे हे अल्प असल्याने सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि. २३/०३/२०१५ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मिरा भाईंदर शहरातील मैदाने (आरक्षणे व आर.जी. जागा) ह्या पूर्वी प्रति दिन रु. १०००/- इतकी होती. त्यात सुधारणा करुन प्रति रु. ३०००/- इतके भाडे आकारण्यास ठराव क्र. ८० अन्वये मंजूरी दिलेली आहे. व त्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. परंतु सदरहू भाडे जास्त प्रमाणात आकारण्यात येत असल्यामुळे सर्वधर्मियामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे.

सबब सर्वधर्मियांची भावना लक्षात घेवून येणाऱ्या गणेशोत्सव व नवरात्र उत्सवाकरीता पहिल्या दिवशी रु. ३०००/- व त्या पेक्षा अधिक काळ असल्यास प्रत्येक दिवसामागे प्रति दिन रु. १०००/- इतके भाडे आकारण्यात यावे व तद्नंतर सदर विषयातील इतर धार्मिक कार्यक्रमा बाबत निर्णय करण्यासाठी रितसर मा. महासभेपुढे घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५५, सन्मा. सदस्या श्रीम. शर्मिला बगाजी यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- स्वातंत्र्य सेनानी - काका बाप्टीष्टांचे उत्तन भुतबंगला भागात स्मारक उभारण्याबाबत.

शरद पाटील :-

सदर विषयाबाबत पालिका प्रशासनाने आवश्यक माहितीसह प्रस्ताव सादर केला नाही. करीता सदरचा विषय आवश्यक माहितीसह पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुनिला शर्मा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ५५ :-

सन्मा. सदस्या श्रीम. शर्मिला बगाजी यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- स्वातंत्र्य सेनानी - काका बाप्टीष्टांचे उत्तन भुतबंगला भागात स्मारक उभारण्याबाबत.

ठराव क्र. ५४ :-

सदर विषयाबाबत पालिका प्रशासनाने आवश्यक माहितीसह प्रस्ताव सादर केला नाही. करीता सदरचा विषय आवश्यक माहितीसह पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदक :- श्रीम. सुनिला शर्मा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५६, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- परिवहन सेवेच्या गलथान कारभारा बाबत.

शरद पाटील :-

सदरचा विषय फेटळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

अश्विन कासोदरिया :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

मला वाटते ते झाले आहे. आपण परिवहन बद्दल खूप बोलले चर्चा झाली आहे. मला वाटते सगळे काही पॉईंट त्यात आले आहेत.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम मी जो पॉईंट सांगेल ना तो आलाच नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे तुम्ही ठराव मांडा.

ध्रुवकिशोर पाटील :-

म्हणजे माझी जी बाजू आहे ना ती बाजू सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि बाकी सदस्यांनी मांडली आहे. तो मुद्दा मी परत पुन्हा कव्हर करत नाही. मॅडम आपल्या परिवहन सेवेने २ वेळा टेंडर दिले होते. आणि दोन्ही वेळा टेंडर दिलं होत त्यावेळी कंडीशन टाकली होती की तुमच्या बसेस पैकी ९५ टक्के बसेस रस्त्यावर धावल्या पाहिजे. आणि जर त्या बसेस रस्त्यावर नाही धावणार तर तुम्हाला पेनॅल्टी द्यावी लागेल मग फक्त आपल्या या ४२ बसेस त्या पण टप्याटप्याने आल्या आणि त्या ४२ बसेस सुध्दा आपलं प्रशासन १०० टक्के चालवू शकत नाही. ९५ टक्के पण चालवू शकत नाही. या नविन बसेस आहेत. मॅडम मग यांना पेनॅल्टी काय? याच्यावरती ॲक्शन काय? आज नविन बसेस १५-१५ बसेस, १०-१० बसेस बंद आहेत टायर अभावी डिझेल अभावी दुसऱ्या कारणाने त्यांच्यावरती ॲक्शन काय? जर आपण कॉन्ट्रॅक्टरला कंडीशन करतो की तुम्ही ९५ टक्के ऑन रोड द्या मग यांच्यावरती कारवाई काय?

ध्रुवकिशोर पाटील :-

हिंमत असेल तर उत्तर द्या ना.

शरद पाटील :-

हिंमतीची गोष्टच नाही पहिले ठराव येऊ द्या. मग बघू या.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम दुसरी गोष्ट की, म्हणजे तुम्ही चुकीच्या माणसांना पाठीशी घालता. तुमच पारदर्शक सरकार नाही याच्यामध्ये. जसं आमचे आदरणीय पंतप्रधान मोदीजी म्हणतात की हमारा सरकार पारदर्शक रहेगा किधर है पारदर्शक तुम्हारा सरकार. साहब जो गलत करता है उसको पाठीशी घालता है। दुसरी गोष्ट

मॅडम २०१४ ला आपल्या या ९० टक्के, १०० टक्के याच्यामध्ये सॅग्शन झाला आणि आज आजतागायत जवळ जवळ २ ते अडीच होऊन गेले आपल्याला अजून १०० टक्के बसेस आल्या नाहीत. त्या बसेस वेगवेगळ्या ठिकाणी ज्यांनी बॉडीबिल्ड केल त्यांच्या कंपनीमध्ये अशाच पावसाळ्यामध्ये सर्व उभ्या होत्या उन्हाळ्यात, हिवाळ्यामध्ये धुळ खात पडल्या आहेत आणि मग या बसेस अशा उभ्या आहेत. मग त्या आपल्याला मिळतील आणि त्याच्यामध्ये हे खराब आहे ते खराब आहे अशी कारण पडतील. आज आपल्या प्रशासनाने फक्त ४२ बसेस आणल्या म्हणजे ५० टक्के बसेस अजूनही त्या कंपनीमध्ये तशाच पडल्या आहेत. ३ लाखाच आज आपलं जे अरनिंग आहे आणि या उरलेल्या ५० टक्के बसेस आल्या नसल्यामुळे आणखी ३ लाखाच नुकसान म्हणजे लाखो रुपयांचे नुकसान आपल्या प्रशासनाने केलेले आहे. म्हणजे हा गलथान कारभार नाही का? हे आम्ही तुमच्या निदर्शनास आणुन देतो ना. अशा अधिकाऱ्यावरती आपली कारवाई काय? आपण जी.सी.सी. तत्वावरती निविदा काढायच्या म्हणून ठराव केला आपल्या ऑफिसमध्ये मिटींग झाली आणि आपण सांगितलं. पण आजतागायत निविदा निघाली नाही आणि कॉन्ट्रॅक्टर अपॉईंट झाला नाही आणि मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांना आपण परिवहन सेवा बरोबर देऊ शकत नाही. अनेक विद्यार्थी अनेक कामधंद्यावर जाणाऱ्या माणसांना आपण परिहवन सेवा बरोबर देऊ शकत नाही. आज जर ते अस करतात तर तुम्ही त्यांना त्यांच्यावरती ॲक्शन घेतली पाहिजे ना.

मा. महापौर :-

नक्कीच लवकरात लवकर ते चालु करायचा प्रयत्न करु.

ध्रुवकिशोर पाटील :-

ॲक्शन काय? मॅडम तुम्हाला दाखवतो मी फोटो काढुन आणलेत.

मा. महापौर :-

मला माहित आहे. आय ॲग्री विथ यू. आणि मला वाटते त्याचे रिजन वगैरे सगळ काही तुम्हाला सांगितलेल आहे. हे बघा वी आर डूईंग इट फॉर द फस्ट टाईम. धिस इज लर्निंग प्रोसेस. पुढच्या वेळी तस होणार नाही. तसं ते ग्वाही दिली आहे त्यांनी ते टायर वगैरे मागवले आहेत आणि होणार.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम लाखो रुपयांचे नुकसान १०० टक्के बसेस रस्त्यावरती नाहीत नविन बसेस.

मा. महापौर :-

आपण पहिले पण १०० बसेस तशीच घालविली आहेत.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

विल डेफिनेटली टेक ॲक्शन तुम्हाला काही ठराव मांडायचा आहे का?

ध्रुवकिशोर पाटील :-

अरे ४ साल में कॉंग्रेसने क्या किया तो आप भी वही करने वाले है क्या?

मा. महापौर :-

नही हम उससे अच्छा करके दिखाऐंगे आपको ॲक्शन लेने के लिए ठराव मांडना है की मैं यह मंजूर कर दूँ।

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम ठराव तो मेरा रेडी है। लेकिन कुछ बाते आपको कहना है इसलिए मैंने आपको बोला।

प्रमोद सामंत :-

म्हसाळ साहेब आता ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी जे सांगितल त्यावरती तुमच्याकडून कोणती कारवाई कशाप्रकारे होणार आहे ते साहेब निवेदन द्या ना बरं होईल.

मा. महापौर :-

सामंत भाई यह निवेदन हो चुका है।

जुबेर इनामदार :-

जी.सी.सी. तत्वावर निविदा प्रक्रिया सुरु असताना १०० आलेल्या १०० बसेस मधून आपल्या सध्या कार्यरत असलेल्या ४२ बसेसमधून सुध्दा काही १७-१८ बसेस तुमचे बंद आहेत. म्हणजे साहेब तुम्ही त्या जी.सी.सी. तत्वावर जो प्रोजेक्शन दिला होता १२ कोटींचा वार्षिक म्हणजे भुदंड महानगरपालिकेवर पडणार आहे. तो खरा ठरणार आहे. तेव्हा ही आम्ही तुम्हाला बोललो होतो हे करु नका. जेवढी तुमची ताकद जेवढा वेळ त्या जी.सी.सी. तत्वावर देण्यासाठी घालविली तीच एमसीसी वर दिली असती तर आज ही परिस्थिती नसती. आज त्या बसेस आपल्या रस्त्यावरती धावायला सुरु झाल्या तरी पालिकेचा एक पैसा लागला नसता आम्ही बोलुन थकलो. त्या ठेकेदाराला तुम्ही पळवून लावल कारण त्या जीसीसी तत्वावर देण्यामध्ये प्रशासनाचा काय फायदा आहे ते परमेश्वराला माहिती. ठेकेदार पोसायचे एक तर आधीच जे बसेस तुम्हाला दिलेले त्यांचा सत्यानाश सुरु झालेला आहे आणि त्याच्यावर जी.सी.सी. तत्वावर देऊन ठेकेदार पोसण्यासाठी महापालिकेला भुदंड भरावा लागणार आहे.

मा. उपायुक्त :-

सन्मा. महापौर मॅडम आपल्या परवानगी बोलतो.

शरद पाटील :-

उपायुक्त साहेब त्यांनी सांगितल ठेकेदाराला आपण पळवून लावलं आहे त्याची पूर्ण माहिती पहिले द्या.

मा. उपायुक्त :-

